दिनांक :- २९.०७.२०२०

प्रति,
मा. अध्यक्ष / कार्याध्यक्ष / कार्यवाह
देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ / मंडळ

महोदय,

स.न.वि. वि.

**दहावी व बारावी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दीक अभिनंदन**

कोविड ह २०१९ च्या महामारी मध्ये गेली ४ ते ५ महिने आपल्याशी संपर्क होऊ शकला नाही त्याबद्दल क्षमस्व.

श्रीरामचंद्राच्या कृपेने आपण व आपले कुटूंब हे सर्व सुखरुप आहात अशी आशा करतो.

ठयत्ता दहावी व बारावीचे निकाल जाहिर झाले असून आपल्या समाजातील अनेक विद्यार्थी विद्याथीनीने या परिक्षामध्ये लक्षणीय यश संपादन केले असणारच. अनेक विद्यार्थी / विद्यार्थीना ९०% टक्केच्या वर गुण या परिक्षांमध्ये निश्चितच मिळाले असतील.

प्रतिवर्षी प्रमाणे आपल्या सगळयांना विनंती की आपल्या विभागातील / कार्यक्षेत्रातील, गरजु व हुशार विद्यार्थी / विद्यार्थीनीचे शैक्षणिक वर्ष २०२० - २०२१ साठीच्या शैक्षणिक मदतीसाठी / पारितोषिकांसाठी अर्ज या प्रत्रासोबत अर्ज जोडत आहोत ते आवश्यक कागदपत्र म्हणजे गुणपत्रिका, आधार कार्ड, सभासद क्रमांक संलग्नसंस्थेचे शिफारस पत्रासह दिनांक ३१.०८.२०२० पर्यंत संस्थेच्या कार्यालयात पाठविण्यात यावेत.

ज्यांना पोस्टाने अर्ज पाठविणे शक्य नसेल त्यांनी त्यांचे अर्ज संस्थेच्या खालील दिलेल्या ईमेल पत्यावर पाठवावे ईमेल aadrbm@gmail.com यावर दिनांक ३१.०८.२०२० च्या आधी पाठवावेत.

अर्ज पाठविताना शैक्षणिक मदत / शैक्षणिक पारितोषिकाचे नाव नमूद करणे गरजेचे आहे. पारितोषिकांची यादी संस्थेच्या संकेत स्थळावर उपल्बध आहे.

वॉटसॉप वर पाठविलेल्या अर्जावर विचार करण्यात येणार नाही. सबब अर्जदारांनी कोणाच्याही वॉटसॉप वर अर्ज पाठवू नये ही विनंती.

आपण सर्व संस्था राबवित असलेल्या शैक्षणिक मदत योजनेचा लाभ आपल्या विभागातील किंवा कार्याक्षेत्रातील जास्ती जास्त विद्यार्थी / विद्यार्थीनीस किंवा कार्याक्षेत्रातील करुन द्याल हा आमचा विश्वास आहे.

कृपया नोंद घ्यावी की जरी संस्थेचा प्रयत्न जास्ती जास्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे हा आहे. तरी आम्हाला विभागावर शैक्षणिक मदतीचे योग्य वाटप करणे प्राप्त आहे. तसेच जास्त अर्ज आल्यास गुणपत्रिकेच्या आधारे अर्जाचा विचार करण्यात येईल.

हुशार विद्यार्थ्यानमध्ये कमी किंवा अल्प उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांना प्राधान्य देण्यात येईल याची कृप्या नोंद घ्यावी.

आपण सर्व सध्याच्या संक्रमण काळात व त्यानंतर सुध्दा आपण आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी व कोविड संबधात सर्व नियम पाळावे.

श्री रामदास चरणी प्रार्थना की सर्वांचे आरोग्य सूदृढ राहावो व लवकरच पारिस्थिती पूर्वपदावर येऊन आपण सगळे  ऑक्टोंबर नोव्हेंबर पासून येणारे उत्सव जोरात साजरा करु.

कळावे,

असाच लोभ राहावा.

आपला

प्रभाकर पां. कुलकर्णी
(कार्याध्यक्ष )

दिनांक :- २५.०७.२०२०

प्रति,
मा. श्री. एस व्हि गोगटे

विलेपार्ले
मुंबई : ४०००५७

महोदय,

सस्नेह नमस्कार,

आम्ही आपणास कळवू इच्छितो की आमचे पूर्वीचे सनदी लेखापाल श्रीयुत. संदीप वाघ यांनी त्यांची लेखापालाची कामे न करण्याचा निर्णय घेतल्यामुळे संस्थेला नवीन सनदी लेखापालाची नेमणूक करणे आवश्यक आहे. आपण प्रथितयश सनदी लेखापाल आहात व सार्वजनिक न्यासासंबंधीचा आपला अनुभव दांडगा आहे. आपल्याला ज्ञाती बदल आदर व प्रेम आहे याचा विचार करुन दिनांक.१४.१२.२०१९ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेमध्ये सर्व सदस्यांनी आपली सनदी लेखापाल म्हणून आर्थिक वर्ष २०१९ – २०२० साठी नेमणूक केली आहे.

आपल्या नेमणूकी बद्दल आपले संमतीपत्र येणे आवश्यक आहे. आपणास आमचे पूर्वीचे सनदी लेखापाल श्रीयुत. संदीप वाघ यांच्याकडून नाहरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल ज्यासाठी त्यांचा कार्यालयीन पत्ता खालील प्रमाणे आहे.

श्रीयुत संदीप वाघ ॲण्ड कंपनी

मनोहर, चितळे पथ,

दादर, मुंबई :- ४०००२८

धन्यवाद !

आपला

श्री. प्रभाकर पां. कुलकर्णी

(कार्याध्यक्ष )

दिनांक :- २० जुनै २०२०

प्रति,

मा. श्री. श्रीकांत माधव यडूरकर

सभासद क्रमांक १३४१

तुळजाबाई, गोरेमंगळ कार्यालया समोर,

मिरज,

सांगली.

सस्नेह नमस्कार,

आपले दिनांक ०१.०७.२०२० रोजीचे पत्र आज दिनांक २०.०७.२०२० रोजी मिळाले,. परंतु संस्थेच्या घटनेत नाही. सभासदांकडून राजीनामा स्विकारण्याची तसेच त्यासंबधीच्या कुठल्याही पध्दतीची तरतूद नाही.

सबब आपल्या राजीनाम्या संबंधीच्या अर्जावर आम्ही विचार करु शकत नाही.

कळावे,

लोभ असावा,

आपला

श्री. प्रभाकर पां. कुलकर्णी

(कार्याध्यक्ष)

प्रति,,

मा. मॅनेजर

बॅक ऑफ इंडिया

शिवाजी पार्क

विषय :- ‘‘ खाते क्रमांक ०१५३१०११०००१०२३ TDS Certificate मिळण्याबाबत

महोदय,

आपणास कळविण्यात येते की संस्थेचे हिशोब लिहिण्याचे काम चालू असल्यामुळे आम्हाला TDS Certificate मिळण्याबाबत

कृपया वरील अर्जाचा विचार करुन आम्हाला स्टेटमेंट देण्याची व्यवस्था करावी हि विनंती.

कळावे,

आपला

प्रभाकर पां. कुलकर्णी

(कार्याध्यक्ष)

विषय क्रमांक ५ :- अध्यक्षांच्या परवांगीने येणारे आयत्या वेळचे विषय

ही सभा संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. प्रदीप नारायण कुलकर्णी बेळगाव यांचा ०५.०७.२०१९ रोजी झालेल्या अकस्मात निधनाची नोंद सभा घेत आहे व त्यांनी केलेल्या सेवेची नोंद घेऊन त्यांच्या कुंटुंबियांकडे आपली कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

<u>: ठराव :</u>

<u>खालील ठराव ही सभा एकमताने मंजूर करीत आहे</u>

श्री. प्रदिप नारायण कुलकर्णी यांच्या निधनाची नोंद सर्व बँकांना देण्यात यावी ज्या बँकांमध्ये संस्थेची खाती व ठेवी आहेत या सर्व बँकांना व वित्तीय संस्थांना श्री. प्रदिप नारायण कुलकर्णी यांचे नाव व सही त्यांच्या रेकॉर्डस व त्यांच्या नोंदीमधून कमी करण्यात यावे.

बॅकेंचे तसेच वित्तीय संस्थांची सर्व खाती व व्यवहार यापुढे खालील पदाधिका-यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करण्यात यावेत

नाव :- स्वाक्षरी

१. श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष) :
२. श्री. प्रसाद जनार्दन ठकार (कार्यवाह) :
३. श्री. विनोद विठठल मांडके (कोषाध्यक्ष) :

या ठरावानुसार वरील सर्व पदाधिका-यांना सर्व बँक व वित्तीय संस्थांचे व्यवहार ‘‘ संयुक्त स्वाक्षरीने ’’ करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

नाव :- स्वाक्षरी

१. श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष) :
२. श्री. प्रसाद जनार्दन ठकार (कार्यवाह) :
३. श्री. विनोद विठठल मांडके (कोषाध्यक्ष) :

सूचक : श्री. सदानंद घोटीकर | अनुमोदक :- श्री. राजेंद्र खेडलेकर

श्री. विलास विनायक जोशी (अध्यक्ष | श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष )

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या कार्यकारी मंडळाची व कार्यकारी परिषदेची सयुक्त सभा रविवार दिनांक ११.११.२०१८ रोजी सकाळी १०.५५ मध्यवर्ती मंडळाच्या सभागृहात मा श्री.विलास विनायक जोशी यांच्या अध्यक्षतेखाली व श्रीयुत प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. श्री. विलास विनायक जोशी ( अध्यक्ष) | २.श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष) |
| ३. श्री. प्रदीप नारायण कुलकर्णी (कोषाध्यक्ष) | ४.श्री. प्रसाद जनार्दन ठकार (कार्यवाह) |
| ५. श्री. दत्तात्रय खंडेराव कुलकर्णी (कार्यवाह) | ६. श्री. राजेद्र दिनकर खेडलेकर (कार्यवाह) |
| ७. श्री. विनोद विठठल मांडके (सहकोषाध्यक्ष) | ८. श्री. संजय मधुसूदन कुलकर्णी (कार्यवाह) |
| ९. सौ. अश्विनी हेमकांत नारविलकर (सदस्य) | १०. श्री. विवेक कृष्णा देशपांडे (सदस्य) |
| ११. श्रीमती. पुष्पा प्रकाश कुलकर्णी (सदस्य) | १२. श्री. शरद पां. पारसनीस (सदस्य) |
| १३. श्री. विलास शंकर कुलकर्णी (सदस्य) | १४. श्री. विनोद केशवराव देशमुख (सदस्य) |
| १५. श्री. दिगंबर श्रीपाद अष्टेकर (सदस्य) | १६. श्री. अनिल श्रीधर पानसे (सदस्य) |
| १७. श्री. अश्विनीकुमार प.उपाध्ये (सदस्य) | १८. श्री. संजीव रामचंद्र घळसासी (सदस्य) |
| १९. श्री. सदानंद बद्रीनाथ घोटीकर (सदस्य) | २०. श्री. प्रभाकर अनंत संत (सदस्य) |
| २१. डॉ. हरी शंकर महाशब्दे (सदस्य) | २२. सौ. सुषमा इनामदार (सदस्य) |
| २३. सौ. मुक्ता मुकूंद हुल्याळकर (सदस्य) | २४. श्री. वासुदेव प. चिटणीस (सदस्य) |

कार्यकारी मंडळ परिषद सभेस खालील सदस्य उपस्थित होते

| | |
|---|---|
| १. श्री. विलास विनायक जोशी ( अध्यक्ष) | २.श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष) |
| ३..श्री. अरविंद हस्तेकर | ४. श्री. शिशिकांत विष्णू चंद्रचूड |

| | |
|---|---|
| ५.सौ. चारुशीला चंद्रकांत झिंजोर्डे | ६. श्री. संजीव रामचंद्र घळसासी |
| ७.श्री. पदमाकर अत्रे | ८. श्री. श्रीकांत ना. कानडे |
| ९.श्री. हेमंत (अभय) कुलकर्णी | १०. श्री. मकरंद सुखात्मे |
| ११.श्री.श्रीकांत सरडे | १२. श्री. श्रीराम कुलकर्णी |
| १३.श्री.हेमकांत नारविलकर | १४. श्री. कृष्णा जोशी   १५. डॉ. लक्ष्मीकांत दाणी |

श्री. प्रभाकर कुलकर्णी (कार्याध्यक्ष) यांनी सभेस उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत केले आणि अनुपस्थित सदस्य ज्यांनी त्यांची अनुपस्थितीती कळविली आहे त्यांची नावे वाचून दाखविली.

१. श्री. सतिश पाटील २. श्री. श्रीकांत पाटसकर ३.श्री. सुधाकर कुलकर्णी ४. श्री. अनिकेत अष्टेकर ५. श्री. महेंद्र गंधे ६. सौ. भारती जोशी ७. श्री. दिपक कुलकर्णी ८. श्री. मधुकर कुलकर्णी

कार्यकारी परिषद अनुपस्थित सदस्य ज्यांनी त्यांची अनुपस्थितीती कळविली आहे त्यांची नावे वाचून दाखविली.ती खालील प्रमाणे.

१. श्री. शरद गंगाधर मुनीश्वर २. श्री. भाऊसाहेब रंगनाथ कुलकर्णी ३. श्री. भाऊराजे जहागीरदार ४. श्री. संकेत कुलकर्णी ५.सौ.मिनल गंधे ६. सौ.सुनदा आळतेकर ७.श्री. किशोर मंगळवेढेकर ८. सौ. ज्योती जोशी ९. श्री. अजितकुमार देशपांडे १०. श्री. सुनील पारखी ११. श्री. बळवंत अहंकारी १२. सौ. रोहिणी तडवळकर १३. सो. रोहिणी केसरी १४. श्री. निश्किांत बुधकर १५. श्रीमती प्रज्ञा हरहरे १६. श्री. संजय ब्रम्हे १७. श्री. जयंत देशपांडे १८. श्री. शरद जोशी १९. श्री. शतनु चौधरी २०. श्री. श्रीकांत कानडे

सभेने याची नोंद घेतली.

विषय क्रमांक :- १ दिनांक १२.०८. २०१८ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

मंडळाचे कार्यवाह श्री. प्रसाद ठकार यांनी इतिवृत्त वाचन केले त्यावर चर्चा होऊन ते इतिवृत्त सभेने एकमताने मंजूर केले.

सुचक :- श्री. प्रभाकर संत    अनुमोदक :- श्री. विलास कुलकर्णी

आयत्या वेळच्या चर्चेदरम्यान श्रीयुत प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस सांगितले कि संस्थेचे गेली ४० वर्ष असलेले सनदी लेखापाल श्रीयुत माऊसकर यांचे अकस्मात निधन झाले आहे त्यामुळे संस्थेला नवीन सनदीलेखापाल नेमण्याची आवश्यकता आहे. सहकोषाध्यक्ष श्री. मांडके यांनी सुचविले कि सी.ए. श्री. संदिप वाघ, दादर

यांच्याकडून नेमणूकी सबंधी अर्ज आला आहे.श्रीयुत वाघ हे न्यासाच्या लेखा परिक्षणा सबंधीचे तज्ञ असून त्यांना प्राप्तीकर क्षेत्रामध्ये ा अनुभव दांडगा आहे. शिवाय ते दादरस्थित आहेत. त्यांची नेमणूक सनदी लेखापाल म्हणून आर्थिक वर्ष १८ – १९ साठी करण्यात यावी. चर्चेअंती खालील ठराव मंजूर करण्यात आला.

:- ठराव :-

**हि सभा श्रीयुत सी.ए. संदिप वाघ यांची आर्थिक वर्ष १८ – १९ साठी संस्थेचे सनदी लेखापाल म्हणून नेमणूक करत आहे. व त्यांचे मानधन वार्षिक रु.१५०००/- पंधरा हजार अधिक योग्य ते कर ही असेल**

**सूचक :- श्री. विवेक देशपांडे** **अनुमोदक :- श्री. विनोद मांडके**

कार्यवाह श्रीयुत प्रसाद ठकार यांनी सुचविले कि समाचार प्रसिध्दीचा वाढीव खर्चाचा विचार करुन समाचार मध्ये जास्ती जास्त जाहिराती व आर्थिक मदत मिळविण्याचा प्रयत्न सभासदांनी करावा. संलग्न संस्थांच्या कार्यक्रमाला त्या त्या विभागातील कार्यवाहांनी व संघटन सचिवानी उपसिीत राहावे जेणे करुन संलग्न संस्था बरोबरचे सबंध दुढ होतील.
डॉ. महाशब्दे यानी प्रत्येक सदस्यांना रु.५०००/- पर्यंत जाहिराती आणाव्यात अशी सूचना केली.

कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस सांगितले की धर्मादाय आयुक्तांकडे प्रलंबित असलेला चेंज रिपोर्ट मंजूर करण्यासाठी वकीलाची नेमणूक करण्यात यावी व त्यासाठी येणा-या खर्चास मंजूरी देण्यात यावी.
चर्चेअंती खालील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**ठराव ‘‘ ही सभा ॲड. अमोल थोरात यांची धर्मादाय आयुक्तांकडे प्रलंबित असलेल्या चेंज रिपोर्ट व इतर न्यायलयीन कामे बधण्यासाठी वकील म्हणून नेमणूक करीत आहे. व त्यासाठी येणा-या रु. १,००,०००/- एक लाख पयंतच्या खर्चास मंजूरी देत आहे.**

**सूचक :- श्री. प्रभाकर संत** **अनुमोदक :- श्री. सदानंद घोटीकर**

अध्यक्षांनी सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानले व सभा संपल्याचे जाहिर केले.

अध्यक्ष कार्याध्यक्ष कार्यवाह

सूचनेनुसार अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या कार्यकारी परिषदेची सभा रविवार दिनांक १८.०८.२०१९ रोजी सकाळी १०.३० मध्यवर्ती मंडळाच्या सभागृहात मा श्री.विलास विनायक जोशी अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली व श्रीयुत प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनाखाली बोलविण्यात आली होती. सभेस सदस्यांची संख्या अपुरी असल्याने कोरम होऊ शकत नसल्याने सदर सभा १ / २ नियमानुसार उशीरा सुरु झाली सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. श्री. विलास विनायक जोशी ( अध्यक्ष) | २. श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष) |
| ३..श्री. अरविंद हस्तेकर | ४. डॉ. लक्ष्मीकांत दाणी |
| ५. श्री.हेमकांत नारविलकर | ६. श्री. संजीव गंगाधर ब्रम्हे |
| ७. सौ.रोहिणी दिपक केसरी | ८. श्री. श्रीकांत ना. कानडे |
| ९.श्री. श्री.श्रीकांत सरडे | १०. श्री. कृष्णा जोशी |

मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी सभेची सुरवात करताना सांगितले की कोरम न भरल्यामुळे अर्धा तास उशीरा सुरु होत आहे.

श्री. प्रभाकर कुलकर्णी यानी सभेस सुरवात करताना सांगितले की या सभेच्या कार्यवाह सौ. रोहिणी तडवळकर आहेत त्यांच्या सूचनेनुसार नोटिस काढण्यात आली होती. परंतु पाऊस व गाडयांची अडचण होती त्यामुळे त्या सभेस उपस्थित राहू शकल्या नाहीत.

मंडळाचे अध्यक्ष श्री. विलासराव कुलकर्णी यांनी सभेची मंजूरी घेऊन श्री. प्रभाकर कुलकर्णी यांना सभेचा कार्यवाह म्हणून सभेचे कामकाज सुरु करण्यास परवांगी दिली.

**ठराव :-**

**कार्यकारी परिषदेच्या कार्यवाह सौ. रोहिणी तडवळकर यांच्या अनुउपस्थितीत मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांना सभेचे अध्यक्ष सभा चालविण्याचे सभेने एकमताने मंजूरी दिली.**

**सूचक :- श्रीकांत सरडे** **अनुमोदक :- श्री. कृष्णा जोशी**

श्री. प्रभाकर कुलकर्णी (कार्याध्यक्ष) यांनी सभेस उपस्थित असलेल्या सर्व कार्यकारी परिषद सदस्यांचे स्वागत केले आणि अनुपस्थित सदस्य ज्यांनी त्यांची अनुपस्थितीती कळविली आहे त्यांची नावे वाचून दाखविली.

१. श्री. शरद गंगाधर मुनीश्वर २. श्री. भाऊसाहेब रंगनाथ कुलकर्णी ३. श्री. भाऊराजे जहागीरदार ४. श्री. संकेत कुलकर्णी ५.सौ.मिनल गंधे ६. सौ.सुनदा आळतेकर ७.श्री. किशोर मंगळवेढेकर ८. सौ. ज्योती जोशी ९. श्री. अजितकुमार देशपांडे १०. श्री. सुनील पारखी ११. श्री. बळवंत अहंकारी १२. सौ. रोहिणी तडवळकर १३. सो. चारुशिला झिजोंर्डे १४. श्री. निश्किांत बुधकर १५. श्रीमती प्रज्ञा हरहरे १६. श्री. शशिकांत विष्णू चंद्रचूड १७. श्री. जयंत देशपांडे १८. श्री. शरद जोशी १९. श्री. शतनु चौधरी २०. संजीव घळसासी सभेने याची नोंद घेतली.

विषय क्रमांक :- **१**

**दिनांक ११.०११. २०१८ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.**

**सभेचे कार्यवाह श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेचे इतिवृत्त वाचन केले त्यावर सादक बादक चर्चा होऊन सभेने एकमताने इतिवृत्त वाचन मंजूर केले**

**सूचक :,श्री. अरविंद हस्तेकर** **श्री. संजय ब्रम्हे**

**मंडळाचे विश्वस्त श्री. संजय ब्रम्हे यांनी सभेच्या सुरुवातीला हिशेबा संर्दभात प्रश्न केला कि संस्थेला मयूर कॅटरर्स यांच्याकडून रु. १५.०००००/- पंधरा लाख आपण काय म्हणून घेतो. त्यावर मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि ती रक्कम रॉयल टी म्हणून स्विकारली जाते.प्रोफेशन वाढवून घ्यावे असे सांगितले. श्री. विनोद मांडके यांनी सांगितले कि आम्ही प्रोफेशन वाढवून घेतले आहे.**

मंडळाचे विश्वस्त श्री.श्रीकांत सरडे यांनी विचारले कि संस्थेचे कार्यक्रम होतात किंवा त्यांचे ठराव किंवा इतर कार्यक्रम काय होतात ती आम्हा विश्वस्त मंडळाला माहीती आपण कळवावी म्हणजे आपल्या संलग्न संस्थेला माहिती वेळेत देता येईल असे त्यांनी आपले मत सभेस व्यक्त केले.

मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास विनायक जोशी यांनी सांगितले कि संलग्न संस्थांचे जे कार्यक्रम असतात त्या संस्थेच्या कार्यक्रमात मी व कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी उपस्थित राहून संस्थेने केलेल्या कामाचा आढावा प्रत्येक संस्थेस देत असतो. आपण सुध्दा आपल्या संस्थेचे कार्यक्रम आम्हाला कळविल्यास आम्ही आपल्या संस्थेच्या कार्यक्रमात उपस्थित राहून संस्थेने केलेल्या उपक्रमाचे मार्गदर्शन आपल्या सर्व सभासदांस सविस्तर देता येईल.

श्री.श्रीकांत सरडे यांनी सांगितले कि आम्हाला सभेचे इतिवृत्त पाठवावे म्हणजे सभेस येताना विषयाचा अभ्यास करता येतो. त्यावर मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि मागच्या वेळी सुध्दा आपण सर्व सदस्यांना इतिवृत्त पाठविले होते. तसेच सभागृह बाहेर कॅमेरे लावावे त्यामुळे सुरक्षेच्या दुष्टीने चांगले राहिल श्री. विलास जोशी त्यावर श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि संस्थेने यापूर्वीच कॅमेरे लावले आहेत.

सूचक :- लक्ष्मीकांत दाणी अनुमोदक :- श्रीकांत कानडे

विषय म्रमांक :- २ दिनांक ११.११. २०१८ ते आजतागायत झालेल्या कार्याचा कार्यकारी मंडळाकडून प्राप्त झालेल्या अहवालाची नोंद देताना मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस अहवालाची संकल्पना देताना सांगितले कि मंडळाडाच्या शैक्षणिक, पारितोषिक. कर्जाऊ या शैक्षणिक उपक्रमा करता मंडळाने एक समिती नेमली आहे.परंतु सर्वच सदस्य बाहेरगावचे असल्यामुळे कोणला वेळ मिळतो किंवा मिळत नाही तर मुंबईला येणे जमत नाही या सर्व गोष्टीचा विचार करुन श्री. दिपक कुलकर्णी डोबिंवली व मी श्री. प्रभाकर कुलकर्णी विलेपार्ले आम्ही शैक्षणिक उपक्रमाबदल एक योजना तयार केली आहे. जुन्या सर्व लोकांनी देणग्या दिल्या आहेत. परंतु त्या फार कमी आहेत म्हणून आम्ही जी पारितोषिके आहेत ती सर्व एकत्र करुन विदयार्थ्यांना जास्ती जास्त पारितोषिके कशी देता येतील असे आम्ही ठरविले. शैक्षणिक मदतीचा एकूण फंड रुपये ३,००,०००/- तीन लाख आहे. परंतु आम्ही रुपये एक लाख पंचवीस हजाराची बक्षिसे देण्याचे ठरविले तसेच ज्या विदयार्थ्यांना ९०% ८० टक्के पदवीधर बी. कॉम बी. ए १२ वी १० वी अशा मुलांना देण्यात येणार आहे.

अकोला संस्था दरवर्षी पारितोषिके अकोला जिल्हयातील सर्व विदयार्थ्यांना वाटतात त्यामध्ये मध्यवती मंडळाची मदत व त्यांची मदत अशा प्रकारे वाटली जाते.

श्री. विलास जोशी अध्यक्ष यांनी सांगितले कि आपल्याकडे नाशिक, सोलापूर, कराड, सांगली नांदेड व इतर संस्थेची यादी आलेली आहे त्याप्रमाणे यादी तयार केली आहे. त्याप्रमाणे सर्व विदयार्थ्यांना पारितोषिके देण्यात येणार आहे.

आपल्याकडे जो फंड उपलब्ध आहे त्या फंडातूनच आपण विदयार्थ्यांना पारितोषिके. शैक्षणिक मदत. कर्जाऊ शिष्यवृत्ती देणार आहोत त्यामध्ये विदयार्थ्यांस कमीत कमी ९०% ८० टक्के पदवीधर बी. कॉम बी. ए १२ वी १० वी अशा मुलांना देण्यात येणार आहे. असे मंडळाचे कार्याध्यक्ष यांनी सभेस सांगितले.

मंडळाचे विश्वस्त श्री. लक्ष्मीकांत दाणी यांनी सभेस सूचना केली की संस्थेचे जे नियम असतील त्याप्रमाणे पारितोषिकाचे वाटप सर्व विभागाना वाटून देण्यात यावे.

मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी सांगितले कि हे सर्व वाटप करीत असताना मध्यवर्ती मंडळाचे सभासद ज्या ज्या भागात ज्यानी वाढविले आहेत. त्या विभागाचा विचार करण्यात यावा तसेच ज्या भागात सभासद संख्या कमी असेल त्या त्या सदस्यांनी आपल्या भागात मंडळाचे सभासद मोठया प्रमाणत वाढवून आपल्या मंडळाची कार्य माहिती त्या सभासदांना देण्यात यावी.

श्री. लक्ष्मीकांत दाणी यांनी यावर सांगितले कि प्रत्येक सदस्याने कमीत कमी ५ सदस्य वाढविले पाहिजे

श्री. विलास जोशी यांनी सभेस सांगितले कि संलग्न संस्था विचार करता कराड शाखेकडे गेलो असता श्री. रामचंद्र आफळे यांनी अनेक लोक आमच्या भेटीसाठी थांबले होते. श्री. जोशी यांनी त्या सर्व कराड सभासदांचे स्वागत केले व त्यांना सांगितले कि आपण सर्व जण मध्यवर्ती मंडळाचे सभासद नोंदणी करा त्याप्रमाणे रिड शाखेचे कार्याध्यक्ष रामचंद्र आफळे यांनी आता पर्यत २०० सभासद वाढविले आहे त्याबदल त्यांचे अभिनंदन आपण कार्यकारिणीवर आल्यापासून जवळ जवळ ८०० सभासद नवीन झाले आहेत. मुलूंड संस्थेला २५ अर्ज दिले आहेत परंतु आज र्प्यत त्यांनी अर्ज पाठविले नाही.

मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस शैक्षणिक / कर्जाऊ शिष्यवृत्ती / पारितोषिक या सर्व बाबतीतील अर्ज आपण तयार केले आहेत परंतु आजच्या सभेत बरेच लोक अनुउपस्थित असल्यामुळे काही निर्णय घेता येत नाही तेव्हा ४ ते ५ दिवसानी एक समितीची बैठक बोलवून त्याच्या निर्णय आपणस घेता येईल सर्व संस्थांनी आपले अर्ज ३०.०९.२०१९ पर्यत आपले अर्ज मध्यवर्ती मंडळाच्या कार्यालयात पाठवून देण्यात यावे तसेच ज्या ज्या विर्दर्भातील संस्थेला मंडळाने मदत केली आहे ते सभासद सढळ हाताने संस्थेला मदत करीत आहेत..

मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. विलास विनायक जोशी यांनी मध्यवर्ती मंडळातील एका उपक्रमा बाबत माहिती देताना सांगितले. मंडळात विष्णूसहस्त्र कार्यक्रम झाला त्यावेळी त्यांचे सदस्य श्री. देशपांडे यांनी मध्यवर्ती मंडळाचे कार्य पाहून रुपये १५.०००/- पंधरा हजाराची देणगी मंडळास दिली. संस्थेचे कार्य तसेच संस्था ज्या पध्दतीने कार्यक्रम करते त्याची लोकांना आवड निर्माण झाली आहे मंडळ सामाजिक. धर्मिक. कला. शैक्षणिक क्षेत्रात उत्तम कामगिरी करते समाजाला तसेच इतर समाजाला सुध्दा संस्था मदत करत असते हे सर्व पाहून मी हि देणगी आपणास देत आहे असे श्री. देशपांडे यांनी श्री. विलास जोशी यांना सांगितले. त्याबदल श्री. जोशी यांनी मंडळाच्या वतीने त्यांचे अभिनंदन केले.

श्री. प्रभाकर कुलकर्णी कार्याध्यक्ष यांनी सुध्दा मंडळाला ज्या पध्दतीने देणग्या येत आहेत त्याबदल सभेला माहिती दिली मंडळाचे कार्यकारीणी सदस्य श्री. विवके देश्पांडे यांनी सुध्दा ८४-८५ साली मंडळाकडून शिष्यवृत्ती घेतली होती मंडळाने आपणस त्यावेळी केलेला मदतीचा हात फार मोठा होता असे श्री. देशपांडे यांनी सांगितले म्हणून आपली एक जबाबदारी या नात्याने श्री. विवके देशपांडे यांनी संस्थेला रुपये १.००.०००/- एक लाख फक्त शैक्षणिक कार्यासाठी देणगी देत असल्याचे त्यांनी कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांना सांगितले मंडळाच्या वतीने त्याना स्मृति चिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला असेच अपले सहकार्य राहू दे असे श्री. कुलकर्णी यांनी सांगितले.

मध्यवर्ती मंडळाच्या कार्याचा विस्तार महाराष्ट्रात फार मोठयाप्रमाणत वाढत आहे. मंडळाच्या कार्याची माहिती मंडळाच्या मासिकामधून तसेच मंडहाच्या वेबसाईट वरुन सभासदांना वेळोवेळी मिळत आहे असेच मंडळाच्या मासिकामधून माहिती घेऊन आपले पुणे येथील सभासद कर्नल श्री. अत्रे यांनी मंडळाच्या कार्याची दखल घेऊन मंडळास रुपये

१.००.०००/- एक लाख फक्त शैक्षणिक कार्यासाठी देणगी देत असल्याचे त्यांनी कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांना सांगितले मंडळाच्या वतीने त्याना स्मृति चिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला असेच अपले सहकार्य राहू दे असे श्री. कुलकर्णी यांनी सांगितले. श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि संस्था फार जुनी आहे मागील लोकांची पुण्याई असल्यामुळे आज आपण या ठिकाणी आहोत. यापुढे सुध्दा आपण सर्वांनी एकजुटीने संस्थेचे कार्या पुढे नेऊ असे आपले मत सभेस सांगितले.

नांदेड विभागाचे सदस्य श्री. कृष्णा जोशी यांनी संस्थेस विनंती केली मध्यवर्ती मंडळाचे सभासद असलेल्या सभासदांच्या मुलांना तसेच देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजातील सर्व मुलांना आपण शिष्यवृत्ती देणार आहात का त्यावर श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि आपण सर्वांना मदत देणार आहोत परंतु ज्या संस्थेने त्या विदयार्थ्याची शिफारस केली आहे त्या संस्थेचा दाखला असणे गरजेचे आहे तेव्हा आपणाकडून येणाऱ्या अर्जावरती आपला दाखला त्यासोबत जोडावा असे श्री. कुलकर्णी यांनी सभेस सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी सांगितले कि समाजातील अल्प उत्पन्न असलेल्या विदयार्थ्यांना मदत मिळावी. यावर श्री. प्रभाकर कुलकर्णी कार्याध्यक्ष यांनी सांगितले समाजातील हुशार व गरजु विदयार्थ्यांना संस्था अनेक वर्षे मदत करीत आहे ती याही वर्षी मदत करेल विदयार्थ्यास ८०% ९०% टक्के मार्क्स असावेत असे श्री. कुलकर्णी यांनी सभेस सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष श्री. विसा जोशी यांनी सांगितले ग्रामीन भागातील तोकांना जास्ती जास्त मदत करावी. ठाणे संस्थेत शैक्षणिक मदतीसाठी २६ अर्ज आले होते परंतु ठाणे संस्था समक्ष असल्यामुळे आम्ही आलेल्या अर्जांना एकहाती मदत केली

श्री. संजय ब्रम्हे कार्यकारीणी सदस्य यांनी शैक्षणिक उपक्रमाचा विषय असल्यामुळे त्यांनी सांगितले कि मुंबईतील इतर संस्था सुघ्दा परदेशात जाणाऱ्या विदयार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती देतात व मुलांना परदेशात पाठविले जाते आपण सर्वांनी आपल्या ज्या काही संस्था ओळखीच्या असतील अशा सर्व संस्थांकडे आपल्याकडे आलेले अर्ज पाठविले तर मुलांचा फायदा होईल कारण आपण सुध्दा त्यांना मदत देत आहोत शिवाय आपल्या माध्यमातून सुध्दा त्याना मदत मिळेल त्यामुळे संस्थेचे कार्य तळगळापर्यंत जाईल असे त्यानी आपले मत व्यक्त केले.

श्री. ब्रम्हे यांनी शैक्षणिक कार्यासाठी रुपये ५०००/- धनादेश मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास विनायक जोशी यांच्याकडे सर्पूद करण्यात आला. श्री. ब्रम्हे यांचे सर्व कार्यकारी परिषद व कार्यकारी मंडळाने अभिनंदन केले.

संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि गेली अनेक वर्ष आपली संस्था शैक्षणिक मदत कर्जाऊ शिष्यवृत्ती परदेशात जाणा-या विदयार्थ्यास मदत करत आहे.

संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी जे विदयार्थी परदेशात शिक्षण घेण्यासाठरी गेले होते. त्यांना सुध्दा संस्थेने परदेशी कर्जाऊ शिष्यवृत्ती दिलेली आहे. त्यापैकी कित्येक विदयार्थी वर्गाने मंडळास पैसे परत केले नाही त्यामुळे रुपये १.५००००/- एक लाख पन्नास हजार आज पर्यंत बाकी आहेत. म्हणून आता आपण परदेशी कर्जाऊ शिष्यवृत्ती देताना प्रत्येक विदयार्थी वर्गाकडून दोन जामिनदार व ५ पोस्ट डेटेट चेक घेणे बंधनकारक करावे. म्हणजे संस्थेचे पैसे परत येण्यास वेळ लागणार नाही. कारण शेवटी संस्थेचे पैसे असल्याने त्याची काळजी घेणे आपल्या कार्यकारी मंडळाची जबाबदारी आहे असे श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस आपले मत व्यक्त केले.

कार्यकारिणी सदस्य श्री. लक्ष्मीकांत दाणी यांनी सभेस आपले विचार मांडताना सांगितले जे विदयार्थी शिष्यवृत्ती साठी अर्ज करतील ते विदयार्थी मध्यवर्ती मंडळाचे सभासद असणे महत्वाचे आहे. त्यांचा विचार प्रथम करण्यात यावा

संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी शिष्यवृत्ती बदल माहिती देताना सभेस सांगितले कि बेळगाव संस्थेचे कार्याध्यक्ष व आपले कोषाध्यक्ष कै. प्रदीप कुलकर्णी दरवर्षी २०० ते २५० सभासद अर्ज आणत असत त्यामुळे बेळगाव येथील विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत होती. श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांना विचारले कि शैक्षणिक समिती मध्ये कोणी काम करण्यास तयार असल्यास आपले नाव सांगावे. त्यावर ठाणे येथील श्री. संजय ब्रम्हे यांनी आपण शैक्षणिक समिती मध्ये काम करण्यास तयार असल्याचे सांगिंतले.

संस्थेचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी कार्यकारी परिषदेचे सदस्य श्री. संजय ब्रम्हे यांची ओळख सर्व कार्यकारी परिषदेला करुन दिली श्री. ब्रम्हे हे चार्टड अकाऊंटंट आहेत ते अनेक संस्थावरती काम करतात अनेक सार्वजनिक संस्थांचे लेखा परिक्षण करतात आताचे ते अमेरीकेमध्ये जाऊन आले. आपले कोषाध्यक्ष श्री. प्रदीप कुलकर्णी यांचे आताच दुखद निधन झाले आहे तेव्हा श्री. विनोद मांडके यांना सहकार्य करण्यासाठी श्री. ब्रम्हे साहेबानी श्री. मांडके यांना लेखा परिक्षण विभागात सहकार्य करावे असे श्री. विलास जोशी यांनी सभेस सोंगितले.

मंडळाने केलेल्या कामाचा अहवाल देताना श्री. विलास जोशी यांनी सांगितले कि बाहेरगावाहून येणा-या सभासदांच्या सूचनेनुसार आगाशे कक्ष व्यवस्था करण्यात आली. नवीन संडास बाथरुम आतमध्ये बांधण्यात आले एसी लावण्यात आले पाण्याची सोय फर्निचर अशा अनेक सोयी सभासदांसाठी करण्यात आल्या त्यासाठी झालेल्या खर्चास आपली सर्वांची मंजूरी आहे का असे श्री. विलास जोशी यांनी कार्यकारी परिषदेला विचारले असता कार्यकारी परिषदेने सांगितले कि हा सर्व खर्च सभासदांच्या सुविधेसाठी असल्यामुळे सभेने एकमताने खर्चास मंजूरी दिली.

ठरावः- आगाशे कक्ष रुम नं. १५ यासाठी झालेल्या दुरुस्ती खर्चास हि सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.

सूचक :- श्री. श्रीकांत कानडे अनुमोदक :- श्री. अरविंद हस्तेकर

संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि केलेल्या कार्याची व कामाचा अहवाल कार्यकारी परिषदेला देणे हे आमचे कर्तव्य आहे. आपणास अधिक माहिती हवी असल्यास कार्यालयात उपल्बध आहे.

संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि मंडळाचे मुखपत्र असलेले समाचार मासिकासाठी दर महिना रुपये ३७०००/- सदतीस हजार खर्च येतो. समाचारचा खर्च आपल्या कॉरपस फंडातून आपण करीत आहोत. त्यावर मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी सभेस सांगितले कि समाचार साठी वापरण्यात येणारा कागद पूर्वी पेक्षा खूप चांगल्या कॉलीटीचा वापरला जात आहे. प्रिंटिंग चांगल्या प्रकारची केली जात आहे त्यामुळे खर्च वाढत आहे. तेव्हा प्रत्येक कार्यकारी सदस्यांने आपल्या विभागातून एक जाहिरात समाचार अंकासाठी आणावी असे सांगितले. तसेच ज्या संस्थेचे अंक मोठया प्रमाणत परत येत आहेत त्यां संस्थांना आम्ही पत्र यादी पाठविली आहे पण आजपर्यंत कोणत्याही संस्थेने उत्तर दिले नाही. ज्या ज्या विभागातील अंक परत येत आहेत त्यांची नावे समाचार यादी मधून कमी करण्यात आली आहेत.

कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि पोस्टाने स्पेशल डिस्कॉंट दिला आहे आपला अंक २५ पैशात जातो त्याकरीता दरमहिन्याच्या १५ तारखेला अंक पोस्टात गेला पाहिजे. त्यासाठी आम्ही समाचार अंक वेळेत पोस्आत जाण्यासाठी पत्ते लावणे पोस्टात नेणे विभागवाईज करणे गट्टे बांधणे हि सर्व कामे करण्यासाठी आम्ही हे काम एका कॉन्ट्रक्टरला दिले आहे.

श्री. कृष्णा जोशी यांनी सांगितले कि नांदेड विभागात काही ठिकाणी अंक मिळत नाही तेव्हा अंकाची चौकोशी करावी श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि आपल्या विभागातील पोस्ट ऑफिस मध्ये एखादी तक्रार करा म्हणजे नेमके काय होते ते आम्हाला कळेल आम्ही सुध्दा आमच्या बाजून पोस्टात त्याबदल चौकोशी करतो. असे सांगितले.

श्री. प्रसाद ठकार कार्यवाह यांनी सभेस आपले मत व्यक्त करताना सांगितले कि उदयोजकांची माहिती समाचार अंकांत प्रसिध्द करण्यात येईल तेव्हा आपआपल्या भागतील उदयोजकांची माहिती संसीला पाठविण्यात यावी

श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि अनेक संलग्न संस्था आप आपल्या भागातील उपक्रमाची माहिती वेळेत संस्थेला देत नाही ती पाठवावी म्हणजे आपणास समाचार अंकात प्रसिध्दी देता येईल.

सन २०१८ – २०१९ वार्षिक अहवाल तयार करताना श्री. विनोद मांडके व श्री. ब्रम्हे यांनी एकत्र बसून चर्चा करावी असे श्री. विलास जोशी यांनी सभेस सांगितले.

ठराव :- संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस सूचित केले कि कार्यकारी परिषदेला कार्यकारी मंडळाने घेतलेले निर्णय सांगणे गरजेचे आहे.

मंडळाचा वार्षिक अहवाल सन १८ -१९ चे ऑडीट श्री. दिपक वाघ पहात आहेत सर्व अहवाल फायनल स्टेज मध्ये आहे २० ते २४ दिवसात सर्व काम पूर्ण होईल असे श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस सांगितले.

मंडळाचे कोषाध्यक्ष कै. प्रदीप कुलकर्णी हयात नसल्यामुळे श्री. ब्रम्हे आपणास अहवालासाठी व हिशोब तपासणीसाठी योग्य सहकार्य करतील असे श्रीशी यांनी सभेस सांगितले. श्री. ब्रम्हे यांना सभेने विचारले असता त्यांनी सहकार्य व काम करण्यास माझी तयारी असल्याचे सांगितले त्यावर सभेने त्यांचे अभिनंदन केले.

श्री. लक्ष्मीकांत दाणी यांनी समाचार मसिकाची पाने वाढविता येतात का असे विचारले त्यावर श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि आपण पूर्वी पासून १६ पानाची मंजूरी घेतली आहे त्यामुळे आपणास जादा पाने छापता येत नाही.

श्री. ब्रम्हे यांनी विनारले कि आपण समाचार मासिकात जाहिरातीचे दर छापले आहेत का यावर श्री. प्रसाद ठकार कार्यवाह यांनी सांगितले कि आपण अनेक वेळा जाहिरात दर मासिकामध्ये प्रसिध्द केले आहेत.

श्री. अरविंद हस्तेकर यांनी आपले मत व्यक्त करताना सांगितले कि वार्षिक अहवालास मंजूरी देताना त्याची कॉपी कार्यकारी सदस्यांना देण्यात यावी म्हणजे त्यावर चर्चा करता येईल.

श्री. प्रभाकर कुलकर्णी कार्याध्यक्ष यांनी सभेस सांगितले कि ज्या सदस्यांच्या सूचना असतील ते मंडळ आपणास सांगेल.

श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि दुस-या मजल्यावरील सभागृहातील छप्पर याला गळती लागली होती त्यासाठी श्री. विलास जोशी यांनी त्या छप्पराची पाहणी करुन कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी व इतर सदस्य यांच्याशी चर्चा करुन त्यासाठी येणा-या खर्चाची माहिती घेतली व तातडीने कारागीर बोलवून वरील छप्पर दुरुस्त करुन घेतले त्यासाठी रुपये ३०,०००/- तीस हजार ऐवढा खर्च झाला.

सभागृहाच्या तळमजल्या बाहेरील जागा अतिश्य खराब अवस्थेत होती त्यामुळे सभागृह ब-याच वेळ कोण बुक करीत नव्हते त्यासाठी श्री. अविनाश पाटील आपले कॉन्ट्रेक्टर यांच्यांशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले कि आपला बाहेरील परिसर सुंदर करा आपल्या बाहेरील परिसरात बरेच खड्डे आहेत त्यामुळे सभागृह बुक होत नाही. त्यामुळे सभागुह समितीने त्यावर विचार करुन संपूर्ण परिसरात लादीकरण करण्याचे ठरविले त्याप्रमाणे श्री. सदानंद घोटीकर यांनी अनेक टेंडर मांगविली पण त्याचा खर्च पाहता तो खूप होता म्हणून श्री. विलास जोशी यांनी पुढाकर घेऊन त्यांनी आलेल्या टेंडरच्या २५० ते २०० स्केफूटा पेक्षा रुपये १५० एक्शे पन्नास रुपये स्केफूटाने काम करण्यास एक कॉन्ट्रेक्टर तयार झाला श्री. जोशी यांनी सामाजिक संस्थेचे काम आहे असे सांगितले त्यावर तो कॉनट्रेक्टर तयार होऊन श्री. विलास जोशी यांनी संपूर्ण तळमजला याचे लादीकरण करुन त्या जागेची शोभा वाढविली.

ठराव :- सभागृहाच्या बाहेरील जागेत लादीकरण करण्यात आलेल्या खर्चास हि सभा सर्वांमते मंजूरी देत आहे

सूचक :- श्री. संजय ब्रम्हे अनुमोदकः- श्री. अरविंद हस्तेकर

आगाशे कक्ष रुम नं. १५ हा कार्यकारी मंडळ व कार्यकारी परिषद सभेसाठी येणाऱ्या सदस्यांसाठी सभे दिवशी वापरता येतो परंतु सभे व्यतिरिक्त जे सभासद आपली मुले व इतर लोक हया ठिकाणी पाठवितात त्यांना मंडळाच्या नियमाप्रमाणे भाडे भरणे बंधन कारक आहे. जे लोक मुबईत आपल्या काही कामासाठी येतात त्यांनी जे मंडळाने भाडे ठरविले आहे ते भरुन रहावे असे श्री. विलास जोशी यांनी सभेस सांगितले मंडळास लाईट बिल, सापाफाई पाणी बिल इत्यादी खर्च येत असतात त्यामुळे आपण आपले योग्य देयक मंडळास भरावे असे त्यांनी सांगितले.

श्री. विनोद देशमुख यांनी सांगितले कि आजच्या सभेला बरेच सभासद गैर आहेत त्यावर श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि ब-याच भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे तसेच अनेक गाडया बंद असल्यामुळे लोक सभेला आले नाहीत.

कार्यकरी मंडळ किंवा कार्यकारी परिषद सदस्य हे संस्थेच्या कामाकरीता प्रवास करीत असले तरच प्रवास भत्ता देता येईल असे श्री. विलास जोशी यांनी सभेस सांगितले.परंतु तो सदस्य त्याच्या इतर कामासाठी आला असेल तर त्याला प्रवास भत्ता मिळणार नाही.

श्री. विनोद देशमुख यांनी विचारले कि आगाशे कक्ष मध्ये येणा-या सदस्यांची नोंद आपण घेतो का यावार संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि आपण एक रजिस्टर ठेवले आहे त्यामध्ये त्याचे नाव गाव फोन नंबर लिहून घेतो

अध्यक्ष व कार्याध्यक्ष तसेच कार्यकारी सदस्य यांच्या विनंती नुसार श्री. ब्रम्हे याना आर्थिक व शैक्षणिक समिती मध्ये काम करण्याची परवांगी सभेने दिली त्याबदल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेला माहिती कि सन १९७० साली शैक्षणिक मदत मंडळाकडून घेतली होती ती व्यक्ती आज आपणास जर्मनी मधून देणगी पाठविणार आहे त्यासाठी त्यांचा फोन आला आहे. हे ऐकून सर्व सदस्यांनी देणगीदराचे अभिनंदन केले.

श्री. अरविंद हस्तेकर यांनी सभेला आपले विचार व्यक्त केले कि ज्या वेळी सभागृह गेले नसेल तेव्हा ते धार्मिक कार्याला डिसकॉन्ट देऊन देण्यात यावे. त्यामुळे सभागृहाची प्रसिध्दी होईल. त्यावर मंडळाचे अध्यक्ष यांनी सांगितले कि मंडळाने अनेक वेळा धार्मिक कार्यासाठी २५ टक्के सूट देऊन सभागृह भाडयाने दिले आहेत.

मध्यवर्ती मंडळाच्या अनेक जुन्या सभासदांनी देणग्या दिल्या आहेत त्या सर्व सभासदांना एकत्र करुन त्यांचा आपल्या सभागृहात सत्कार करण्यात यावा म्हणजे त्यांच्या घरच्या लोकांना त्याबदल माहिती मिळेल व देणग्या वाढतील असे श्री हस्तेकर यांनी आपले विचार मांडले.

श्री. हस्तेकर मध्यवर्ती मंडळाने युवा शाखा तयार करावी त्यासाठी डोंबिवली युवा शाखेचे श्री. मानस पिंगळे आपणास सहकार्य करतील अशी माहिती दिली त्यावर श्री. विलास जोशी यानी सांगितले कि श्री. हस्तेकर आपण यात पुढाकार घेऊन युवा शाखेचे काम वाढवावे आम्ही सर्व आपल्या बरोबर आहोत..

श्री. हस्तेकर यांनी संलग्न संस्था समितीसाठी व संस्थासाठी सूचना केली की आपआपल्या भागात संलग्न संस्थेच्या वतीने वि समितीच्या वतीने जे कार्यक्रम होतील त्यास त्या भागातील पदाधिका-यांनी त्या कार्यक्रमात उपस्थित राहून मध्यवर्ती मंडळाच्या कार्याची माहिती द्यावी महणजे मंडळाच्या कार्याची माहिती प्रत्येक संस्थेस समजली जाईल.

मध्यवर्ती मंडळाच्या जेवढया संलग्न संस्था आहेत त्या सर्व संस्थेचया अध्यक्ष कार्यवाह यांच्या नाव पत्याची एक यादी तयार करण्यात यावी त्यासाठी प्रत्येक संस्थेने आपला पत्ता फोन नंबर अध्यक्ष, कार्यवाह याची माहिती मध्यवर्ती मंडळाकडे पाठविण्यात यावी असे श्री. हस्तेकर यांनी सभेस सांगितले.

मंडळाचे कार्यवाह श्री. प्रसाद ठकार यांनी सभेस शैक्षणिक मदती संबंधी माहिती देताना सांगितले कि श्री. ब्रम्हे हे सर्व संस्थांना देणगी देतात त्याप्रमाणे त्यांनी मध्यवर्ती मंडळास श्री. ब्रम्हे यांनी रुपये पाच हजारचा धनादेश मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांच्या हस्ते देण्यात आला सर्व सदस्यांनी श्री. ब्रम्हे यांचे अभिनंदन केले.

मध्यवर्ती मंडळाच्या सभागुहात अनेक धार्मिक व जेष्ठांचे कार्यक्रम झाले आहेत त्यापैकी झालेले कार्यक्रम लघुपारायण दासनवमी तसेच दादर संस्कृर्ती मंच यांच्या विद्यमाने अनेक कार्यक्रम सभागृहात संपन्न झाले त्यामुळे संस्थैच्या सभागृहाची प्रसिध्दी झाली व कार्यक्रमास उत्तम प्रतिसाद मिळाला. असे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यानी सभेस सांगितले.

मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी सांगितले कि सर्व संस्थांना आपण २५ टक्के सवलम देऊन आपले सभागृह देत आहोत. सभागृहाचा सापसफाई लाइट बिल पाण्याचे बिल ऐसी याचा खर्च आहे त्यामुळे सभागृह कोणालाही फुक्ट देता येत नाही.

विषय क्रमांक :- ३ आपण आपल्या विभागात केलेल्या कार्याची तसेच सभासद संख्या वाढीसाठी केलेल्या उपक्रमाची माहिती देणे

वरील विषया सदंर्भात अनेक कार्यकारी सदस्यांनी सुवक शाखेचा विचार करू असे श्री. विलास जोशी यांनी सांगितले. युवक शाखा आपण तयार करु त्याकरीता आम्ही प्रत्येक संस्थेच्या कार्यक्रमात उपस्थित असतो व त्या संस्थेत कित्ती युवा पिढी कार्यरत आहे याचा आढावा घेत असतो. असे सभेस सांगितले. तसेच सर्व कार्यकारी मंडळ व कार्यकारी परिषद यांची नावे पत्ते दूरध्वनी क्रमांक वार्षिक कॅलेडर मध्ये प्रसिध्द केले आहेत त्यामुळे सर्व सदस्यांची माहिती सर्व सभासदांना मिळते काही नवीन सदस्यांची नावे पुढील वर्षी

प्रसिध्द होणा-या कॅलेंडर्स मध्ये छापली जातील असे श्री. विलास जोशी यांनी माहिती दिली.

श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी यांनी मध्यवर्ती मंडळाच्या कार्याची व उपक्रमाची माहिती देताना सांगितले संस्थेला अनेक जुन्या सभासदांनी देणगी दिल्या आहेत या सर्व सभासदांच्या कुटूंबाला एकदा बोलवून त्यांचा सत्कार मंडळाच्या सभागृहात करण्याचा मानस आहे.

श्री. श्रीकांत सरडे मुलूंड यांनी मंडळाच्या मुख पृष्ठ असलेल्या समाचार मासिक अंक वेळेत मिळाला व त्यातील मंजकूर सुध्दा छान असतो. त्यामध्ये श्री. दाणी यांचे प्रत्येक अंकात लेख फार छान असतात तेव्हा त्या अंकाचा एक विशेष अंक काढावा व त्यासाठी जाहिराती प्रत्येक सदस्याने मिळवाव्यात म्हणजे संस्थेची आर्थिक बाजू भक्क्म होईल. तसेच समाचार अंकात पहिल्या पानावार अध्यक्ष, कार्याध्यक्षए कार्यवाह यांचे फोन नंबर छापावे म्हणजे प्रत्येक सभासदांना त्यांची माहिती मिळेल.

श्री. महाशब्दे यांनी सभेस आपले मत व्यक्त करताना सांगितले कि मागील सभेत मी एक सूचना केली होती की प्रत्येक कार्यकारी सदस्याने समाचार या मासिकासाठी दोन जाहिराती आणाव्यात असे आपणस सांगितले होते. पण आज पावेतो कोणीही सदस्याने जाहिराती मंडळास जाहिराती दिलेली नाही.

श्री. लक्ष्मीकांत दाणी मंडळाच्या यादीमध्ये प्रत्येक संलग्न संस्थेनचे पदाधिकारी आहेते त्या प्रत्येकाने मध्यवर्ती मंडळाचे सभासद वाढविण्यासाठी प्रत्येक पदाधिका-याने ५ सभासद नवीन आणवेत तसेच मंडळाचे मुख पत्र असलेल्या समाचार मासिकात संलग्न संस्थेच्या उपक्रमाची माहिती सुध्दा आपणास देता येईल.

मध्यवर्ती मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस आपल मत व्यक्त करताना सांगितले की आपल्या संलग्न संस्था ज्या भागात आहेत त्या ठिकानी पूर आला आहे अशा पूरग्रस्ताना मदत करणे हे आपले कर्तव्य आहे. तसेच संलग्न संस्था विलेपार्ले संस्था सुध्दा हा विषय घेऊन त्यांना मदत करणार आहे तेव्हा मध्यवर्ती मंडळाने सुध्दा या कामात आपले योगदान द्यावे असे त्यांनी सभेस सांगितले.

परदेशातील मुलांच्या पालकांचे शिबीर सैनिकांचा सत्कार करण्यात यावा .

प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि आम्ही

# सत्यप्रत

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या दिनांक १२ .०५. २०१९ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेत खालील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव**

‘‘ ही सभा मुंबई उच्च न्यायलय / लघुवाद न्यायलय तसेच इतर सर्व न्यायालयामध्ये संस्थेतर्फे दाखल करण्यात येणा-या भाडेकरु व इतर अशीलांच्या विरुध्द सर्व न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या दाव्यांमध्ये संस्थेतर्फे साक्ष देण्याचे, आवश्यक न्यायालयीन कारवाई करण्याचे, संस्थेतर्फे आवश्यक ती कागदपत्रे व दस्तऐवज सादर करण्याचे तसेच न्यायालयीन निर्णयाची पूर्तता करण्याचे अधिकार कार्यकारी मंडळातील खालील सदस्यांना देत आहे.

१.श्री. विलास विनायक जोशी    २. श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी    ३.श्री. प्रसाद जनार्दन ठकार

४.श्री. दिपक कुलकर्णी    ५. श्री. महेंद्र गंधे    ६.श्री. शरद पां. पारसनीस

आणि श्रीयुत. विकास दिनानाथ माने - संस्थेचे व्यवस्थापक

सूचक :- श्री. प्रभाकर अनंत संत    अनुमोदक :- श्री. विलास शंकर कुलकर्णी

श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी
(कार्याध्यक्ष)
अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबई

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दिनांक १२.०५.२०१९ रोजी सकाळी १०.३० मध्यवर्ती मंडळाच्या सभागृहात मा श्री.विलास विनायक जोशी अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली व श्रीयुत प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

१. श्री. विलास विनायक जोशी ( अध्यक्ष)

२. श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष)

३. श्री. प्रदीप नारायण कुलकर्णी (कोषाध्यक्ष)
४. श्री. प्रसाद जनार्दन ठकार (कार्यवाह)
५. श्री. दत्तात्रय खंडेराव कुलकर्णी (कार्यवाह)
६. श्री. संजय मधुसूदन कुलकर्णी (कार्यवाह)
७. श्री. विनोद विठठल मांडके (सहकोषाध्यक्ष)
८. श्री. मधुकर रामराव कुलकर्णी (सदस्य)
९. सौ. अश्विनी हेमकांत नारविलकर (सदस्य)
१०. श्री. विवेक कृष्णा देशपांडे ( सदस्य)
११. श्री. विलास शंकर कुलकर्णी (सदस्य)
१२. डॉ. हरी शंकर महाशब्दे (सदस्य)
१३. श्री. दिगंबर श्रीपाद अष्टेकर (सदस्य)
१४. श्री सतिश माधवराव पाटील (सदस्य)
१५. श्री. प्रभाकर अनंत संत (सदस्य)
१६. श्री. शरद पारसनीस (स्वीकृत सदस्य)
१७. श्री. महेंद्र मोहिनीराज गंधे (सदस्य)
१८. श्री.दिपक गोपाळ कुलकर्णी (स्वीकृत सदस्य)
१९. श्री. मुक्ता मुकुंद हुल्याळकर (सदस्य)

सभेच्या सुरुवातीस संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी दुःखद अंतःकरणानी सांगितले की ही आपली पहीलीच सभा आहे. ज्या सभेला आपले माजी अध्यक्ष व प्रमुख मार्गदर्शक ॲड माधव अनगळ हे आपल्या सोबत नाहीत, कारण त्यांचे दुःखद निधन १० मार्च २०१९ रोजी मुंबई येथे झाले. कार्याध्यक्ष यांनी सभेला विनंती केली आपण ॲड माधव अनगळ यांच्या स्मृतीस अभिवादन करुन सभेचे कामकाज पुढे सुरु करुया. यानंतर सर्व उपस्थित सदस्यांनी मंडळाचे माजी अध्यक्ष ॲड. माधव अनगळ यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहीली.

श्री. प्रभाकर कुलकर्णी (कार्याध्यक्ष) यांनी सभेस उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत केले आणि ज्या सभासदानी त्यांची अनुपस्थितती फोन व पत्राद्वारे कळविली आहे. त्यांची नावे वाचून दाखविली. ती पुढील प्रमाणे १. अनिकेत अष्टेकर २. श्री. विनोद देशमुख ३. श्री. राजेंद्र खेडलेकर ४. श्री. मिलिंद सरददेशमुख ५. श्री. श्रीकांत पाटसकर ६.श्री. सुधाकर कुलकर्णी ७. श्रीमती पुष्पा कुलकर्णी ८. श्री. सदानंद घोटीकर ८. श्री. रत्नाकर धायगुडे ९. श्री. रामचंद्र आफळे १०. श्री. वासुदेव चिटणीस

याशिवाय सभेस खालील सभासद सूचनेशिवाय अनुउपस्थित होते त्यांची नावे पुढील प्रमाणे १. सुषमा बळवंत ईनामदार २. श्री. अनिल श्रीधर पानसे ३) आश्विनीकुमार उपाध्ये ४) मनाली सुहास कुलकर्णी ५) श्री. निरंजन जोशी ६) श्रीमती भारती रत्नाकर जोशी

त्यांच्या अनुपस्थितीची सभेने नोंद घेतली.

सभेस सुरुवात झाल्यावर कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस सांगितले की आपले अध्यक्ष **श्री. विलास जोशी** यांची महाराष्ट्र शासनाने **महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डावर** सन्माननिय सदस्य म्हणून नेमणूक केली आहे. उपस्थित सर्व सदस्यांनी टाळया वाजवून श्रीयुत जोशी यांचे अभिनंदन केले. व संस्थेचे जेष्ठ सभासद डॉ हरी महाशब्दे यांनी श्री. जोशी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस सांगितले की संस्थेचे अहमदनगर येथील कार्यकारी मंडळ सदस्य **श्री. महेंद्र गंधे** हे **अहमदनगर महानगरपालिकेवर नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत**. उपस्थित सर्व सदस्यांनी टाळया वाजवून श्रीयुत. महेंन्द्र गंधे यांचे अभिनंदन केले व कार्यकारी मंडळाचे जेष्ठ सदस्य व माजी श्री. प्रभाकर अनंत संत यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार त्यांचा करण्यात आला.

सर्व उपस्थित सदस्यांनी श्रीयुत विलास जोशी व महेंद्र गंधे यांना त्यांच्या कार्यास सुयश चिंतीले व त्यांना मिळालेल्या संधीचा ते समाजातील सर्वांना लाभ देतील व मार्गदर्शन करतील असा विश्वास व्यक्त केला.

विषय क्रमांक :- १ दिनांक ११.११.२०१८ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचे इतिवृत्त वाचन मा. सचिव श्री. मधुकर रामराव कुलकर्णी यांनी केले. यावर चर्चा होऊन सभेने ते इतिवृत्त एकमताने मंजूर केले.

सूचक श्री. दत्तात्रय कुलकर्णी अनुमोदक श्री. हरी महाशबदे

**विषय क्रमांक :- २ आगाशे कक्ष (रुम नं.१५) नूतनीकरणाचा साठी झालेल्या नूतनीकरणा संबंधी माहिती देणे व झालेल्या खर्चास मंजूरी देणे.**

वरील विषयावर संस्थेचे सहकोषाध्यक्ष श्री. विनोद मांडके यांनी निवेदन करताना सांगितले की विभागावार खर्च कसे झाले आहेत. व अनेक सभासदांच्या सूचनांनाचा विचार करुन आगाशेकक्ष संपूर्ण अद्यावत करण्याचा प्रयत्न संस्थेने केला आहे, जेणेकरुन बाहेरगावाहून येणा-या सदस्यांना अधिकाअधिक सुविधा मिळाव्यात. या दुरुस्तीस अेकूण खर्च ३,००,०००/- झाला आहे. हा खर्च पूर्वी कार्यकारी मंडळाने मंजूर केलेल्या रक्कमेपेक्षा रु.१,५०,०००/- नी जास्त झाला आहे. त्यांनी सभेला विनंती केली की या वाढीव खर्चास मंजूरी देण्यात यावी. श्रीयुत प्रसाद ठकार यांनीही संस्थेने केलेल्या सुविधाची माहिती सभेला दिली. या कामासाठी श्रीयुत सदानंद घोटीकर यांनी केलेल्या मार्गदर्शनाची सभेने नोंद घेतली. श्रीयुत दिपक कुलकर्णी यांनी आगाशे कक्षामध्ये एक छोटा टिव्ही लावून घेण्यात यावा अशी सूचना केली सभेने त्याची नोंद घेतली. सर्व सदस्यांनी स्वःत जाऊन आगाशे कक्षात केलेल्या नूतनीकरणाची आम्ही पाहणी केली आहे व सर्व सुविधा उत्कृष्ट झाल्या आहेत असे सांगितले. चर्चेअंती खालील ठराव एकमताने मंजूर

करण्यात आला. **हि सभा आगाशे कक्ष (रुम नं.१५) नूतनीकरणासाठी झालेल्या अेकूण रुपये ३,००,०००/- (तीन लाख फक्त) खर्चास मंजूरी देत आहे**

सूचक :- श्री. दिपक कुलकर्णी अनुमोदक :- श्री. प्रभाकर संत

**विषय क्रमांक :- ३ सभागृहात अग्निप्रतिबंधक यंत्रणा बसविण्यासंबंधी मुंबई महानगर पालिकेकडून परीक्षण करुन घेणे व त्याच्या खर्चास मंजूरी देणे.**

या विषयावर श्री. प्रभाकर कुलकर्णी (कार्याध्यक्ष) यांनी सभेस माहिती दिली कि आपल्याकडे अग्निप्रतिबंधक यंत्रणा बसविण्यासंबधी दोन निविदा आल्या आहेत. त्यांची नावे १ Hi Rise D Fire Safety Solution २. Adarsh Plumbing & Sanitory Works अशी आहेत. यावर चर्चा करताना डॉ हरी महाशब्दे यांनी सांगितले आपल्या कंत्राटदाराशी चर्चा करुन तो हा खर्च करु शकणार आहे का ! अशी विचारणा करावी. श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि सध्याच्या कंत्राटदाराची मुदत ३ वर्ष म्हणजे २०२१ पर्यंत आहे, परंतु हि यंत्रणा आपल्या संस्थेच्या सभागृहात कायम स्वरुपी राहणार आहे. त्यावर मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी सांगितले की अग्निप्रतिबंधक यंत्रणा लवकरात लवकर बसवून घेणे हे इष्ट आहे. कारण भविष्यात कोठल्याही प्रकारची आग किवा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी मालक म्हणून संस्थेच्या कार्यकारीणीवर येऊ शकते. याकामासाठी संस्थेचे सदस्य व अग्निप्रतिबंधक यंत्रेणेसंबधीचे तज्ञ श्री. मिहिर घोटीकर यांची मदत घेण्यात यावी. त्यांनी या संबधी सांगितले कि मी स्वतः श्रीयुत मिहीर घोटीकर यांच्याशी बोलून या संबंधीचा योग्य सल्ला घेतो जेणेकरुन संस्थेला योग्य मार्गदर्शन मिळेल व खर्चातही बचत होईल. तसेच त्यांच्या सखोल ज्ञानाचा लाभ संस्थेला मिळेल. या संबंधीचे गांभीर्य श्री. विलास जोशी यांनी सभेला ठाण्यातील एका संस्थेच्या अपघाताचा दाखला देऊन लक्षात आणून दिले. तसेच हे काम करण्यासाठी आवश्यक असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यांकडून योग्य त्या परवांग्या घेण्यासाठी मी माझा सल्ला व मार्गदर्शन देईन असे श्री. घोटीकर यांनी आश्वासन दिले. सभेने त्यांचे याबदल स्वागत केले चर्चेअंती खालील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

''ही सभा सभागृहामध्ये अग्निप्रतिबंधक यंत्रणा बसविण्यास तत्वतः मंजूरी देत आहे. व त्यासाठी येणाऱ्या खर्चासही मंजूरी देत आहे.''

यासंबंधी खालील सदस्यांची समिती नेमण्यात यावी व या समितीने पुढील एक महिन्यात या संबंधीचा अहवाल सादर करावा.

१. श्री. प्रसाद ठकार २. श्री. दत्तात्रय कुलकर्णी ३. विलास कुलकर्णी ४. श्री. विवेक देशपांडे

सूचक :. डॉ. हरी महाशब्दे                                        अनूमोदक :- श्री. विनोद मांडके

<u>विषय क्रमांक :- ४ दुस-यामजल्यावरील छपराच्या दुरुस्तीकरणाच्या खर्चास मंजूरी देणे</u>

या विषयावर चर्चेस प्रारंभ करताना श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस विनंती केली की, आपले सदस्य श्री. घोटीकर हे आज अनुपस्थित आहेत. आपल्या सगळसा इमारत दुरुस्तीच्या कामा संदर्भात आपण त्यांचे मार्गदर्शन घेत असतो सबब हा विषय चर्चेत पुढच्या सभेत घेण्यात यावा. परंतु सभेने दुरुस्ती काय आहे.असे विचारले असता श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि दुसऱ्यामजल्यावरील सभागृहावर पत्र्याचे छप्पर आहे व त्यातील काही पत्रे जुने झाल्याकारणाने निसटले आहेत. व ते बदलून घेणे वा दुरुस्ती करुन घेणे आवश्यक आहे. यासंबंधी श्री. घोटीकर यानी सुचविले होते की ही दुरुस्ती संस्थेने पहिला पाऊस पडल्यानंतर करावी जेणेकरुन गळती कोठे होत आहे हे आपल्याला कळेल. त्याप्रमाणे दुरुस्ती करुन घेता येईल. तसेच त्यांनी सांगितले कि दुसऱ्या मजल्यावरील सभागृहाच्या खिडक्या दुरुस्ती करुन घेणे आवश्यक आहे. यासंबंधीच्या चर्चेदरम्यान श्रीयुत घोटीकर यानी सांगितले होते की यासाठीचा अेकूण अंदाजे खर्च रु. १५००००/- पर्यत येऊ शकतो. श्री. प्रसाद ठकार यांनी सांगितले कि वरच्या सभागृहाच्या छपराचे काम तातडीने करावे जेणे करुन खालच्या सभागृहावरती त्याचा परिणम होणार नाही याची काळजी घेणे जरुरी आहे. तसेच प्रत्येक सभेमध्ये खर्चास मंजूरी नको कोल्हापूरच्या सभेमध्ये खर्चास मंजूरी दिली आहे त्याप्रमाणे खर्च करावा.

श्री. विलास जोशी यांनी सांगितले कि आपण त्यावर सध्यातरी एक ताडपत्री टाकून घेतली कि गळती होणार नाही.

चर्चेअंती खालील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

**'' ही सभा दुस-यामजल्यावरील सभागृहाच्या छप्पराच्या व खिडक्यांच्या दुरुस्तीच्या खर्चासाठी रु. १,५०,०००/- खर्चास मंजूरी देत आहे.''**

सूचक श्री. हरी महाशब्दे                                        अनुमोदक श्री. दिपक कुलकर्णी

**<u>विषय क्रमांक :- ५ लघुवाद न्यायलयात भाडेकरु विरुध्द केलेल्या दाव्यासंबधीचा आढावा इतर</u> न्यायालयात प्रलबिंत असलेल्या दाव्यासंबंधी माहिती घेणे.**

**उपरोक्त विषयासंबंधी श्रीयुत प्रभाकर कुलकर्णी यानी सभेला खालील माहिती दिली**

**अ) लघुवाद न्यायालयात प्रलबिंत असलेल्या सर्व दाव्यांची यादी ॲड आनंद नायक यांनी संस्थेला दिली असून ती सर्व कार्यकारी मंडळ सदस्यांना वितरीत करण्यात आली आहे.**

**यानुसार दावा क्रमांक १९/२०१५ यामध्ये श्रीमती शरयू विठठल कुलकर्णी यांच्या विरुध्द म्हणजे संस्थेच्या बाजूने निकाल लागला असून जागा ताब्यात घेण्यासंबंधी कारवाई होणे बाकी आहे.परंतु श्रीमती.शरयू विठठल कुलकर्णी यांची**

आर्थिक परिस्थितीतीचा विचार करुन संस्थेने यासंबंधी कारवाई करताना सहानभुतीपूर्वक विचार करण्यात यावा. यासंबंधी चर्चेअंती असे ठरविण्यात आले की संस्थेने पुढील कारवाई चालू ठेवावी परंतु श्रीमती कुलकर्णी यांचा आर्थिक परिस्थिती

व वयोमान याचा विचार करुन जरी जागा ताब्यात घेतली तरी पुढील सहा महिन्यासाठी त्यांची सोय संस्थेने वृध्दाश्रमात करावी. त्याचा सर्व खर्च संस्थेने करावा.

दावा क्रमांक ३/१५ मध्ये भाडेकरु श्रीयुत राजेश मधुकर जोशी यांच्या विरुध्द संस्थेच्या बाजूने निकाल लागला असून त्यांनी या निकाला विरुध्द वरच्या न्यायालयात अपील केले आहे त्याची सुनावनी जूनच्या दुस-या आठवडयात होणार आहे. आपले वकील ॲड. आनंद नायक संस्थेची बाजू मांडणार आहे.

दावा क्रमांक १६६३/२०१६ पुरुषोत्तम नरहर देव यामध्ये संस्थेने केलेला दावा जरी तांत्रिक कारणामुळे फेटाळाला आहे तरी त्यासंबंधात अपील जूनच्या पहिल्या आठवडयामध्ये करण्यात येईल.असे ॲड नायक यानी कळविले आहे.

वरील दाव्यांव्यतिरिक्त इतर २७ दाव्यांमध्ये साक्षी / उलटतपाणी / फेरतपासनी या प्रक्रिया न्यायालयात चालू असून २०१९च्या अखेरीस निकाल येण्याची शक्यता आहे.

बेकायदेशीररित्या राहत असलेल्या श्री. संकल्प सुरेश पाटील यांच्या विरुध्द न्यायालयाने संस्थेच्या बाजूने निकाल दिला आहे. तरी त्या निकालामध्ये सुधारणा करुन घेण्यासाठी संस्थेने त्यानिर्णया विरुध्द मुंबई उच्चन्यायालयात अपील करण्याचे ठरविले आहे.

आ) यापूर्वी कार्यकारी मंडळाने संस्थेतर्फे न्यायालयीन काम करण्यासाठी कार्यकारी मंडळाचे सदसय श्री. दिपक कुलकर्णी व श्री विवेक देशपांडे यांची कै. माधव अनगळ व श्री. विकास माने यांना मदत करण्यासाठी नेमणूक केली होती. परंतु वैक्यत्तीक कारणामुळे श्री. विवेक देशपांडे यांनी काम करण्यास असमर्थता दर्शविली आहे. त्याची सभेने नोंद घेतली. व कार्यवाही करण्याचे अधिकार अध्यक्ष व कार्याध्यक्षांना दिले.

ई) धर्मादाय आयुक्तांकडे प्रलबिंत असलेल्या चेंजरिपोर्टवर सुनावणी होऊन यासंबंधीचा निर्णय लवकरच अपेक्षित आहे. यात याबरोबर संस्थेच्या मालमत्ता संबंधीचा नोंदणीचा अर्ज जो गेली ३ वर्ष प्रलंबित आहे त्याचाही निर्णय वरील निकालाबरोबर अपेक्षित आहे. संस्थेच्या वतीने बाजू मांडण्यासाठी कार्यकारी मंडळाने यापूर्वीच ॲड अमोल थोरात यांची नेमणूक वकील म्हणून केली आहे.व त्यांची फी ही ठरविली आहे.

चर्चेअंती ॲड. आनद नायक यांनी सुचविल्याप्रमाणे कार्यकारी मंडळाच्या सदस्यांना लघुवाद व इतर न्यायालयात संस्थेतर्फे न्यायालीयीन कारवाई करण्यासाठी व न्यायालयात संस्थेतर्फे हजर राहण्यासाठी अधिकार देण्यात यावेत याचा विचार करुन सभेने खालील ठराव एकमताने मंजूर केला.

<u>ठराव</u>

‘‘ ही सभा मुंबई उच्च न्यायलय / लघुवाद न्यायलय तसेच इतर सर्व न्यायालयामध्ये संस्थेतर्फे दाखल करण्यात येणा-या भाडेकरु व इतर अशीलांच्या विरुध्द सर्व न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या दाव्यांमध्ये संस्थेतर्फे साक्ष देण्याचे, आवश्यक न्यायालयीन कारवाई करण्याचे, संस्थेतर्फे आवश्यक ती कागदपत्रे व दस्तऐवज सादर करण्याचे तसेच न्यायालयीन निर्णयाची पूर्तता करण्याचे अधिकार कार्यकारी मंडळातील खालील सदस्यांना देत आहे.

१.श्री. विलास विनायक जोशी २. श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी ३.श्री. प्रसाद जनार्दन ठकार

४.श्री. दिपक कुलकर्णी ५. श्री. महेंद्र गंधे ६.श्री. शरद पां. पारसनीस

आणि श्री. विकास दिनानाथ माने - संस्थेचे व्यवस्थापक ’’

सूचक :- श्री. प्रभाकर अनंत संत अनुमोदक :- श्री. विलास शंकर कुलकर्णी

उ) पूर्वी आपल्या संस्थेची नोंदणी कंपनी कायदयाअंतर्गत करण्यात आली होती त्याचा नोंदणी क्रमांक २९२२ आहे. अनेक वकीलांच्या सल्यानुसार कंपनी कायदयाच्या क्लीष्ट कलमानुसार संस्थेला आर ओ सी ची कायदयाअंतर्गत पूर्तता करणे कठीण जात होते या सर्वाचा विचार करुन महतप्रयासाने ॲड. अनगळ सरांच्या मार्गदर्शनानुसार मुंबई उच्च न्यायालयात आपण अर्ज करुन माननीय न्यायाधीश एस.एस.सी गुप्ते यांनी कंपनी पिटीशियन नंबर १४४ ऑफ २०१५ मध्ये दिनांक २१ सप्टेंबर २०१५ व ९ ऑक्टोंबर २०१५ रोजी संस्थेच्या बाजूने निकाल दिला होता व संस्थेची कंपनी कायदयाअंतर्गत नोंदणी रद्द करण्याचे आदेश रजिस्टर ऑफ कंपनीला दिले आहेत.

असे असून सुध्दा, कंपनी कायदयाअंतर्गत पूर्वीच्या विश्वस्तांविरुध्द (२००१ -२०१० पर्यंत कार्यरत असलेल्या) मेट्रॉपॉलिटियन मॅजेस्ट्रीक कोर्टात १२ दावे दाखल झाले आहेत. ते सर्व २००८ पासून त्याची सुनावणी बाकी आहे. हे सर्व दावे फौजदारी गुन्हे म्हणून समजले जातात. सबब त्या सर्व विश्वस्तानी त्या कोर्टासमोर हजर राहणे आवश्यक होते ते गैर हजर राहिल्यास त्यांना अटक हि होऊ शकते या संबधीची गंभीरता नुकतीच आमच्या निर्दशनास आली असल्यामुळे त्यासंबंधी कारवाई करणे गरजेचे होते.याचा विचार करुन संस्थेने ॲड चैतन्य जाधव यांची संस्थेची व त्या विश्वस्तांची बाजू मांडण्यासाठी वकील म्हणून नेमणूक केली आहे. त्याना आतापर्यत संस्थेने वकील फी म्हणून ५५०००-०० पंचावन्न हजार दिले आहे. तसेच अजून १५ ते २० हजार खर्च लागू शकतो या दाव्याची शेवटची सुनावणी २४.०४.२०१९ रोजी झाली असून त्यामध्ये प्रत्येक त्या कालावधीतील माजी विश्वस्तांकडून प्रत्येकी रु.२४,००० (१२ **X** २०००) दंड न्यायालयाने वसूल करण्याची आदेश काढला आहे. त्यानुसार संस्थेने श्रीयुत नरहरी कुलकर्णी श्री. दत्तात्रय खंडेराव कुलकर्णी व श्री. भाऊराजे जहागीरदार यांनी रुपये २४००० प्रत्येकी असे ऐकूण ७२०००/- भरले आहेत. कारण जर त्यादिवशी दंड भरला नसता तर दंडाची रक्कम कित्येक पटटीने वाढली असती व त्यांची या दाव्यातून मुक्ताता झाली

नसती.यासंबधी चर्चेदरम्यान श्रीयुत महेंद्र गंधे यांनी सांगितले कि जर संस्थेने अशा प्रकारची दंडाची रक्कम भरली नाही तर यापुढे संस्थेस काम करण्यास लोक तयार होणार नाहीत. ही चूक त्या विश्वस्तानी जाणून बजून केलेली नसून केवळ त्यावेळी कार्यरत असलेल्या पदाधिका-यांच्या गलथानपणामुळे ही झाली आहे. त्यावेळचे विश्वस्त श्री. दत्तात्रय खंडेराव कुलकर्णी यांनी सांगितले. व ते कोणीही त्यावेळी पदाधिकारी नव्हते हे सर्व सदस्य जेष्ठ सदस्य असून त्यानी पूर्वी केलेल्या संस्थेच्या कार्याचा विचार करुन हा दंड संस्थेने भरावा परंतु काही सदस्यांनी असे ही सुचविले कि ज्या विश्वस्तांची आर्थिक परिस्थिती चांगली असेल त्यांनी या खर्चाचा बोजा संस्थेवर न टाकता त्यांच्याकडून जेवढी दंडाची रक्कम भरणे शक्य आहे त्यांनी ती भरावी. बहुतेक सर्व सदस्यांनी श्रीयुत महेंद्र गंधे यांच्या मतास सहमती दर्शवली. बाकीचे राहिलेले विश्वस्त श्रीयुत. शाळीग्राम, श्री. दशपुत्रे, व श्री. हरीभाऊ जतकर हे सर्व जेष्ठ सदस्य असून त्यांची वये ८० ते ८५ आहे. त्यांनी सुध्दा त्यांची आर्थिक परिस्तिथी दुर्बल असल्यामुळे अशा प्रकारचा दंड भरण्यास असमर्थता व्यक्त केली आहे व संस्थेला विनंती केली आहे की त्यांनी संस्थेसाठी केलेल्या परिश्रमाची जाणीव ठेवून हा दंड संस्थेने भरावा काही सदस्यांनी या संबधी सांगितले की कदाचित हा चुकीचा पायंडा पडू शकतो कारण पदाधिका-यांनी केलेल्या चुकांची जबाबदारी ते संस्थेवर लादू शक्त नाहीत. परंतु अपवाद म्हणून यापूर्वीच्या सर्व विश्वस्तानी संस्थेसाठी केलेल्या कामाचा विचार करुन व ते या गुन्हयास थेट जबाबदार नसल्याने संस्थेने केवळ सहानुभूतीचा विचार करुन हा दंड भरावा परंतु भविष्यात अशा पूर्वी केलेल्या किंवा झालेल्या चुकांची जबाबदारी संस्था घेणार नाही .अशा प्रकारचे संस्थेचे मत त्यांना कळविण्यात यावे.व या सर्व सदस्यांकडून विनंती वजा पत्र घेण्यात यावी ज्यामध्ये त्यांनी त्यांची आर्थिक परिस्थितीती हा दंड भरण्याची नाही तसेच ते या गुन्हयाला प्रत्यक्षपणे जबाबदार नाहीत असे नमूद करणे आवश्यक आहे. यावर चर्चेअंती खालील ठराव मंजूर करण्यात आला.

‘‘ ही सभा केवळ अपवाद म्हणून २००१ ते २०१० पर्यत कार्यरत असलेल्या विश्वस्तांनाकरिता ते या कार्यकालात पदाधिकारी नसल्यामुळे पुढील जेष्ठ व श्रेष्ठ सदस्यांन तर्फे श्री. नरहरी कुलकर्णी, श्री. भाऊराजे जहागीरदार, श्री.

दत्तात्रय खंडेराव कुलकर्णी ,श्री. हरीभाऊ जतकर, श्री. अरविंद शाळीग्राम, श्री. प्रभाकर दशपुत्रे ,यांच्यातर्फे मेट्रपॉलियीटीयन कोर्टाच्या आदेशानुसार देय असलेली रक्कम रुपये २४,०००/- प्रत्येकी अेकूण रुपये १४४,०००/- तसेच या दाव्या संबंधी वकिलाची फी अेकूण १०००००/- पर्यंत म्हणजेच रुपये २,४४,०००/- पर्यंतच्या खर्चास मंजूरी देत आहे.

तसेच या सर्व सदस्यांना संस्थेने संस्थेतर्फे विनंती करावी कि ज्यांची आर्थिक परिस्थिती योग्य आहे त्यांनी हा दंड स्वताः भरावा जेणेकरुन संस्थेला या खर्चाचा आर्थिक बोजा विनाकारणी पडणार नाही, व असमर्थ विश्वस्तांनी संस्थेला हा दंड त्यांच्यातर्फे भरावा अशी लेखी विनंती करावी.

सूचक :- श्री. महेंद्र गंधे अनुमोदक :- श्री. प्रदीप कुलकर्णी

**विषय क्रमाक :- ६ शैक्षणिक मदती संबधी मार्गदर्शक तत्वे ठरवून व शैक्षणिक मदत / शिष्यवृत्ती संबधी योजनेस मंजूरी देणे.**

**या** विषयावरती सभेस मार्गदशन करताना मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि सन १९ - २० च्या अभ्यासक्रमाकरीता मंडळाचे सदस्य श्री. दिपक कुलकर्णी यांनी शेक्षणिक उपक्रमा बाबत नियमावली तयार केली आहे. त्यासंबधी माहिती सभेस श्री. दिपक कुलकर्णी देतील. श्री. दिपक कुलकर्णी यांनी आपल्याकडील शैक्षणिक उपक्रमाबाबत माहिती देताना सांगितले कि आपण देत असलेल्या शिस्त्र्यवृत्या कर्जाऊशिष्यवृत्ती, परदेशी कर्जाऊ शिष्यवृत्ती मेडिकल व शैक्षणिक मदत अशा प्रकारे देत असतो. आता आपण या सर्वासाठी शैक्षणिक नियमावली तयार केली आहे. ती त्यांनी सभेस वाचून दाखविली त्यामध्ये मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास

जोशी यांनी सांगितले कि संलग्न संस्थांनाकडून त्या त्या विभागाची शिफारसपत्र येणे आवश्यक आहे. व या संपूर्ण कार्यक्रमाची माहिती प्रत्येक संलग्न संस्थांना हि नियमावली व अर्ज पाठवून देण्यात यावी श्री. दिपक कुलकर्णी यांनी सभेस सांगितले कि अर्ज येण्याची तारीख ३० सप्टेंबर २०१९ र्प्यंत ठेवण्यात यावी असे सभेस सांगितले.श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि श्री. दिपक कुलकर्णी यांनी केलेली शैक्षणिक उपक्रमाची माहिती सर्व पदाधिका-यांना पाठवून द्यावी. श्री. विलास जोशी अध्यक्ष यांनी सागितले या करीता शिक्षण सहाय्य समिती तयार करावी व त्यामध्ये ज्यांना शैक्षणिक क्षेत्रातील अनुभव आहे त्यांची नावे घेण्यात यावी सभेने पुढील नावे दिली १. श्री. मधुकर कुलकर्णी श्री. संजय कुलकर्णी श्री. हरी महाशब्दे, श्री. दिगंबर अष्टेकर, श्री.विलास कुलकर्णी या समितीचे प्रमुख निमंत्रक श्री. दिपक कुलकर्णी राहतील असे मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले.

श्री. प्रसाद ठकार (कार्यवाह) यांनी सांगितले कि समिती जो काही अहवाल तयार करेल त्याची प्रत्येक प्रत अध्यक्ष व कार्याध्यक्ष यांना देण्यात यावी व त्यांच्याकडून अंतिम निर्णय आला कि निर्णय करावे असे सभेस आपले मत व्यक्त केले.

श्री. विलास कुलकर्णी यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले कि संस्थेकडे जेवढे फंड आहेत तेवढी खाती वेगळी करावी म्हणजे प्रत्येक फंडातून काय काय मदत होऊ शकेल याचा आढावा संस्थेस येईल.

श्री. विलास जोशी अध्यक्ष यांनी समितीस सूचना करताना सांगितले कि प्रत्येक जिल्हयातून अर्ज आला पाहिजे प्रत्येक विभागास शैक्षणिक लाभ मिळाला पाहिजे त्यासाठी येणारे अर्ज या समितीने तपासून सर्वत्र जबाबदारीने निर्णय घ्यावा जेणे करुन आलेल्या सर्व विदयार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल व मंडळाचा प्रसार होईल असे मत सभेस सांगितले.

ठराव

''हि सभा शैक्षणिक समितीत जी नावे सभेने दिली आहेत त्या सर्व नावांना सभेने सर्वानुमते मंजूरी दिली''

सूचक :- श्री. प्रभाकर कुलकर्णी अनुमोदक श्री. विनोद मांडके

<u>विषय क्रमांक :० ७ सभासदांच्या सामूहिक आरोग्यविमा संबधीच्या योजनेवर चर्चा करणे या विषयावर चर्चा</u> करताना **मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले की मंडळाचा लेखाजोखा पाहिल्यावर असे दिसून येते कि** मंडळास ३० ते ४० लाख नफा होत आहे. तेव्हा आपल्या संस्थेचे ऐवढे सभासद आहेत कि आपण त्यांच्यासाठी सामूहिक आरोग्य विमा देऊ तेवढेच मंडळाकडून वैद्यकीय सेवा दिल्याचे समाधन संस्थेला मिळेल. यासाठी प्रिमियम खूप येईल त्यासाठी सुध्दा आपण सभासदांना त्याची कल्पना देऊ . यावर अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी सांगितले कि यासाठी प्रोपजल अतिश्य चांगल्या कंपनीचे असावे, तसेच श्री. जोशी यांनी सांगितले आपल्याकडील ग्रामीण भागास ४० ते ६० टक्के भाग ग्रामीण भागात खर्च करावा लातूर मंगळवेढा, गडहिंग्लज या भागातील संस्थेच्या व त्यांच्या सभासदांच्या विकासाठी करावा खर्च करावा संस्थेच्या उत्पन्नाचा भाग ४० ते ६० भागातून आपण आपल्या संलग्न संस्थेच्या वाढीसाठी व त्यांच्या उत्कर्षासाठी खर्च करावा म्हणजे या सर्व संलग्न संस्था जोमाने कामाला लागतील. आपआपल्या भागात देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाचे उपक्रम पार पाडतील त्यामुळे त्या त्या भागातील सभासद मध्यवर्ती मंडळास मिळतील व सभासद संख्येत वाढ होईल तसेच आता पर्यत मंडळ प्रत्येक संलग्न संस्थेच्या कार्यक्रमास म्हणजे वर्धापनदिनाच्या दिवशी रु.५०००/- मदत करत आहे. सध्या संलग्न संस्थांना खर्च परवडत नसल्यामुळे तेवढया खर्चात कार्यक्रम होणे फार अवघड जाते तेव्हा मंडळाने आपल्या संलग्न संस्थांच्या उपक्रमाला देणगी वाढवून द्यावी जेणेकरुन त्या संस्थेच्या कार्यक्रमाचा खर्च भरुन निघेल

श्री. प्रसाद ठकार कार्यवाह यांनी सभेस सांगितले कि आता पर्यत आपण सलग्न संस्थाना रु.५०००/- मदत करत आहे पण आता आपण अनेक सलग्न संस्थांना आता सभासद अर्ज दिले आहेत त्या संस्था सभासद अर्ज भरुन आपणास पाठवित आहोत त्यामुळे आपली सभासद संख्या बरीच वाढली आहे. श्री. प्रभाकर कुलकर्णी सभेस आपले मत मांडताना सांगितले कि आपण अनेक संस्थांना आतापर्यंत मदत करत आहोत तेव्हा त्या संस्थांनी सुध्दा आपली संस्था कशी वाढेल व आपण आपल्या पायावर उभे राहून संस्थेचे कार्य वाढवावे त्यामुळे दोन्ही संस्थेचे सभासद वाढतील दोन्ही संस्थेचा कार्यभाग वाढेल. तसेच अनेक संलग्न संस्थांनी बरेच वर्ष मंडळाची वार्षिक वर्गणी भरलेली नाही त्या बदल सुध्दा मंडळाने विचार करावा व त्याप्रमाणे संलग्न संस्थांना मदत करताना याचा विचार करावा

श्री. विलास जोशी अध्यक्ष यांनी सभेस आपले मत व्यक्त करताना सांगितले की मंडळाच्या घटनेप्रमाणे जे संलग्न संस्थांसाठी जी मदत असेल ती करण्यात यावी.

श्री. हरी महाशब्दे अकोला यांनी सांगितले कि एखादा मोठा कार्यक्रम केल्यास मध्यवर्ती मंडळ आर्थिक सहकार्य करेल का त्यावर श्री. विलास जोशी अध्यक्ष यांनी सांगितले कि कार्यक्रम मंडळाच्या उन्नतीसाठी व सभासदांच्या फायदयासाठी असल्यास संस्था अशा कार्यक्रमास मदत करेल पण त्यासाठी मध्यवर्ती मंडळास आपल्याकडून तशा प्रकारे अर्ज करावा म्हणजे त्यावर विचार करुन आपणास सहकार्य करता येईल .ज्या संस्था आपला लेखा जोखा दरवर्षी धर्मादाय आयुक्तांकडे सादर करतात अशा सर्व सस्थांनी आपले ताळेबंद मध्यवर्ती मंडळास सादर करावे त्यानुसार आपण संलग्न संस्थेस किती मदत देऊ शकतो ते सभेस ठरवता येईल. असे श्री. प्रदीप कुलकर्णी यांनी सुचविले.

श्री. विलास कुलकर्णी मुलुंड यांनी सांगितले कि संस्थेचे प्रती वर्षी सभासद वाढ झाली पाहिजे तसेच प्रत्येक भागात संलग्न संस्थांची वाढ सुध्दा झाली पाहिजे या सर्व कार्यक्रमासाठी मध्यवर्ती मंडळाने पुढाकार घेऊन मंडळाचे जे पदाधिकारी ज्या ज्या भागात आहेत त्यांनी आपल्या भागातील सलग्न संस्थेची माहिती गोळा करुन मध्यवर्ती मंडळास देणे जेणेकरुन अशा संस्थाना कशा प्रकारे मदत करता येईल याचा विचार करता येईल. पूर्वी मध्यवर्ती मंडळ ज्या संलग्न संस्थांची कार्यालये नाहीत अशा संलग्न संस्थेने आपला लेखा जोगा व कार्यालयाचे भाडे पावती मंडळास सादर केल्यावर मध्यवर्ती मंडळ २५/- टक्के मदत करत होती तसेच त्या भागातील विदयार्थ्यांना सुध्दा शैक्षणिक मदत साहाय्य प्रतीवर्षी देत होती मंडळ आज सुध्दा ज्या ज्या संलग्न संस्थेकडून शैक्षणिक मदतीचे अर्ज येत आहे त्यांना मदत करत आहे हे अभिमानाची गोष्ट आहे तसेच सर्व संलग्न संस्थांना मार्गदर्शक तत्वे व नियमावली तयार करुन सर्व सलग्न संस्थांना पाठविणे तसेच मंडळाच्या अर्जावरती सूचक म्हणून नाव असणे गरजेचे आहे ज्या सभासदाचे अर्जावरती सूचक म्हणून १०० वेळा नाव येईल अशा सभासदाचा सत्कार मध्यवर्ती मंडळाने करावा तसेच संलग्न संस्था विभागावर मेळावे आयोजित करावे ज्या विभागात मध्यवर्ती मंडळाचे प्रतिनिधी आहेत त्यांना त्या विभागाची जबाबदारी देण्यात यावी त्यामुळे प्रत्येक संस्थेचे उपक्रम वेळेत मध्यवर्ती मंडळाकडे येतील व आपल्या मासिकातून महाराष्ट्रातील प्रत्येक सभासदाना माहिती मिळेल. प्रत्येक संस्थेने आपल्या वधूवर मंडळाची माहिती समाचार मासिकात द्यावी त्यामुळे सभासदांस त्याचा नक्की फायदा होईल वधू वर मेळावे प्रत्येक संस्थेने आयोजित केल्यास त्या **विभागातील सभासदांच्या मुला मुलींच्या लग्नाविषयी माहिती त्यांना मिळेल व त्यांना एकप्रकारे संस्थेची मदत होईल. असे उपक्रम करण्यापूर्वी सर्व संलग्न संस्थेचे अध्यक्ष, कार्यवाह, व प्रमुख पदाधिकारी यांच्या नावाची एक यादी आपण तयार करावी व त्या यादीस मंडळाच्या समाचार मासिकात प्रसिध्दी द्यावी म्हणजे प्रत्येक सभासदास सर्व संलग्न संस्था प्रतिनिधी व त्यांचा पत्ता व दूरध्वनी वेळेत मिळेल व सर्पक वाढेल त्यामुळे मध्यवर्ती मंडळाच्या कामास गती मिळेल व पुढे अनेक युवक वर्ग संस्थेला जोडला जाईल**

श्री. महाशब्दे अकोला यांनी सांगितले कि प्रत्येक सभेचे इतिवृत्त कार्यकारी मंडळ सदस्यांनर मिळावे श्री. प्रभाकर कुलकर्णी कार्याध्यक्ष यांनी सांगितले कि आपणास पुढील सभेपासून इतिवृत्त कॉपी पाठविण्यात येईल

**श्री. महाशब्दे यांनी सांगितले कि संस्थेच्या अनेक शाखा आहेत तेव्हा प्रत्येक संस्थेने मंडळाच्या समाचार अंकासाठी रु.५०००/- जाहिरात गोळा करुन मंडळास आर्थिक हातभार लावावा म्हणजे समाचार मासिकाचा खर्च वाढत आहे त्यास एकाप्रकारे आपल्या सर्वांची मदत होईल संस्थेचे हित सुध्दा आपल्याला पाहिले पाहिजे.**

चर्चेअंती खालील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

‘‘ संस्थेच्या सभासदांसाठी सामूहिक आरोग्य विमा संबधीच्या प्रस्तावावर निर्णय आपल्याकडे विमा कंपन्याकडून ठोस योजना आल्यानंतर करण्यात यावा ’’

‘‘ सर्व संलग्न संस्थांशी संपर्क वाढविण्यासाठी नेमलेल्या संलग्न संस्था संपर्क समितीने ठोस कार्यवृत्त तयार करुन कार्यकारी मंडळासमोर मंजूरीसाठी ठेवावा .’’

**<u>विषय क्रमांक :-८ आर्थिक वर्ष २०१८ – २०१९ या आर्थिक वर्षाचा आढावा</u>** घेताना श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले आर्थिक वर्ष २०१८ -२०१९ चा वर्षाचा ताळेबंद व जमाखर्च मे महिन्यातच मंडळाने पूर्ण केला आहे. व त्याचे सर्व श्रेय श्री. प्रदीप कुलकर्णी कोषाध्यक्ष व सहकोषाध्यक्ष श्री. विनोद मांडके यांना देण्यात यावे त्यानी जातीने लक्ष घालून वेळेत सर्व हिशेब तपासून सर्व बाबी पूर्ण केल्या तसेच लेखापरिक्षणासाठी हा ताळेबंद सनदी लेखापाल श्रीयुत वाघ यांच्याकडे प्रमाणपत्रासाठी पाठविला आहे . त्याची मंजूरी सनदी लेखापालाकडून जुलै मध्ये येण्याची शक्यता आहे. त्यावर सभेने श्री. प्रदीप कुलकर्णी व श्री. विनोद मांडके यांचे अभिनंदन करुन खरोखरच ही कौतुकाची बाब आहे असे सांगितले. सनदी लेखापाल श्री. वाघ यांना दिलेला जमाखर्च व ताळेबंदाची प्रत सभासदांन समोर मंजूरीसाठी ठेवण्यात आली. त्याला सर्व सभासदांनी एकमताने मंजूरी दिली व खालील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

<u>ठराव :-</u>

**''सभेपुढे सादर करण्यात आलेली''आर्थिक वर्ष २०१८ – २०१९ ची हिशेबपत्रके / जमाखर्च ताळेबंदासहित मंजूर करण्यात येत आहे.''**

सूचक :- श्री. दिपक कुलकर्णी अनूमोदक श्री. संजय कुलकर्णी

<u>विषय क्रमांक :-९ आर्थिक वर्ष २०१९- २०२० च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे</u>

सहकोषाध्यक्ष श्री. विनोद मांडके यानी आर्थिक वर्ष २०१९ -२०२० चे अंदाज पत्रक सभेपुढे मंजूरीसाठी ठेवले व ते वाचून दाखविले. या अंदाजपत्रकास सभेने एकमुखाने मंजूरी दिली व खालील ठराव सभेने मंजूर केला

<u>ठराव :-</u>

**''आर्थिक वर्ष २०१९ – २०२० चे सभेपुढे सादर केलेले अंदाजपत्रकास हि सभा मंजूरी देत आहे.''**

सूचक :- विलास कुलकर्णी अनुमोदक डॉ. हरी महाशबदे

<u>विषय क्रमांक १० नवीन आलेल्या सभासदांच्या अर्जास मंजूरी देणे</u>

**नवीन आलेल्या १२९ सभासदांच्या अर्जास हि सभा मंजूरी देत आहे या सभासदांची यादी जून २०१९ च्या समाचार मासिकात प्रसिध्द करण्यात आली आहे.**

सूचक :- विलास कुलकर्णी अनुमोदक डॉ. हरी महाशबदे

विषय क्रमांक ११ अध्यक्षांच्या परवांगीने येणारे आयत्या वेळेचे विषय

१. सौ. उत्तरा मोने, दादर सांस्कृतिक मंच तर्फे त्यांच्या कार्यक्रमास सभागृह उपलब्ध करुन देण्याबाबत आलेले पत्र सभेपुढे ठेवण्यात आले. त्यावर चर्चा करण्यात आल्यावर श्रीयुत विलास जोशी अध्यक्ष यांनी अशा उपक्रमास सभागृह विनामुल्य देऊ नये असे सुचविले कारण प्रत्येक बार्बीचा विचार करावा लागतो त्याप्रमाणे त्यांच्याशी चर्चा करुन सभागृहाच्या प्रचलित भाडयामध्ये कमाल सवलत देऊन त्यांना सभागृह भाडयाने देण्यात यावे .

२. मंडळाचे माजी अध्यक्ष कै. माधव दत्तात्रय अनगळ हे मंडळाचे एक भूषण असून त्यांच्या स्मरणार्थ संलग्न संस्थांन मधून उत्कृष्ट कार्य करणा-या कार्यकर्त्यास पुरस्कार देऊन गौरवण्यात यावे.

३ संस्थेचे आर्थिक वर्ष १ एप्रित २०१८ ते ३१ मार्च २०१९ ची वार्षिक सभा १८ ऑगस्ट २०१९ रोजी घेण्याचे समंत करण्यात आले.

अध्यक्षंच्या परंवागीने येणारे आयत्या वेळेचे अन्य विषय नसल्यामुळे मा. श्री. विलास जोशी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

कार्याध्यक्ष कार्यवाह

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या कार्यकारी मंडळाची दुसरी सभा रविवार दिनांक १२.०८.२०१८ रोजी सकाळी १२.०० वाजता, ब्राह्मण सभा, करवीर मंगळधाम, महालक्ष्मी मंदिर, दक्षिण दरवाजा, कोल्हापूर येथे श्री. विलास विनायक जोशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली

माननीय अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

**विषय क्रमांक १.**

सभेच्या सुरवातीस मंडळाचे ज्ञात क्रअज्ञात दिवगंत सदस्य व समाजातील दिवंगत मान्यवर व्यक्ती तसेच भारतीय शहिद सैनिक यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

सभेस खालील सभासद उपस्थित सदस्यांची यादी पान १ व पान २ वर आहे.
सभेस अनुपस्थिती राहणा-या सदस्यांनी आपली अनुपस्थिती कार्यालयात कळविली होती.

दिनांक १५.०७.२०१८ रोजी झालेल्या कार्यकार मंडळाच्या सभेचे इतिवृत्त वाचन श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी केले.त्याला सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

श्रीयुत अनिल पानसे,पूणे यांनी सहकोषाध्यक्षपद घटनेप्रमाणे आहे का अशी चौकशी केली त्यावर कार्याध्यक्षानी सांगितले की कार्यकारी मंडळाला पदांच्या संख्येची पुर्नरचना करण्याचा अधिकार घटनेने दिला आहे,यापूर्वी सहकोषाध्यक्षपद संस्थेने कार्यरत केले होते. त्यानुसार सहकोषाध्यक्षपदी श्री. विनोद मांडके मुंबई यांची निवड सर्वानुमते करण्यात आली आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे श्रीयुत प्रदीप कुलकर्णी हे बेळगावस्थित असल्याने तातडीचे व्यवहार सुरळीत होण्यासाठी सहकोषाध्यक्ष मुंबईस्थित असावा.श्रीयुत विनोद मांडके स्वतः चार्टड अकाऊन्टंट आहेत व मुंबईस्थित आहेत.

ठराव एकमताने मंजूर
सूचक श्री. प्रभाकर संत अनुमोदक श्री. विलास कुलकर्णी

**विषय क्रमांक २.**

बॅंक खात्यासंबंधी कोषाध्यक्ष श्री. प्रदीप कुलकर्णी यांनी सभेला माहिती दिली ती खालील प्रमाणे.

१. कॉसमॉस बॅंक
१. बॅंक ऑफ बरोडा
२. बॅंक ऑफ इंडिया
३. बॅंक ऑफ महाराष्ट्र
४. जनकल्याण सहकारी बॅंक
५. एच डि एफ सी लिमीटेड
६. समर्थ सहकारी बॅंक

कोषाध्यक्षानी सुचविले की या सर्व बॅंक खात्यांचा व्यवहार करण्यासाटी कार्यकारी मंडळाने खालील ठराव करावा.
''सर्व बॅंकांचे व्यवहार कार्याध्यक्ष / कार्यवाह आणि कोषाध्यक्ष / सहकोषाध्यक्ष यांच्या सहीने करण्यात येतील.'' त्याचप्रमाणे सर्व धनादेशांवर कार्याध्यक्ष / कार्यवाह आणि कोषाध्यक्ष / सहकोषाध्यक्ष यांच्या संयुक्त सहया असतील.

या संबंधीची व्हाऊचर्स ज्या पदाधिका-यांनी धनादेशावर सही केली आहे त्या पदाधिका-या व्यतिरीक्त असलेल्या पदाधिका-यांनी मंजूर केलेली असावीत.

चर्चेअंती सभेने खालील पदाधिका-यांना बँकेचे व्यवहार करण्याचे व धनादेशावर सही करण्याचे अधिकार दिले.
कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी
कोषाध्यक्ष श्री. प्रदीप कुलकर्णी / सहकोषाध्यक्ष श्री. मांडके
कार्यवाह श्री. प्रसाद जनार्दन ठकार,
सहकोषाध्यक्ष श्री. विनोद विठठल मांडके

वरील विषयावर चर्चा करताना श्रीयुत रत्नाकर धायगुडे यांनी विचारले कि श्रीयुत विनोद मांडके याना संस्थेच्या आर्थिक व्यव्हारासंबंधीचे अधिकार दिले आहेत का ! यावर अध्यक्षांनी सांगितले कि घटनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल तसेच त्यांची नेमणूक घटनेनुसार करण्यात आली आहे.

श्रीयुत. सुधाकर कुलकर्णी, विलास कुलकर्णी, सुषमा इनामदार, यांनी वरील सर्व बँकांमध्ये खाते असण्याची आवश्यकता आहे का अशी विचारणा केली तसेच खाजगी बँकेमध्ये खाते नसावे असे सुचविले.

यावर कार्याध्यक्षांनी स्पष्टीकरण दिले कि संस्थेचे बँक खाते खालील तीन सहकारी बँकांन मध्ये आहे.१ कॉसमॉस सहकारी बँक २. जनकल्याण सहकारी बँक ३. समर्थ सहकारी बँक यावर बोलताना कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि कॉसमॉस बँकेचे खाते जूने असून त्यामधील ठेवी रु.१.००,०००/- (एक लाख ) पर्यंत कमी करण्यात येतील. तसेच जनकल्याण बँक व समर्थ सहकारी बँक यामध्ये सुध्दा रु. १.००,०००/- (एक लाख ) पर्यंत ठेवी ठेवण्यात येतील. चर्चेअंती खालील ठराव मंजूर करण्यात आला.

'' सर्व बँकांचे व्यवहार कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी वा कोषाध्यक्ष श्री. प्रदीप कुलकर्णी
आणि कार्यवाह श्री. प्रसाद जर्नादन ठकार वा सहकोषाध्यक्ष श्री विनोद मांडके यांच्या सयुक्त सहीने करण्यात येतील''

ठराव एकमताने मंजूर

सूचक :- श्री. सदानंद घोटीकर अनुमोदक श्री. विवेक देशपांडे

**<u>विषय ॔मांक ३ .</u>**

सध्या संस्थेने भाडेकरुंच्या विरुध्द लघुवाद न्यायलयामध्ये (स्मॉल कॉजेस कोर्टामध्ये) केलेल्या दाव्यामध्ये संस्थेची बाजू मांडण्यासाठी तसेच संस्थेतर्फे वकील म्हणून ॲड. आनंद नायक यांची नेमणूक केली आहे व ते त्यांचे काम समर्थपणे सांभाळत आहेत. त्यांची नवीन कार्यकारी मंडळाने (विश्वस्त मंडळाने ) फेरनियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यानुसार खालील ठराव मंजूर करण्यात आला.

'' संस्थेने भाडेकरुंच्या विरुध्द लधुवाद न्यायलयात केलेल्या सर्व दाव्यांमध्ये संस्थेची बाजू मांडण्याकरीता वकील म्हणून ॲड. आनंद नायक यांची नेमणूक करण्यात यावी. तसेच त्यांचे मानधन ठरविण्याचे अधिकार पदाधिका-यांना देण्यात यावे.''

ठराव सर्वानूमते मंजूर

**सुचक :- श्री. सदानंद घोटीकर अनुमोदक :- श्री. राजेंद्र खेडलेकर**

**विषय क्रमांक ४.**

ठराव क्रमांक ४

विषय क्रमांक ४ नुसार भाडेकरुंचया विरोधात विविध कोर्टात प्रलंबित असलेल्या दाव्यामध्ये संस्थेतर्फे माजी अध्यक्ष ॲड माधव अनगळ यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्र प्रमुख विश्वस्त म्हणून सादर केले होते. परंतू त्यांच्या शारीरीक दुर्बलतेमुळे असमर्थतेमुळे बाकीच्या २० दाव्यामध्ये त्यांची साक्ष होऊ शकली नाही. राहिलेल्या दाव्यांमध्ये संस्थेच्या कारभाराचा व व्यवहाराचा दीर्घ अनुभव असलेले मंडळाचे व्यवस्थापक श्री. विकास दिनानाथ माने यांना पूर्वीच्या विश्वस्त मंडळाने संस्थेतर्फे या दाव्यामध्ये संस्थेची बाजू मांडण्याचा अधिकार दिला आहे व तशी त्यांची नेमणूक केली आहे. तरी या सभेस विनंती की संस्थेचे व्यवस्थापक श्री. विकास माने यांना संस्थेतर्फे सर्व प्रलंबित दाव्यांमध्ये संस्थेतर्फे साक्ष देणे व इतर न्यायलयीन कामे करणे,योग्य ती कागदपत्रे सादर करणे हे अधिकार देण्यासाठी योग्य तो ठराव करण्यात यावा. तसेच संस्थेचे कार्यवाह श्री. प्रसाद ठकार आणि विश्वस्त श्री. सदानंद घोटीकर यांना या सर्व दाव्यामध्ये संस्थेतर्फे साक्ष देण्यासाठी व तसेच मा. न्यायालयाना आवश्यक असलेली कागदपत्रे व इतर पुर्तता करण्याचा अधिकार देण्यात यावा. तसेच माजी प्रमुख विश्वस्त ॲड. माधव अनगळ यांनाही प्रलंबित दाव्यामध्ये संस्थेतर्फे साक्ष देणे व इतर न्यायालयीन पूर्तता करण्याचा अधिकार देण्यात यावा या विषयावर श्री. सुधाकर कुलकर्णी यांनी कोर्टाच्या दाव्यामध्ये ॲड. माधव अनगळ यांची शारीरीक दुर्बलता असताना त्यांची नियुक्ती कशाला हवी असा प्रश्न उपस्थित केला श्री. सदानंद घोटीकर, श्री. विवेक देशपांडे यानी मा. अनगळांच्या अनुभवाचा फायदा संस्थेने घ्यावा तसेच याकामी श्री. दिपक कुलकर्णी यांना सुध्दा कोर्टाच्या कामात साक्ष देणे न्यायलयीन कामात मदत करण्यासाठी घेण्यात यावे असे मत नोंदविले तर श्री. धायगुडे यानी श्री. विकास माने यांची कोर्टाच्या कामात नियुक्तीची आवश्यकता आहे का असे विचारले. या वरील सर्व बाबीवर साधक बाधक चर्चा झाली त्यानंतर मा. अध्यक्षानी असे सागितले की, कोर्टाच्या दाव्यामध्ये माजी प्रमुख विश्वस्त मा.ॲड. माधव अनगळ यांची खूप मदत झालेली आहे व यापूढेही संस्थेला त्यांच्या मार्गदर्शनाची गरज लागणार आहे त्यामुळे त्यांची नियुक्ती पुन्हा करणे आवश्यक आहे यावर एकमत झाले तसेच श्री. विकास माने यांच्या बरोबर कोर्टाच्या कामात मदत म्हणून एक कार्यकारी प्रतिनिधी जाईल असेही सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

‘‘ लघुवाद न्यायलयात भाडेकरुंच्या विरुध्द प्रलंबित असलेल्या तसेच इतर न्यायलयामध्ये भविष्यात दाखल करण्यात येणा-या सर्व दाव्यांमध्ये संस्थेतर्फे साक्ष देण्याचे, न्यायलयीन कारवाई करण्याचे, आवश्यक ती कागदपत्रे संस्थेतर्फे कोर्टाला सादर करण्याचे,तसेच न्यायलयीन निर्णयाची पूर्तता करण्याचे अधिकार खालील व्यक्तींना सभा देत आहे

१. श्रीयुत. माधव दत्तात्रय अनगळ
२. श्री. विकास दिनानाथ माने
३. श्री. दीपक गोपाल कुलकर्णी
४. श्री. प्रसाद जनार्दन ठकार
५. श्री. सदानंद बद्रीनाथ घोटीकर

**ठराव एकमताने मंजूर**
**सुचक :- श्री. प्रभाकर संत** **अनुमोदक :- श्री. राजेंद्र खेडलेकर**

**विषय क्रमांक ५.**

**संस्थेच्या एकंदरीत व्यवहाराची व्यापकता लक्षात घेवून नामांकीत लेखापालाची अंतर्गत हिशेब तपासनीस यांची नेमणूक करण्यात यावी, त्यांनी दर ३ महिन्याचा याविषयाचा आपला अहवाल द्या व तो कार्यकारी मंडळासमोर विचारार्थ / मंजूरीसाठी ठेवण्यात यावा, यावर कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यानी याविषयी संस्थेस एक अर्ज प्राप्त झालेला**

**असल्याचे सागून ज्यांचा अर्ज आला आहे ते कार्यकारी मंडळाचे सदस्य आहते. त्यामुळे त्यांची नियुक्ती करु नये असे मत मांडले याविषयी अर्ज मागवा आणि कमीत कमी मानधन मागणा-या सी. ए.ची नेमणूक करा असे सुचविले.**

**ठराव :- ''सनदी लेखापालाची अंतर्गत हिशेब तपासनीस म्हणून योग्य त्या मानधनावर नेमणूक करण्यात यावी''**

**ठराव एकमताने मंजूर**

सुचक ः श्री. अनिकेत अष्टेकर अनुमोदक ः श्री दिपक कुलकर्णी .

**विषय :- ६**

**आपली संस्था दरवर्षी हुशार तसेच विशिष्ट प्राविण्य मिळविलेल्या तसेच हुशार व गरजु** विद्यार्थ्यांना अेकूण रु. २००००० /- (दोन लाख फक्त) शैक्षणिक मदत करीत आहे. परंतु परदेशी जाणा-या विद्यार्थी/ विद्यार्थ्यांसाठी कोठलीही कर्जाऊ शिष्यवृत्ती, वा आर्थिक मदत देण्याची मंडळाकडे योजना नाही. संस्थेकडे अनेक सभासदांनी विनंती केली आहे की पूर्वीच्या कर्जाऊ शिष्यवृत्ती परदेशी कर्जाऊ शिष्यवृत्ती या योजनेचे पुनरजीवन करण्यात यावे. ३१ मार्च २०१८ पर्यंत या दोन्ही योजनांखाली संस्थेला रु. १०,६५०००/- (दहा लाख पासष्ट हजार पर्यंत) निधी उपल्बध आहे. तसेच या वर्षी संस्थेने शैक्षणिक निधीमध्ये रु.५,६००००/- पाच लाख साठ हजाराची भर घातली आहे.सभेस विनंती की या वर्षी शैक्षणिक निधीचे वाटप पूढील प्रमाणे करण्यात यावे.

अ) उच्चशिक्षणार्थ कर्जाऊ / परदेशी जाणा-या विद्यार्थ्यी / विद्यार्थ्यीनीसाठी रु.२५००००/- (दोन लाख पन्नास हजार पर्यंत)

ब) शैक्षणिक मदत हुशार, गरजु व अल्प उत्पन्न (वार्षिक रु. १,२०,०००पर्यंत) धारकांच्या विद्यार्थी/ विद्यार्थीनीसाठी रु.१,००,०००एक लाख पर्यंत

क) शैक्षणिक पारितोषिक / शिष्यवृत्तीरुपाने हुशार विद्यार्थी / विद्यार्थ्यीनीसाठी रु १,५०,०००.०० (एक लाख पन्नास हजार पर्यंत)
असे मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी विषयानुसार सुचविले.

या विषयात विस्तृत चर्चा झाली या चर्चेमध्ये श्री. खेडलेकर श्री. धायगुडे श्री. बापूराव कुलकर्णी, संजय कुलकर्णी, श्री. विवेक देशपांडे डॉ. महाशब्दे श्री. प्रसाद ठकार यांनी या सदंर्भात आपली मते व्यक्त केली. या सर्व कार्यासाठी एक शेक्षणिक समिती नेमावी, कर्जाऊ शिष्यवृत्ती देताना काळजी घ्यावी, किमान पारितोषिके मिळावीत, ब्राह्मण मुलामुर्लीकडे परिस्थिती नसल्याने इंजिनिअरींगसाठी मदत करण्यासाठी विचार व्हावा या सर्व मतानंतर कार्याध्यक्ष म्हणाले, आपण आजपर्यंत शैक्षणिक शिष्यवृत्या देत होतो.तसे त्यासाठी देणग्याही मिळत होत्या. आजपर्यंत विषयानुसार विद्यार्थ्यांना त्या शिष्यवृत्या आपण देवू शकलो नाही कारण त्यासाठी योग्य ते अर्ज संस्थेला प्राप्त होत नव्हते. हुषार विद्यार्थ्यांना आपण मदत केली पाहिजे. कर्जाऊ दिलेल्या शिष्यवृत्यांची वसुली करणे बाकी आहे. संस्थेने प्रयत्न केले आहेत व अजूनही प्रयत्न आपण करीत आहोत. शिष्यवृत्तीसाठी रु.५ लाखापर्यंत मदत आपण करावी असे मत व्यक्त केले. अजूनही काही अर्ज मदतीसाठी आलेले आहेत ते मंजूर करावे असे मत श्री. प्रसाद ठकार यांनी मांडले या सर्व चर्चेचा विचार करता या सर्व बाबीसाठी एक शैक्षणिक मदत समिती नेमण्यात यावी असे मा. अध्यक्ष श्री. विलास जोशी यानी सुचविले.

चर्चेअंती खालील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

‘‘ शैक्षणिक वर्ष २०१९ - २० साली देण्यात येणा-या शैक्षणिक मदती संबंधी वर दिल्याप्रमाणे अ ते क या वर्गवारीप्रमाणे मदत करण्याबाबत धोरण तयार करण्यासाठी खालील सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी
१. श्री. संजय कुलकर्णी,
२. श्री. अश्विनीकुमार उपाध्ये
३. श्री.रत्नाकर धायगुडे,
४.श्री. दिपक कुलकर्णी,
५.श्री. महाशब्दे,
आणि पदाधिकारी

ठराव एकताने मंजूर.

सूचक :- श्री. विलास कुलकर्णी अनुमोदक :- श्री. अनिकेत अष्टेकर

**विषय क्रमांक ७.**
संस्थेच्या कार्यालयाची स्थिती अतिशय बिकट झाली आहे. दुसऱ्या मजल्यावरील स्वयंपाक घरामधून गळणा-या पाण्यामुळे सर्व भिंती तसेच छताला भेगा पडल्या आहेत. तसेच संस्थेचे टेबल.खुर्च्या. कपाटे ही सर्व जुनी असल्यामुळे संपूर्ण गंजलेली व खराब झालेली आहेत. बहुतेक सामान जूने ३०ते ४० वर्षाचे जूने आहे. सबब कार्यालयाचे नूतनीकरण करण्याची नितांत आवश्यकता आहे. याचा विचार करुन सभेने कार्यालयाच्या संपूर्ण नूतनीकरणासाठी रु.५,००,०००/- (पाच लाख मात्र) पर्यंतच्या खर्चास मंजूरी द्यावी. हा खर्च सर्व साधारण सभेने मंजूर केलेल्या रु. ३००००००/- (तीस लाख) पर्यंतच्या खर्चाचा एक भाग असल्याचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यानी सुचविले या विषयावर श्री. सुधाकर कुलकर्णी यांनी महिलांसाठी स्वतंत्र खोलीची आवश्यकता असल्याचे मत नोंदविले वरील सर्व बाबींचा विचार करुन खालील ठराव मांडण्यात आला.
‘‘ संस्थेच्या कार्यालयाच्या नूतनीकरणासाठी रु.५,००,०००/-(पाच लाख) पर्यत मंजूरी देत आहे. हा खर्च सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या रु. ३००००००/-(तीस लाख) पर्यत खर्चाचा एक भाग असेल.

ठराव एकमताने मंजूर
सूचक :- श्री. प्रसाद ठकार अनुमोदक :- सुधाकर कुलकर्णी

**<u>विषय क्रमांक ८.</u>**

दिनांक १५.७.२०१८ रोजी ७२ व्या सर्व साधारण सभेने मंजूर केलेल्या ठरावा नुसार कार्यकारी मंडळास रु.३००००००/- (तीस लाख फक्त) पर्यंत दुसऱ्या मजल्या पर्यंत उदवाहक बसविण्याची व दुसऱ्या मजल्यावरील सभागृह वातानुकुलीत करण्यासाठी मंजूरी देण्यात आली आहे, त्यानुसार येणाऱ्या निविदांवर विचार करुन योग्य त्या निवेदेस मंजूरी देण्यात यावी. या वरील चर्चेत भाग घेताना श्री. सुधाकर कुलकर्णी, राजेंद्र खेडलेकर, संजय कुलकर्णी, सदानंद घोटीकर, विवेक देशपांडे यांनी सुधारणा सुचविल्या, गेस्ट रुम राहण्यायोग्य करावी. जिन्याचा काही भाग पाडून व्यवस्थीत बांधणे, सुविधा वाढविणे, रुम उपलब्ध झाल्या की सोयी उपलब्ध करुन देता येईल असे मत श्री. प्रभाकर कुलकर्णी कार्याध्यक्ष यानी व्यक्त केले, तसेच श्री. विवेक देशपांडे यांनी फायर सेपटीबाबत मत व्यक्त केले. या सर्व सूचनांचा विचार करुनच रु.७ लाख बजेट मंजूर करावे व तसेच कॅटररला बोलवून फायर सेपटीबाबत सुचना देण्यात आल्या आहेत

या सर्व बाबीसाठी ‘‘इमारत समिती ’’ गठीत करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला या समितीमध्ये पुढील प्रमाणे नावे घेण्यात आली.

१. श्री. सदानंद घोटीकर
२. श्री. विवेक देशपांडे
३. श्री. प्रसाद ठकार
४. श्री. प्रभाकर कुलकर्णी
यांचा समावेश असल्याचे अध्यक्षांनी घोषित केले.

सूचक :- श्री. विलास कुलकर्णी अनुमोदक :- श्री. अनिकेत अष्टेकर

**विषय क्रमांक ९**. कार्याध्यक्षांनी सभेला सांगितले कि संस्थेची सभागृहे वर्षातून फक्त ७० ते ८० वेळा भाडयाने घेतली जातात.सभागृहापासून मिळणारे उत्पन्न वाढविण्यासाठी भाडे दरपत्रीकेत तसेच वेळांमध्ये योग्य तो बदल करावा जेणे करुन संस्थेचे उत्पन्न वाढेल यास सभेने मंजूरी द्यावी.यासाठी कार्यकारी मंडळाने विशेष तज्ञांची समिती नेमून निणर्य घ्यावा.असा विषय पत्रीकेतील विषय कार्याध्यक्ष यांनी मांडला यावर १ श्री. सदानंद घोटीकर यांनी निविदा मागविल्या जात आहेत. सर्व बाबींचा विचार केला जात आहे. २. श्री. प्रभाकर कुलकर्णी गणपती पूजेचे वर्ग घेतले जातात त्यासाठीकिमान दर असावेत. संस्थेत भजन वगैरे होत असतील त्यासाठी देखील किमान दर लावावेत असे सुचविले. गणेशउत्सवासाठी हॉल मिळावा ही विनंती आली आहे. सज्जनगडच्या पादूका येतात त्यांना संस्थेतर्फे जागा द्या. ३. श्री. सुधाकर कुलकर्णी लिपटची क्वॉलीटी पहा, बटरी बॅकअप हवे, इमारत समितीचे याबाबत दिलेले रिपोर्ट पाहून योग्य ती कार्यवाही करावी.

या सर्व मतांचा विचार करुन मा. अध्यक्षांनी असे सांगितले की जुन्या इमारतीची पाहणी करुन, तज्ञांना विचारुन समितीने सुचविल्याप्रमाणे हॅड्रॉलिक वा इलेक्ट्रीक उदवाहक घ्यायचे ते ठरविण्यात येईल. यावर श्री. सुधाकर कुलकर्णी यानी इन्हर्टर / जनरेटर ही असायला हवे समाजासाठी निस्वार्थपणे काम करणा-या संस्थांना भाडयात सूट मिळावी असे मत मांडले. श्रीमती भारती जोशी यानी उद्योजक महिलांसाठी सूट देण्यात यावी असे मत मांडले.

मा. अध्यक्षांनी सांगितले की इमारतीचा कोणताही भाग विनामूल्य वापरायला देवू नये, या संबंधात काही नियम तयार करुन कार्यवाही करावी. चर्चेअंती खालील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.
ठराव '' सभागृह भाडे देण्यासबंधी नियमावली करण्यासाठी योग्य ते नियम करण्यात यावे,जेणेकरुन भाडयाच्या उत्पन्नात वाढ होईल. तसेच सध्याच्या नियमांमध्ये आवश्यकता असल्यास सुघारणा करण्यात याव्यांत त्यासाठी खालील सदस्यांची समिती नेमण्यात यावी श्रीयुत. सदानंद घोटीकर, श्री. प्रसाद ठकार, श्री. प्रभाकर कुलकर्णी

ठराव एकमताने मंजूर
सूचक :- श्री. प्रसाद ठकार अनुमोदक :- श्री. संजय कुलकर्णी

**विषय क्रमांक १०**.

कार्याध्यक्षांनी सांगितले कि सध्याच्या कार्यकारी मंडळाच्या ३१ सदस्यांपेकी १९ सदस्य मुंबई शहराबाहेरचे आहेत. कार्यकारी मंडळाच्या किमान ५ ते ६ सभा बोलविण्याची गरज आहे, तसेच कार्यकार परिषदेच्या ४० सदस्यांपैकी २५ सदस्य मुंबई बाहेरील आहेत. त्यांच्या २ ते ३ सभा आवश्यकतेनुसार घेण्यात येतील. याचा विचार करता

प्रवास भत्यामध्ये प्रचंड वाढ अपेक्षित आहे. याचा विचार करुन कार्यकारी मंडळ/ परिषद सदस्याना देण्यात यावयाचा प्रवास खर्चा संबधी मार्गदर्शक तत्वे मंजूर करावीत.

या विषयावर श्री. सुधाकर कुलकर्णी यानी II Class with Res मंजूर करावे असे मत मांडले. श्री. विवेक देशपांडे यांनी सुचविले कि योग्य प्रस्तावांचा कार्यकारी मंडळ व परिषदेंच्या सभेमध्ये विचार व्हावा.

यावर मा. अध्यक्षांनी सांगितले की पदाधिका-यांचा त्यांच्या सन्मानाप्रमाणे त्यांना रेल्वे AC lll /AC बसचे भाडे खर्च म्हणून मंजूर करण्यात यावे. ही सवलत प्रायोजिक तत्वावर एक वर्षापर्यंत असावी व त्यानंतर त्याचा आढावा घेण्यात यावा. श्री. सतिश पाटील यानी कार्यकारी मंडळ / परिषदेची बैठक एकाच वेळी व्हावी असे मत मांडले.

**ठराव '' कार्यकारी मंडळ व कार्यकारी परिषदेंच्या सदस्यांना सभेस उपस्थित राहण्यासाठी त्यांच्या निवास स्थानापासून सभेच्या स्थानापर्यंत रेल्वेने lll AC किंवा रेल्वेची सुविधा नसेल तर AC बसचे भाडे प्रवास खर्च म्हणून देण्यात यावा. हे धोरण पुढील एक वर्षाकरीता राहिल ऑगस्ट २०१९ मध्ये त्याचा आढावा घेण्यात येईल.**

ठराव एकमताने मंजूर
सुचक :- श्री. सुधाकर कुलकर्णी अनुमोदक श्री. विवेक देशपांडे

विषय क्रमांक ११.

कार्याध्यक्षांनी सांगितले कि संस्थेचा एकूण कारभार व व्याप वाढत आहे तसेच विभागवार कार्यवाहांची व संघटक सचिवांची निवड / नेमणूक करण्यात आली आहे. घटनेनुसार कार्यकारी मंडळाच्या पदाधिका-यांची कर्तव्य व अधिकार तसेच कार्यालयीन कामकाज यांचा विचार करुन योग्य त्या जबाबदा-या नवनिर्वाचित पदाधिका-यांना देणे आवश्यक आहे. यासाठी पदाधिका-यांची सभा घेण्यात येईल व त्यांच्याशी विचारविनीमय करुन कामाचे वाटप व्हावे.

**ठराव '' कार्याध्यक्षांनी पदाधिका-यांची सभा बोलवून व त्यांच्याशी विचारविनिमय करुन तसेच घटनेनुसार कामाचे वाटप करावे ''**

सूचक :- श्री. विलास कुलकर्णी अनुमोदक :- श्री. सदानंद घोटीकर

विषय क्रमांक १२:-

एकूण विभागवार सभासद संख्येचा विचार करता पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा विभागास योग्य प्रतिनिधीत्व देण्याची गरज आहे. त्याचा विचार करुन पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा या विभागासाठी दोन सचिवांची संघटन सचिव म्हणून नेमणूक करण्यात यावी. यावर श्री. महाशब्दे यांची विदर्भासाठी प्रतिनिधीतत्व दया असे सुचविले. यावर चर्चेअंती खलील सदस्यांची संघटक सचिव म्हणून नियुक्ती करण्यात यावी असे सुचविले.

**ठराव :-** ''श्रीयुत मधुकर कुलकर्णी लातूर यांची मराठवाडा विभागाच्या संघटक सचिवपदी व श्रीयुत अनिकेत अष्टेकर पश्चिम महाराष्ट्रच्या संघटक सचिवपदी नेमणूक करण्यात येत आहे.''

ठराव एकमताने मंजूर

सूचक :- श्री. प्रभाकर संत अनुमोदक सौ. भारती जोशी

विषय क्रमांक १३.

''विषय क्रमांक १ वर झालेल्या चर्चेनुसार सुलभ व्यवहार व योग्य आर्थिक व्यवस्थापनासाठी चार्टड अकॉन्टंट श्री. विनोद मांडके यांची सहकोषाध्यक्षपदी नियुक्ती / नेमणूक करण्यात येत आहे. ''

ठराव एकमाने मंजूर
सूचक :- सौ. आश्विनी नारवीलकर अनुमोदक :- श्री. सदानंद घोटीकर

विषय क्रमांक १४.
नवीन आलेल्या ४२ सभासदांच्या अर्जांस सभेने मंजूरी दिली.

ठराव एकमताने मंजूर
सूचक श्री. अनिल पानसे अनुमोदक :- श्री. अनिकेत अष्टेकर

विषय क्रमांक १५.

यावर चर्चा करताना श्री. राजेंद्र खेडलेकर यांनी सुचविले की संस्थेकडे सर्व संलग्न संस्थांची अद्यावत माहिती असावी व संस्थेचे बोधचिन्ह असावे. सभासदांच्या अर्जाला त्या त्या संस्थेने मंजूरी देणे आवश्यक आहे असे मत सुधाकर कुलकर्णी यांनी सुचविले. श्री. विवेक देशपांडे यानी सुचविले की घटनेची प्रत सर्वांना वितरीत करण्यात यावी

ठराव :- '' या सर्व सूचनांचा विचार पुढील सभेमध्ये करण्यात येईल''
ठराव एकमताने मंजूर
सूचक :- श्री. राजेंद्र खेडलेकर अनुमोदक श्री. अनिकेत अष्टेकर

विषय क्रमांक १६.

यावर कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले कि प्रत्येक संलग्न संस्थेने आपआपल्या भागात मध्यवर्ती मंडळाचे सभासद वाढविणे महत्वाचे आहे. त्यासाठी कार्यकारी मंडळ,/ कार्यकारी परिषद प्रत्येक सदस्याने या अभियानात भाग घेऊन सभासद वाढविण्याचे काम पूर्ण करावे असे आपले मत मांडले. सभेने याची नोंद घेतली.

ठराव :- ''सर्व संलग्न संस्थांनी, कार्यकारी मंडळ व कार्यकारी परिषद सदस्यांनी नवीन सभासद नोंदणी अभियानात भाग घेऊन संस्थेची सभासद संख्या वाढवावी.''
ठराव एकमताने मंजूर
सूचक श्री. संजय कुलकर्णी अनुमोदक श्री. सदानंद घोटीकर

विषय १७. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय. मध्ये प्रसाद ठकार यानी गठन केलेल्या निरनिरळया समितितील सदस्यांची नावे वाचून दाखविली ती पुढील प्रमाणे

१. घटना  समिती :-   १. श्रीमती सुषमा इनामदार २. श्री. सुनिल पारखी ३. श्री. रत्नपारखी

२. निधी समिती :-   १. श्री. अनिल श्रीधर पानसे २. श्रीमती रेखा गुरुजी

३. महिला समिती :-   १. श्री.प्रज्ञा हरहारे

४. ऋृषी समिती :-   १. श्री. विलास कुलकर्णी  २. श्री. अनिकेत अष्टेकर

५. सहकार  :-   १. महेंद्र गंधे

वरील सर्व समित्या व त्यामधील नावे सर्वमताने मजूंर केल्याचे मा. अध्यक्ष यांनी घोषीत केले.
सभासदांची संख्या सर्व जिल्हयातून तालुक्यातून वाढली पाहिजे तसेच संस्थेचे उपक्रम लोकांपर्यत पोहोचले पाहिजे असे मत व्यक्त करुन सर्वांच्या सहकार्याबदल आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

अध्यक्ष        कार्याध्यक्ष        सचिव

मंडळाने लघुवाद न्यायालयात केलेल्या दाव्यांमध्ये संस्थेची बाजु मांडण्याकरीता संस्थेतर्फे ॲडव्होकेट श्री. आनंद नायक यांची नेमणूक केली होती, ते आजपर्यंत काम पाहत होते. त्यांची फेरनियुक्ती करणे आवश्यक वाटत असल्याने या सर्व दाव्यांकरीता त्यांची  वकील / कायदेशीर सल्लागार म्हणून  फेरनियुक्ती करण्यात आली. खालील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला

**‘‘अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाने (या नंतर मंडळ म्हणून संबोधावे) लघुवाद न्यायलय (Small Causes court) या मध्ये भाडेकरुंच्या विरुध्द प्रलंबित असलेल्या तसेच भविष्यात भाडेकरुच्या विरुध्द दावे दाखल करण्यात येणा-या सर्व दाव्यांमध्ये व मंडळातर्फे न्यायालयीन कारवाई मध्ये मंडळाची बाजू मांडण्यासाठी वकील म्हणून ॲड. आनंद नायक यांची फेरनेमणूक करण्यात येत आहे.’’**

मंडळाने लघुवाद न्यायालयात केलेल्या दाव्यांमध्ये संस्थेची बाजु मांडण्याकरीता  संस्थे तर्फे ॲडव्होकेट  श्री. आनंद नायक यांची नेमणूक केली होतीव ते आजपर्यंत काम पाहत होते. त्यांची फेरनियुक्ती करणे आवश्यक वाटत असल्याने यासर्व दाव्यांकरीता त्यांची संस्थेचे कायदेशीर सल्लागार म्हणून सभेत एकमताने नियुक्ती करण्यात आली. सभेने या नियुक्तीस मंजूरी दिली.
‘‘अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळाने (हयापुढे मंडळ म्हणून संबोधावे) भाडेकरुंच्या विरुध्द प्रलंबित असलेल्या सर्व दाव्यांमध्ये मंडळातर्फे साक्ष देण्याकरीता व मंडळाची बाजू मांडण्यासाठी, तसेच न्यायालयास आवश्यक असलेली कागदपत्रांची पूर्तता शपथपत्र (Affidavit) दाखल करणे कोणताही अनुषंगाने अर्ज करणे व इतर न्यायालयीन कामकाजाची पूर्तता करण्याकरीता खालील सदस्यांना अधिकार देण्याचे सभेने एकमताने ठरविले आहे.

खालीलपैकी कोणा एकासही हे अधिकार देण्यात आले आहेत, या शिवाय वरील ठरावामधील व त्यापैकी कोणा एकासही दाव्यामध्ये वकील नेमण्यासाठी वकील पत्रावर मंडळातर्फे सही करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

वरील दाव्यात हुकूमनामा झाल्यानंतर हुकमनाम्याच्या बजावणीसाठी जी जी कारवाई करणे आवश्यक आहे,  ती सर्व कारवाई करण्याबाबत त्यांना अधिकार देण्यात येत आहे.

१) ॲड. श्री. माधव दत्तात्रय अनगळ  (माजी अध्यक्ष)
२) श्री. विकास दिनानाथ माने (व्यवस्थापक)
३) श्री. प्रसाद जनार्दन ठकार (कार्यवाह)
४) श्री. दिपक गोपाळ कुलकर्णी
५) श्री. विवेक कृष्णा देशपांडे ''

संस्थेच्या एकंदरीत व्यवहाराची व्यापकता लक्षात घेऊन नामांकीत सनदी लेखापालाची अंतर्गत हिशोब तपासनिस यांची नेमणूक करण्यात यावी त्यांनी दर ३ महिन्यांनी आपला अहवाल कार्यकारी मंडळासमोर द्यावा.यावर श्री. अनिल श्रीधर पानसे यांनी विचारले की अंतर्गत हिशोब तपासनिसासाठी आपल्याकडे अर्ज आले आहेत का तेव्हा श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगीतले की कार्यकारी परिषदेतील सदस्य श्री. निशिकांत बुधकर यांचा अर्ज कार्यालयात आलेला आहे तसेच त्यांनी सांगीतले मंडळाचे सदस्य श्री. विनोद विठ्ठल मांडके हे अंतर्गत हिशोब तपासनिसाचे काम बघतील त्यांची मंडळाने सहकोषाध्यक्ष म्हणून नियुक्ती केलेली आहे. यावर चर्चा करून सभेने वरील ठरावास मंजूरी दिली.

पहिल्या ३ महिन्यांचा अहवाल  श्री. विनोद मांडके हयांनी सादर केल्यावर पुढिल कार्यकालाकरीता आवश्यक्यतेनुसार अंतर्गत हिशोब तपासनिस नेमण्यावर निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या कार्यकारी मंडळाची व कार्यकारी परिषदेची संयुक्त सभा रविवार दिनांक ११.११.२०१८ रोजी सकाळी १०.५५ मध्यवर्ती मंडळाच्या सभागृहात मा श्री.विलास विनायक जोशी यांच्या अध्यक्षतेखाली व श्रीयुत प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

१. श्री. विलास विनायक जोशी ( अध्यक्ष)
२.श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष)
३. श्री. प्रदीप नारायण कुलकर्णी (कोषाध्यक्ष)
४.श्री. प्रसाद जनार्दन ठकार (कार्यवाह)
५. श्री. दत्तात्रय खंडेराव कुलकर्णी (कार्यवाह)
६. श्री. राजेद्र दिनकर खेडलेकर (कार्यवाह)
७. श्री. विनोद विठठल मांडके (सहकोषाध्यक्ष)
८. श्री. संजय मधुसूदन कुलकर्णी (कार्यवाह)
९. सौ. अश्विनी हेमकांत नारविलकर (सदस्य)
१०. श्री. विवेक कृष्णा देशपांडे (सदस्य)
११. श्रीमती. पुष्पा प्रकाश कुलकर्णी (सदस्य)
१२. श्री. शरद पां. पारसनीस (सदस्य)
१३. श्री. विलास शंकर कुलकर्णी (सदस्य)
१४. श्री. विनोद केशवराव देशमुख (सदस्य)
१५. श्री. दिगंबर श्रीपाद अष्टेकर (सदस्य)
१६. श्री. अनिल श्रीधर पानसे (सदस्य)
१७. श्री. अश्विनीकुमार प.उपाध्ये (सदस्य)
१८. श्री. संजीव रामचंद्र घळसासी (सदस्य)
१९. श्री. सदानंद बद्रीनाथ घोटीकर (सदस्य)
२०. श्री. प्रभाकर अनंत संत (सदस्य)
२१. डॉ. हरी शंकर महाशब्दे (सदस्य)
२२. सौ. सुषमा इनामदार (सदस्य)
२३. सौ. मुक्ता मुकूंद हुल्याळकर (सदस्य)
२४. श्री. वासुदेव प. चिटणीस (सदस्य)

कार्यकारी मंडळ परिषद सभेस खालील सदस्य उपस्थित होते

१. श्री. विलास विनायक जोशी ( अध्यक्ष)
२.श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष)

३..श्री. अरविंद हस्तेकर

४. श्री. शिशिकांत विष्णू चंद्रचूड

५.सौ. चारुशीला चंद्रकांत झिंजोर्डे

६. श्री. संजीव रामचंद्र घळसासी

७.श्री. पदमाकर अत्रे

८. श्री. श्रीकांत ना. कानडे

९.श्री. हेमंत (अभय) कुलकर्णी

१०. श्री. मकरंद सुखात्मे

११.श्री.श्रीकांत सरडे

१२. श्री. श्रीराम कुलकर्णी

१३.श्री.हेमकांत नारविलकर

१४. श्री. कृष्णा जोशी

१५. डॉ. लक्ष्मीकांत दाणी

श्री. प्रभाकर कुलकर्णी (कार्याध्यक्ष) यांनी सभेस उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत केले आणि अनुपस्थित सदस्य ज्यांनी त्यांची अनुपस्थितीती कळविली आहे त्यांची नावे वाचून दाखविली.

१. श्री. सतिश पाटील २. श्री. श्रीकांत पाटसकर ३.श्री. सुधाकर कुलकर्णी ४. श्री. अनिकेत अष्टेकर ५. श्री. महेंद्र गंधे ६. सौ. भारती जोशी ७. श्री. दिपक कुलकर्णी ८. श्री. मधुकर कुलकर्णी

कार्यकारी परिषद अनुपस्थित सदस्य ज्यांनी त्यांची अनुपस्थितीती कळविली आहे त्यांची नावे वाचून दाखविली.ती खालील प्रमाणे.

१. श्री. शरद गंगाधर मुनीश्वर २. श्री. भाऊसाहेब रंगनाथ कुलकर्णी ३. श्री. भाऊराजे जहागीरदार ४. श्री. संकेत कुलकर्णी ५.सौ.मिनल गंधे ६. सौ.सुनदा आळतेकर ७.श्री. किशोर मंगळवेढेकर ८. सौ. ज्योती जोशी ९. श्री. अजितकुमार देशपांडे १०. श्री. सुनील पारखी ११. श्री. बळवंत अहंकारी १२. सौ. रोहिणी तडवळकर १३. सो. रोहिणी केसरी १४. श्री. निश्किांत बुधकर १५. श्रीमती प्रज्ञा हरहरे १६. श्री. संजय ब्रम्हे १७. श्री. जयंत देशपांडे १८. श्री. शरद जोशी १९. श्री. शतनु चौधरी २०. श्री. श्रीकांत कानडे

सभेने याची नोंद घेतली.

विषय क्रमांक :- १ दिनांक १२.०८. २०१८ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

मंडळाचे कार्यवाह श्री. प्रसाद ठकार यांनी इतिवृत्त वाचन केले त्यावर चर्चा होऊन ते इतिवृत्त सभेने एकमताने मंजूर केले.

सुचक :- श्री. प्रभाकर संत अनुमोदक :- श्री. विलास कुलकर्णी

विषय क्रमांक :२ आतापर्यंत झालेल्या कामाचा आढावा घेणे.

श्री. प्रभाकर कुलकर्णी कार्याध्यक्ष यांनी सभेस खालील निवेदन केले. मंडळाची निवडणुक होऊन २-३ महिने झाले आहेत आता पर्यंत मंडळाने जी कामे केली ती पुढील प्रमाणे

अ. पदाधिका-यांच्या स्वाक्षरीने सर्व बँकांनमध्ये संस्थेचे व्यवहार सुरु करण्यात आले आहेत.

ब. मा. धर्मादाय आयुक्तांकडे नवीन निवडणून आलेल्या सर्व प्रतिनिंधीच्या स्वाक्ष-या असलेले संमतीपत्र तयार करुन त्यावर सर्व सदस्यांच्या सहया घेऊन त्याच्या बदल अर्ज (चेंज रिपोर्ट) कलम २२ खाली दिनांक २६.१०.२०१८ रोजी धर्मादाय आयुक्त कार्यालयात सादर करण्यात आला. चेंज रिपोर्टवरती स्वाक्षरी मिळविण्यासाठी मंडळाचे सदस्य श्री. प्रभाकर अनंत संत यांनी संपूर्ण महाराष्ट्र फिरुन स्वाक्ष-या आणल्या आहेत. मंडळाचे सुमारे १८ सदस्य मुंबई वाहेरील आहेत. त्या सदस्यांच्या सहया चेंज रिपोर्टवर त्यांच्या गावी जाऊन म्हणजेच संपूर्ण महाराष्ट्र फिरुन स्वाक्ष-या घेण्याचे कठीण काम कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री. प्रभाकर अनंत संत यानी आठवडाभर केले या वयामध्ये त्यांचा उत्साह खरोखर वाखाण्या जोगा आहे याबदल कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यानी संस्थेतर्फे त्यांचे आभार मानले व इतर सर्व सदस्यांनी त्यांच्या या कामाबदल त्यांचे अभिनंदन केले.

क. संस्थेच्या कार्यालयाच्या नूतनीकरणाचा खर्च रु.५,००,०००/- (पाच लाख) साठी वार्षिक सर्वसाधारण सभेने दिनांक २७.६.२०१८ रोजी मंजूरी दिली आहे. त्यानुसार संस्थेच्या कार्यालयाचे नूतनीकरण पूर्ण होऊन त्याचे उदघाटन प्रख्यात वास्तुविशारद श्री. अरविंद नांदापूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. या नूतनीकरणासाठी कार्यकारी मंडळ सदस्य श्री. सदानंद घोटीकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले आहे या संबधीच्या खर्चाची माहिती आपले कोषाध्यक्ष सहकोषाध्यक्ष सभेस देतील. कार्याध्यक्षांच्या वरील विवेचनाची सभेने नोंद घेतली.

ड. कार्याध्यक्षांच्या विनंती नुसार,संस्थेचे सहकोषाध्यक्ष श्री. विनोद मांडके यानी सभेला सांगितले की नूतनीकरणासाठी झालेला फर्निचर सहित एकूण खर्च रु. ६,५७,५४४/- एवढा झाला आहे. त्यांनी या खर्चाची विगतवार माहिती सभेला सादर केली हा खर्च मंजूर रक्कमेपेक्षा रु. १,५७५४४/- ती अधिक असल्याचे सांगितले. यावर सदस्यांनी त्यांची मते मांडताना सांगितले की जरी खर्च जास्त झाला आहे. तरी तो योग्य आहे. कारण तो खर्च अत्य आवश्यक होता. व कार्यालयाच्या निकडीनुसार झाला आहे. तसेच सर्व सदस्यांनी या कामाबदल समाधान व्यक्त केले व श्रीयुत घोटीकर यांनी या कामासाठी विशेष परिश्रम घेतले त्याबदल त्यांचे आभार मानले. सर्वानुमते खालील ठराव मंजूर करण्यात आला

.'' सभागृहाच्या नूतनीकरणासाठी झालेला एकूण रु.६,५७,५४४/- या खर्चास सभा मंजूरी देत आहे. व या नूतनीकरणासाठी श्री. सदानंद घोटीकर यांनी केलेल्या परिश्रमाची नोंद सभा घेत आहे व त्यासबंधी त्यांचे आभार मानत आहे.''

सूचक :- श्री. विनोद मांडके अनुमोदक :- श्री. प्रभाकर संत

ई. संस्थेने लघुवाद न्यायालयात भाडेकरुंच्या विरुध्द दाखल केलेल्या दाव्यांमध्ये मंडळाचे माजी अध्यक्ष ॲड. माधव अनगळ, संस्थेची बाजू समर्थपणे मांडत आहेत. काही दाव्यांमध्ये त्यांची उलट तपासणी चालू असून तीहि ते या वयात त्यांची साक्ष समर्थपणे देत आहेत. त्यांच्या या कार्याची व मार्गदर्शनाची सभेने नोंद घेतली व त्यांचे आभार मानले.

. लघुवाद न्यायालयात भाडेकरुंच्या विरुध्द प्रलंबित असलेल्या दाव्यांमध्ये संस्थेतर्फे बाजू मांडण्यासाठी तसेच साक्ष देण्यासाठी आधिक दोन सदस्यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. हे सदस्य ॲड. माधव अनगळ व विकास माने यांना त्यांच्या कामात मदत करतील या सबंधी चर्चा होऊन मंडळाचे सदस्य श्री. दिपक कुलकर्णी, डोंबिंवली व श्री. विवेक देशपांडे, दादर यांची नावे सुचविण्यात आली त्याला त्या दोघांनी होकार दिला. चर्चेअंती खालील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

**'' श्रीयुत दिपक कुलकर्णी व विवेक देशपांडे यांना लघुवाद व इतर न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या दाव्यांमध्ये संस्थेची बाजू मांडण्याचे, दावा दाखल करण्याचे, साक्ष देण्याचे, उलट तपासणी घेण्याचे, न्यायालयास आवश्यक असलेली कागदपत्रे सादर करण्याचे व वकीलाला मदत करण्याचे तसेच न्यायालयाच्या निर्णयाची अमंलबजावणी करण्याचे अधिकार संस्थेतर्फे हि सभा देत आहे''**

सूचक :- श्री. दत्तात्रय खंडेराव कुलकर्णी अनुमोदक :- श्री. शरद पारसनीस

विषय क्रमांक :-३

सभागृह व्यवस्थापनाच्या कराराच्या नूतनीकरणासबंधी माहिती देताना श्रीयुत प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले की सध्याचे कंत्राटदार मयूर कॅटरर्स दरवर्षी रु. ३०००००/- (तीस लाख)

मंडळास देत आहेत. या करारची मुदत ३० एप्रिल २०१८ रोजी संपली आहे. त्यांनी त्यांची कराराची मुदत पुढील ३ वर्षासाठी वाढवून देण्यात यावी अशी विनंती केली आहे. ती पुढील प्रमाणे ( १ मे २०१८ ते ३० एप्रिल २०२१ ) या संबंधी त्यांनी स्पष्टीकरण दिले की वस्तु व सेवाकर १ जूलै २०१८ पासून आपल्यालाही लागू आहे व त्यानुसार मागील करारात देय असलेला वस्तु व सेवाकराची रक्कम रु. २,७०,०००/- आहे हि रक्कम देण्यास त्यांनी नकार दिला आहे. व हा कर आता संस्थेला भरावा लागणार आहे. कंत्राटदराच्या म्हण्यानुसार वस्तु व सेवा कराराच्यी नोंद पूर्वीच्या करारनाम्यात नव्हती.

मयूर कॅटरर्स यांच्याशिवाय दुसऱ्या एका कंत्राटदराने सुध्दा वार्षिक रु. ३२,०००००/- (बत्तीस लाख) देण्याचा प्रस्ताव संस्थेला पाठविला आहे.

यावर बोलताना श्रीयुत प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले की पुढील कराराअंतर्गत वस्तु व सेवाकर भरण्याचे आश्वासन मयूर कॅटरर्स यानी दिले आहे. तसेच आतापर्यंतच्या कालात मयूर कॅटरर्स यानी त्यांनी देय असलेली रक्कम वेळेत भरली आहे. तसेच सर्व साधारण सभेच्या जेवणा खाण्याचा सर्व खर्च मयूर कॅटरर्स करत असतात. य सगळयाचा विचार करुन मयूर कॅटरर्स यांचा सभागृह व्यवस्थापनाचा करार १ मे २०१८ ते ३० एप्रिल २०२१ या कालावधीकरीता वार्षिक रु. ३,००,००,००/- (तीस लाख) + GST देय वस्तु व सेवाकर या शर्तीवर मंजूर करण्यात यावा. संस्थेचे माजी कार्यवाह श्री. शरद पारसनीस यानी सुध्दा मयूर कॅटरर्स देत असलेल्या सेवेबदल समाधान व्यक्त केले व त्यांच्या बरोबरच्या कराराचे नूतनीकरण करावे असे सुचविले.

अध्यक्ष श्रीयुत विलास विनायक जोशी यांनी सुचविले की, करारनामा करताना महानगर पालिकेकडून अग्निप्रतिबंधक परवानगया सबंधी योग्य ती संमतीपत्रके मिळविण्यात यावी जेणेकरुन भविष्यात एखादी अघटित घटना घडली किंवा स्वयंपाक घरात वा सभागृहात आग लागली तर त्याची जबाबदारी कंत्राटदारावर असावी.

त्यांनी पूर्वीच्या विश्वस्त मंडळाने केलेल्या दुरुस्ती कामाचे कौतुक केले व त्यांच्या या कामामुळे संस्थेच्या सभागृहाला वैभव प्राप्त झाले आहे असे सांगितले. ठरावास मंजूरी देताना त्यांनी असे सुचविले की शक्य झाल्यास मयूर कॅटरर्स यांच्याकडून मागील वर्षाच्या वस्तु व सेवाकर पोटी रु.१,००,०००/- (एक लाख) पर्यत देणगी घेण्यात यावी. श्रीयुत प्रभाकर कुलकर्णी यानी तसा प्रयत्न कर ्या असे आश्वासन दिले चर्चेअंती सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला. वरील चर्चेमध्ये श्रीयुत राजेंद्र खेडलेकर, सौ. इनामदार, श्री विवेक देशपांडे श्री. सदानंद घोटीकर या सदस्यांनी भाग घेतला.

**ठराव “ ही सभा मयूर कॅटरर्स यांच्या बरोबर झालेल्या दोन्ही सभागृहांच्या व्यवस्थापन कराराची मुदत पुढील ३ वर्षाकरीता म्हणजेच १ मे २०१८ ते ३० एप्रिल २०२१ पर्यत सध्याच्या खालील दिलेल्या शर्तीनुसार वाढवून देत आहे**

प्रतिवर्षी रु. ३०,००,०००/- (तीस लाख) **+ GST** देय वस्तु व सेवाकर हा रु. १५,००००० **+ GST** १ मे रोजी व बाकी रु. १५,००००० **+ GST** १ नोव्हेंबर रोजी प्रतिवर्षी संस्थेला अदा करण्यात यावेत.

**मयूर कॅटरर्स बरोबर करारनाम्यावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार हि सभा कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी कोषाध्यक्ष श्री. प्रदीप कुलकर्णी व कार्यवाह श्री. प्रसाद ठकार याना देत आहे.**

**सूचक :- शरद पारसनीस** **अनुमोदक :- सुषमा इनामदार**

४. संस्थेचे उदिष्ट साध्य करण्यासाठी व उपक्रम राबविण्यासाठी सबंधीच्या चर्चेला सुरुवात करताना संस्थेचे कार्यवाह श्री. प्रसाद ठकार यांनी सांगितले की, संस्थेचे मुखपत्र दे.ऋ.ब्रा. समाचार याची छपाई बदलण्यात आली असून त्याचे नवे रुप सर्व सभासदांना भावले आहे. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया अनेक सभादांकडून आल्या आहेत. उपस्थित सदस्यांनी सुध्दा समाचारच्या नव्या रुपा बाबत समाधान व्यक्त केले व त्याबदल श्री. प्रसाद ठकार यांचे अभिनंदन केले. सदयाच्या समाचारच्या मांडणी सबंधी जर काही सूचना असतील तर त्याचा ही आम्ही विचार करु असे त्यांनी सभेला आश्वासन दिले.

सभेने श्रीयुत प्रसाद ठकार यांच्या समाचार सबंधी केलेल्या कामाची नोंद घेऊन त्यांचे अभिनंदन केले.

संस्थेचे खोली क्रं. १५ मध्ये असलेले निवासस्थानाची परिस्थितीती अतिश्य खराब असल्याने बाहेरगावाहून येणा-या सभासदांची व्यवस्था आपण योग्यरित्या करु शकत नाही या सबंधी अनेक सदस्यांनी नाराजीचा सुर वर्तवीला आहे. असे कार्यवाह श्री. राजेंद्र खेडलेकर यांनी सांगितले. की त्यांच्या मते हि खोली अद्यावत करण्यात यावी व शक्यतोवर दोन्ही रुम सेल्फ कन्टेन्ट असाव्यात. तसेच किमान व्यवस्था म्हणेजच बेड, गादया,उश्या, साफ सफाई पिण्याच्या पाण्याची व्यवस्था या सुविधा योग्य असाव्यात यावर बोलताना श्री. प्रभाकर कुलकर्णी म्हणाले की आपण तसा प्रयत्न निश्चित करावा जेणेकरुन बाहेरगावाहून येणा-या सभासदांची योग्य सोय होऊ शकेल. यावर अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी सुचविले कि हे काम करुन घेण्यासाठी श्रीयुत राजेंद्र खेडलेकर, श्री. सदानंद घोटीकर, व सौ. मुक्ता हुल्याळकर यांची समिती नेमण्यात यावी जी हे काम योग्यपणे करु शकेल या जागेची एकूण परिस्थिती पाहता किमान रु.१,५०,०००/- (एक लाख पन्नास हजार) पर्यंत खर्च येईल असे

श्रीयुत खेडलेकर व श्री. घोटीकर यांनी सभेस सांगितले. चर्चेअंती खालील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.
ठराव

**‘‘ ही सभा आगाशे कक्ष रुम नं.१५ च्या नूतनीकरणासाठी रु.१,५०,०००/- (एक १,५०,०००/- (एक लाख पन्नास हजार) पर्यंत लाख पन्नास हजार) पर्यंतच्या खर्चास मंजूरी देत आहे.**

**सूचकः- श्री. राजेंद्र खेडलेकर अनुमोदक डॉ. हरी महाशब्दे**

मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. प्रदीप कुलकर्णी यांनी सांगितले कि मागील अहवालात प्रसिध्द करण्यात आलेल्या ताळेबंदांत झालेल्या चुकांसबंधी दुरुस्तीपत्रक आम्ही करुन घेतले आहे. ते त्यानी सभेस सादर केले व या सबंधी भविष्यात योग्य ती दक्षता बाळगण्यात येईल असे सभेला आश्वासन दिले. सभेने त्याची नोंद घेतली.

श्री. प्रभाकर कुलकर्णी (कार्याध्यक्ष) यांनी सांगितले कि कार्यालयातील संगणक व सी.सी.टिव्ही कॅमेरे जुने झाले असून ते बदलण्याची आवश्यकता आहे. या सबंधी बोलताना बहुतेक सदस्यांनी सुचविले कि कार्यालयाशी निगडीत असलेला आवश्यक खर्च करण्यात यावा जेणेकरुन आपली कार्यक्षमता वाढेल सभेअंती खालील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

**‘‘ ही सभा कार्यालयातील कॉम्प्युटर, सी.सी.टिव्ही,कॅमेरा हे बसविण्यासाठी रु. १,००,०००/- (एक लाख) पयंत खर्चास मंजूरी देत आहे’’**

**सूचक :- सौ. आश्विनी नारविलकर अनुमोदक :- विलास कुलकर्णी**

**बॅक महाराष्ट्र मध्ये असलेल्या मुदत ठेवी मुदत संमप्ती नंतर १ वर्षासाठी परत गुंतविण्यात याव्यात याचे सर्व अधिकार कार्याध्यक्ष, कार्यवाह, व कोषाध्यक्ष, सहकोषाध्यक्ष यांना देण्यात येत आहेत.**

**सूचक :- प्रभाकर संत अनुमोदक :- विलास कुलकर्णी**

५. श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी उदयोजकांची परिषद घ्यावी असे सुचविले यावर सदस्यांनी हा विषय पुढच्या सभेत ठरविण्यात यावा असे सुचविले.

६. श्रीयुत प्रभाकर कुलकर्णी यांनी सुचविले कि जानेवारी २०१९ मध्ये संस्थेचे अधिवेशन बेळगाव येथे घेण्यात यावे. व तशा प्रकारचा प्रस्ताव कोषाध्यक्ष श्री. प्रदीप कुलकर्णी यांनी पाठविला आहे. चर्चेअंती असे ठरविण्यात आले कि या सबंधीची चर्चा कार्यकारी मंडळ व परिषद यांच्या संयुक्त सभेत करुन या सबंधी निर्णय घेण्यात यावा.

७. कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस सांगितले कि आज जरी ४ कार्यवाह असले तरी फक्त १ कार्यवाह मुंर्बचा आहे. कार्यवाहांनी करावयाच्या कामासबंधी व जबाबदा-या सबंधी योग्य ते घोरण ठरविण्यात यावे. अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी सुचविले कि कार्याध्यक्ष व इतर पदाधिका-यांनी चर्चा करुन या सबंधी निर्णय घ्यावा.
चर्चे दरम्यान ठरविण्यात आले कि श्रीयुत प्रसाद ठकार कार्यवाह समाचार मासिका सबंधीच्या प्रकाशनाचे व लेख संक्लनाचे सर्व काम पाहतील तसेच श्रीयुत कार्यवाह श्री. खेडलेकर हे वेबसाईट सबंधीच्या कामाची जबाबदारी पाहतील.

श्रीयुत प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस विनंती केली कि दादरस्थित माजी कार्यवाह श्रीयुत शरद पारसनीस यांची मदत कार्यालयीन कामाकरीता घेण्यास मंजूरी द्यावी. जेणेकरुन कार्यालयीन काम सुकर होईल. या चर्चेत डॉ. महाशब्दे व श्री. विवेक देशपांडे यांनी भाग घेताना कार्याध्यक्षांच्या सूचनेला पाठींबा दिला.

८. सभेने नवीन आलेल्या १२९ सभासद अर्जाना सर्वानुमते मंजूरी दिली.

९. आयत्या वेळच्या चर्चेदरम्यान श्रीयुत प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस सांगितले कि संस्थेचे गेली ४० वर्ष असलेले सनदी लेखापाल श्रीयुत माऊसकर यांचे अकस्मात निधन झाले आहे त्यामुळे संस्थेला नवीन सनदीलेखापाल नेमण्याची आवश्यकता आहे. सहकोषाध्यक्ष श्री. मांडके यांनी सुचविले कि सी.ए. श्री. संदिप वाघ, दादर यांच्याकडून नेमणूकी सबंधी अर्ज आला आहे.श्रीयुत वाघ हे न्यासाच्या लेखा परिक्षणा सबंधीचे तज्ञ असून त्यांना प्राप्तीकर क्षेत्रामध्ये । अनुभव दांडगा आहे. शिवाय ते दादरस्थित आहेत. त्यांची नेमणूक सनदी लेखापाल म्हणून आर्थिक वर्ष १८ – १९ साठी करण्यात यावी. चर्चेअंती खालील ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव :- हि सभा श्रीयुत सी.ए. संदिप वाघ यांची आर्थिक वर्ष १८ – १९ साठी संस्थेचे सनदी लेखापाल म्हणून नेमणूक करत आहे. व त्यांचे मानधन वार्षिक रु.१५०००/- पंधरा हजार अधिक योग्य ते कर ही असेल**

**सूचक :- श्री. विवेक देशपांडे** **अनुमोदक :- श्री. विनोद मांडके**

कार्यवाह श्रीयुत प्रसाद ठकार यांनी सुचविले कि समाचार प्रसिध्दीचा वाढीव खर्चाचा विचार करुन समाचार मध्ये जास्ती जास्त जाहिराती व आर्थिक मदत मिळविण्याचा प्रयत्न सभासदांनी करावा. संलग्न संस्थांच्या कार्यक्रमाला त्या त्या विभागातील कार्यवाहांनी व संघटन सचिवानी उपसिीत राहावे जेणे करुन संलग्न संस्था बरोबरचे सबंध दुढ होतील.

डॉ. महाशब्दे यानी प्रत्येक सदस्यांना रु.५०००/- पर्यंत जाहिराती आणाव्यात अशी सूचना केली.

कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस सांगितले की धर्मादाय आयुक्तांकडे प्रलंबित असलेला चेंज रिपोर्ट मंजूर करण्यासाठी वकीलाची नेमणूक करण्यात यावी व त्यासाठी येणा-या खर्चास मंजूरी देण्यात यावी.

चर्चेअंती खालील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**ठराव ‘‘ ही सभा ॲड. अमोल थोरात यांची धर्मादाय आयुक्तांकडे प्रलंबित असलेल्या चेंज रिपोर्ट व इतर न्यायलयीन कामे बधण्यासाठी वकील म्हणून नेमणूक करीत आहे. व त्यासाठी येणा-या रू. १,००,०००/- एक लाख पयंतच्या खर्चास मंजूरी देत आहे.**

**सूचक :- श्री. प्रभाकर संत** **अनुमोदक :- श्री. सदानंद घोटीकर**

अध्यक्षांनी सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानले व सभा संपल्याचे जाहिर केले.

अध्यक्ष		कार्याध्यक्ष		कार्यवाह

४. मंडळाने स्मॉल केस कोर्टात भाडेकरुंच्या विरुध्दात दावा केलेल्या केस मध्ये मंडळाचे माजी अध्यक्ष ॲड. माधव अनगळ हे उत्तमप्रकारे क्रॉस केस देत आहे. तसेच प्रत्येक केस मधील Evidence अतिशय चांगल्या प्रकारे सादर करीत आहेत.

५. भाडेकरुंच्या विरुध्द दावा दाखल करण्यासाठी ॲड आनंद नायक यांनी कोर्टकचेरीचे कागदपत्र पाठविले आहे त्याची पूर्तता करण्यासाठी कार्यकारी मंडळातील दोन सदस्यांची नावे सभेच्या सहमतीने द्यावी असे सांगितले. त्याप्रमाणे कार्यकारी मंडळाने ठराव केला तो पुढील प्रमाणे

ठराव

कार्यकारी मंडळाच्या सभेत भाडेकरुंच्या विरुध्द कोर्ट केससाठी सभेत चर्चा होऊन मंडळाचे सदस्य श्री. विवके कृष्णा देशपांडे व श्री. दीपक गोपाल कुलकर्णी हया दोन नावाला सभेने एकमताने मंजूरी दिली ठराव सर्वानुमते मंजूर

सूचक :- श्री. प्रभाकर संत अनुमोदक :. श्री. सदानंद घोटीकर

६. नवीन कार्यकारी मंडळ आले असता संस्थेचे मुखपत्र असलेले समाचार मासिकाचे रुप बदलेले आहे. त्यासाठी १२ ते १५ हजार जास्त खर्च झाला आहे.

७. प्रत्येक पदाधिका-यांनी आपल्या जिल्हयातील सभासदांची संख्या चांगल्याप्रमाणे वाढविली आहे त्या सर्व पदाघिकारी वर्गाचे अभिनंदन

८. समाचार मध्ये काही माहिती हवी असल्यास किंवा समाचार बाबत काही सांगायचे असल्यास आम्ही त्यावर आम्ही कार्यवाही करु.

विषय क्रमांक :-३ सभागृह व्यवस्थापनाच्या नूतनीकरण करण्याबाबत चर्चा व निर्णय

मंडळाचे गेस्ट हाऊस आज पर्यंत झालेले नाही. आपल्याकडे येणारा सभासद ३०० ते ५०० रुपये देण्यास का कू करतो ते फायुव्हस्टार घेणार नाही. परंतु त्याची दुरुस्ती करुनत्यांचे चांगले स्वरुप करण्यात यावे त्यासाठी श्री. घोटीकरव इतर सभासदांनी एकत्र येऊन काम करावे.

श्री. महाशब्दे अकोला यांनी सभेस सांगितले की बाहेरील येणा-या महिलांसाठी सोयीस्कार अशा जागा मंडळाने सोयीस्कार करावे म्हणजे सभेस येणा-या महिलांसाठी व्यवस्था चांगली झाल्यास येणा-या सभासदांचे प्रमाण वाढेल असे सांगितले.

श्री. प्रभाकर कुलकर्णी कार्याध्यक्ष यांनी सांगितले की मंडळाची रुम नं १५ अद्यावत करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत त्या खोलीत संडास, बाथरुम करुन घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. म्हणजे बाहेरगावाहून जे लोक आपल्याकडे येतात त्यांना आपण योग्य त्या सुविधा देऊ शकू असे श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी य विषयावर आपले मत मांडले. तसेच १५ च्या दुरुस्ती साठी जी कमिटी तयार होईल त्यामध्ये मंडळाचे कार्यवाह श्री. राजेंद्र खेडलेकर श्री. घोटीकर सौ. मुक्ता हुल्याकर यांची नावे मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी सभेस सुचविली व ती बहुमताने मंजूर झाली. श्री. घोटीकर यांनी रुम नं. १५ च्या मागच्या वेळी विचार केला होता रुम नं.१५ खराब आहे आहे. ती रुम दुरुस्ती करुन घ्यावी चादरी उशी व इतर ज्या काही गोष्टी आहेत त्या चांगल्या करुन घ्याव्यात व ती रुम सभासदास राहण्या योग्य करावी असे श्री. घोटीकर यांनी सांगितले

श्री. राजेंद्र खेडलेकर कार्यवाह नाशिक यांनी सभेस सोगितले की ती रुम तातडीने दुरुस्ती करुन घ्यावी व त्यासाठी सभेने मंजूरी द्यावी.

मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी सभेस विचारणा केली आगाशे कक्ष म्हणजे रुम नं.१५ बाबत आणखी कोणाला काय सांगायचे आहे का.

रुम नं. १५ साठी १ ते २ लाख रुपये खर्च येणार नाही लिकेज काढणे.इमारत जुनी आहे दुरुस्ती करुन घ्यावी हया विषयात कोणाला सहभागी करुन घ्यावयाचे आहेत. तर श्री. हुल्याळकर श्री. घोटीकर खेडलेकर, यांनी लक्ष द्यावे असे श्री. विलास जोशी यांनी सभेस आपले मत व्यक्त केले.या दुरुस्तीसाठी १ ते १.५० खर्चास ही सभा मंजूरी देत आहे..

सभेने एकमताने खर्चास मंजूरी दिली.

सूचक :- श्री. प्रसाद ठकार                    अनूमोदक :- श्री. हरी महाशब्दे

व्यवस्थापनाच्या नूतनीकरणास मंजूरी देण्याबाबत मंडळाचे कार्याध्यक्ष यांनी सांगितले की श्री.मयूर कॅटरर्स गेले ३ वर्ष आपल्या सभागृहाचे व्यवस्थापन करत आहे. त्यांनी मंडळास व्यवस्थापन वाढवून द्यावे असे पत्र दिले आहे. १ मे रु. १५००००० पंघरा लाख दिले होते परंतु जी.एस.टी आम्ही भरणार नाही. असे सांगितले आपल्या सभागुहामधून माझा तेव्ढा व्यवसाय होत नाही. मयूर कॅटरर्स यांनी आज पयंत कधीही पैशाची अडवणूक केलेली नाही ते नेहमी ठरलेली वेळ १ नोव्हेंबर ते १ मे सर्व धनादेश देऊन जातात. नवीन करारानुसार आता ते रु.३०,००,०००/- व G.S.T. ५,४०,०००/- असे सर्व मिळून पस्तीस लाख चाळीस हजार देण्यास तयार आहे. तसेच दुसऱ्या कॅटरर्सकडून सुध्दा रु.३२००००००/- बत्तीस लाखाचा प्रस्ताव आला आहे. परंतु नवीन कॅटरर्सने पैसे वेळेत दिले नाही किंवा हॉल चालत नाही म्हणून मध्येच सोडला तर मंडळाचे फार मोठे नुकसान होइल. हया सर्व गोष्टीचा विचार करुन वरील ठराव आपल्या समोर ठेवत आहे.

मंडळाच्या वार्षिक सभा व कार्यकारी मंडळ सभेसाठी मयूर कॅटरर्स आपली सेवा देतात त्यामुळे मंडळाचा बराच खर्च वाचतो.

मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी मयूर कॅटरर्स कडून येणाऱ्या रु.३००००००/- तीस लाखा संबधी चर्चाकरताना काही मुद्दे मांडले ते पुढील प्रमाणे १. सभागृहाचे भाडे आपल्याला मिळते २. सभागृह व्यवस्थापनाचे रु.३०,००,०००/- तीस लाखा G.S.T. मयूर कॅटरर्स भरतो.३. मंडळाच्या होणा-या वार्षिक सभा व कार्यकारी मंडळ सभा व कार्यालयात येणा-या सभासदांसाठी चहापान सुध्दा मयूर कॅटरर्स करतात

मयूर कॅटरर्स आपले घर स्नेह धरुन काम करतात त्यासाठी त्यांचे संबंध बघून मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी आपल्यासमोर प्रस्ताव मांडला तो आपण सर्वांनी मंजूर करावा असे श्री. विलास जोशी यांनी सभेस उत्तर दिले.

दादर विभागातील बरेच सभागृह छोटे असल्यामुळे खाली असतात. मयूर कॅटरर्स आपल्या इतर सभागृहाच्या माध्यमातून सभागृह बुक करत असतो असे श्री. प्रभाकर कुलकर्णी कार्याध्यक्ष यांनी सभेस आपले विचार व्यक्त केले.

मंडळाच्या सर्व सदस्यांच्या सल्यांनी हा ठराव करत आहे ठराव सर्वानुमते मंजूर करावा असे श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी कार्यकारी मंडळास आपले मत व्यक्त केले. त्यावर सौ. इनामदार यांनी सांगितले की जरुर त्याला द्या. परंतु आपण दुसरे टेंडर मागविले आहे का. त्यावर मंडळाचे कार्यवाह श्री. प्रसाद ठकार यांनी दुसरे टेंडर मागविले आहे असे आपले मत व्यक्त केले.

श्री. विवके देशपांडे मंडळाचे सदस्य यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की जर संस्थेचा चांगला विकास करण्यासाठी सभागृह ७० ते ८० वेळा जात असेल तर त्यामुळे संस्थेचे आर्थिक उत्पन्न वाढेल त्यामुळे संस्थेचा फायदा होईल.

श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी त्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की सभागृह बुक झाले किंवा नाही तरी सुध्दा आपण त्यांच्याशी केलेल्या करारानुसार ते आपल्याला रु.३००००००/- तीस लाख देतात. त्यामुळे संस्थेचे कोणतेही नुकसान होत नाही.

श्री. शरद पारसनीस यांनी सांगितले की आपला विद्यमान कॅटरर्स मंडळास चांगल्या सुविधा व मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमास सहकार्य करत असतो. तसेच नवीन आलेला कॅटरर्स आपणस तेवढे पैसे देणार नाही. तसेच मयूर कॅटरर्स यांनी मंडळास पैसे देताना कोणताही अडथळा आणला नाही तर पैसे वेळेत दिलेले आहेत.

श्री. विलास जोशी अध्यक्ष यांनी सांगितले की मयूर कॅटरर्स यांनी महानगर पालिकेच्या परवांग्या काढून घ्याव्यात कारण सभागुहात व स्वयपाक घरात काही दुघर्टना घडल्यास त्याबात पहिले विचारले जाते व त्याची जबाबदारी कॅटरर्सवर राहाते. व्यवहार १० ते ५१ टक्के करावे मुंबई मध्ये मयूर कॅटरर्स नाव प्रसिध्द आहे. आपण घेतलेल्या निर्णयास मान्यता आहे.

श्री. विलास जोशी अध्यक्ष पूर्वीचे सभागृह खूफ खराब झाले होते. परंतु जुन्या विश्वस्त मंडळाने सभागृहाची दुरुस्ती करुन घेतल्यामुळे हे सर्व वैभव आपल्याला आज पाहाता येत आहे. त्यामुळे सभागृह जास्त प्रमाणात जाऊ लागले व आर्थिक उत्पन्न वाढले गेले तसेच BMC परवांग्या योग्य त्या आणाव्यात.

मयूर कॅटरर्स पूर्वीच्या कामाचे GST देत नाही असे असले तरी कार्यकारी मंडळाने प्रयत्न करुन त्याने रु.१०००००/- एक लाख रुपये देण्याचे मान्य केले.

व्यवस्थापन करार ३ वर्षासाठी मंजूर करण्यात आला. १ वर्षानंतर त्यांनी जास्त देणगी द्यावी असे कळवावे.

ही सभा वरील ठराव सर्वानुमते मंजूरी देत आहे.

सूचक श्री. शरद पारसनीस अनुमोदक :- श्री. सदानंद घोटीकर

कार्यकारी मंडळाने मयूर कॅटरर्स खालील शर्ती पूर्ण करण्यास सांगितल्या

१. ३ वर्षाचा व्यवसथापनाचा करार करण्यात आला

२. GST प्रचालित करारानुसार करावे

मंडळाचे सदस्य श्री. विवके देशपांडे यांनी मंडळास मिळणारे रु.३०,००,०००/- (तीस लाख) रक्कम कमीप्रमाणत दाखवून बाकीची देणगी दाखवावी म्हणजे मंडळास कर कमी लागेल का. असे सभेस विचारले,

मंडळाचे सहकोषाध्यक्ष श्री. विनोद मांडके यांनी सांगितले कि कंत्राटदारकडून आपण G.S.T घेतो व तो आपण सरकारला भरतो. आपणाकडे जेवढा जी.एस.टी येतो तेवढाच आपण दाखवतो जसे आहे तसेच आपण दाखवावे.

मंडळाचे कार्यवाह श्री. खेडलेकर यांनी सुध्दा माहिती दिली की नाशिक संस्थेने सुध्दा कंत्राटदाराचा करार केला होता परंतु तो रद्द करावा लागला तेव्हा मंडळाकडे जो जी.एस.टी येईल तेवढाच भरावा.

मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकणर्री यांनी सांगितले की देणगी म्हणून ऐवढी मोठी रक्कम देणार नाही असे सांगितले.

श्रीमती ईनामदार यांनी चर्चेत भग घेताना विचारले की घटनेप्रमाणे ३ टेंडर मागवावी लागतात. त्यावर मंडळाचे कार्यवाह श्री. प्रसाद ठकार यांनी सांगितले की घटनेप्रमाणे आम्ही टेंडर मांगविली आहेत. सर्व बाजूंची कार्यवाही व्हाऊन कंत्राटदाराचा करारनामा सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सूचक श्रीमती सुषमा इनामदार अनुमोदक श्री. उपाध्ये

श्री. प्रदीप कुलकर्णी मंडळाचे कोषाध्यक्ष यांनी मागील Balancesheet मध्ये प्रिंटींग चूका होत्या त्या बरोबर करुन घेतल्या त्या दुरुस्त्या करुन नवीन Balancesheet केली तसेच बजेट व आर्थिक ताळेबंद सभेत विवेचन केले व सभेने त्यास सर्वानुमते मंजूरी दिली.

सूचक श्री. ह.श. महाशब्दे अनुमोदक श्री. शरद पारसनीस

कार्यालयातील कॉम्युटर व सी.सी.टी.व्ही कॅमेरा बसविण्याकरीता रु. १,००,०००/- एक्लाख ऐवढा खर्च येईल असे सभेस सांगितले कार्यकारी मंडळाने ज्या गोष्टी कामाशी निगडीत आहेत त्या प्रथम मंजूर कीाव्यात असे सोगितले सभेने सर्वानुमते खर्चास मंजूरी दिली.

बजेट व अर्थिक ताळेबंद सयुक्त सभा कार्यकारी मंडळ व कार्यकारी परिषद या दोन्ही सभेत मंजूर करण्यात आला तसेच खर्चास मान्यता मध्ये कॉम्युटर व सी.सी.टीव्ही कॅमेरा येणा-या खर्चास दोन्ही सभेने मंजूरी दिली

सूचक श्री. हेमकांत नारविलकर अनुमोदक श्री. विलास कुलकर्णी

श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी बेळगाव येथे घेण्यात येणाऱ्या अधिवेशनाची चर्चा केली असता कार्यकारी मंडळाने हा सयुक्त सभेत चर्चा करुन ठरवावा असे सांगितले.

कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेत आपले विचार व्यक्त करताना सांगितले कि मुंबईचा एक कार्यवाह असावा. श्री. प्रसाद ठकार हे ठाण्यात राहतात तसेच ते मंडळाच्या मुखपत्र असलेल्या समाचार अंकांचे काम व्यवस्थीतपणे करीत आहेत.

मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी आपले विचार मांडताना सभेस सांगितले कि मंडळाचे आता चार कार्यवाह आहेत त्यांनी एकत्र बसून चर्चा करुन काय काय कामे करु शकतात त्याची चर्चा करुन कामे ठरवावी बाहेरच्या सदस्यांनी काम करत नसतील तर मात्र मुंबईचा विचार करावा असे आपले मत व्यक्त केले.

मंडळाचे कार्यवाह यांनी सूचना केली कि आपण सर्व पदाधिारी व सदस्य यांनी एकमेकांशी सभाषण ठेवावे त्यामुळे कामाची माहिमती आपणस मिळेल व ज्याला जे काम करता येईल तो ते काम करेल असे आपले मत सभेस सांगितले.

श्री. विलास जोशी यांनी सभेस सांगितले कि कामाची विभागणी करावी जेणेकरुन कामे होतील असे त्यांनी सांगितले.

संस्थेच्या वेब साईटचे कामाची जबाबदारी मंडळ सदस्य यांच्यावर देण्यात यावी असे श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी कार्यकारी मंडळास सांगितले. श्री. खेडलेकर हे संस्थेच्या बेबसाईटचे काम पाहतील असे श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस सांगितले सभेने त्यास मान्यता दिली.

मंडळ सदस्य श्री. विवके देशपांडे यांनी कामाच्या वाढत्या व्यापाबदल बोलताना सांगितले कि श्री. प्रभाकर कुलकर्णी व श्री. माने यांची कामाच्या बाबतीत खूपच अडचणी येतात आपण त्यांना मदत करावी तसेच श्री. शरद पारसनीस यांना मंडळाच्या कामाचा अनेक वर्षाचा अनुभव आहे. असे आपले मत सभेस व्यक्त केले. त्यावर मंडळ सदस्य श्री. महाशब्दे यांनी कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांना सांगितले कि आपणास उपयुक्त ठरणार असतील तर श्री. शरद पारसनीस यांना मुंबईतून कार्यवाह करावे तसेच जे कार्यवाह आहेत त्यांनी त्या त्या विभागात मध्यवर्ती मंडळाचे कार्य व सभासद नोंदणी वाढवावी जेणेकरुन मध्यवर्ती मंडळाच्या कामाची प्रसिध्दी सभासदांना मिळेल. यास कार्यकारी मंडळाने सर्वानुमते मंजूरी दिली.

सूचक श्री. ह.श.महाशब्दे अनुमोदक श्री. विवके देशपांडे

आलेल्या नवीन सभासदत्व अर्जांना मंजूरी देण्याबाबत :-

आलेल्या नवीन सभासद अर्जांना कार्यकारी मंडळाने सर्वानुमते मंजूरी देण्यात आली तसेच मंडळाने आलेल्या नवीन सभासदांचे अभिनंदन केले.

मंडळाच्या ऑडीट करण्याबाबत :-

श्री. प्रभाकर कुलकर्णी कार्याध्यक्ष यांनी ऑडीट बदल आपले विचार व्यक्त करताना असे सांगितले कि मंडळाचे ऑडीटर श्री. माऊस्कर यांचे अक्स्मात निधन झाले. त्यामुळे मंडळासमोर प्रश्न नवीन ऑडीटर नेमावा असा आला आहे. यासाठी मंडळाचे सहकोषाध्यक्ष श्री विनोद मांडके यांनी श्री. संदिप वाघ ऑडीटर यांच्याशी याबदल चर्चा केली आहे. कार्यकारी मंडळाने श्री. संदिप वाघ यांची नेमणूक करावी यासाठी सयुक्त परिषदेत चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी ऑडीटर बाबत आपले मत व्यक्त करताना त्यांनी सांगितले कि श्री. संदिप वाघ यांना विनंती अर्ज देऊन त्यांच्या समंती अर्ज घेण्यात यावा असे मत मांडले कार्यकारी मंडळाने वरील विषयास मंजूरी दिली

सूचक श्री. विनोद मांडके                    अनूमोदक श्री. विवके देशपांडे

भाडेकरु केस बाबत :-

भाडेकरु केस मध्ये ३२ विश्वस्त आहे परंतु एवढया सदस्यांच्या सहया घेणे अवघड आहे त्यासाठी मंडळाचे वकील ॲड नायक यांनी एक Resoulation पाठविले आहे. त्यामध्ये मुंबईतील ५ ते ६ सदस्यांची नावे देण्यात यावी असे सांगितले आहे..

मंडळ सदस्य श्री. विनोद देशमुख नांदेड यांनी सांगितले कि कोर्ट कचेरीचा अनुभव आहे असे सदस्य घेण्यात यावे. त्यास कार्यकारी मंडळाने पुढील नावांसाठी मंजूरी दिली  पुढील नावे ॲड. माधव अनगळ श्री. विवके देशपांडे श्री. प्रसाद ठकार  श्री. दिपक कुलकर्णी

श्री. विवके देशपांडे यांनी सभेस सांगितले कि मला कोर्टाच्या कामात मला जास्त माहिती नाही त्यामुळे मी काम करु शकत नाही

मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी आपले विचार सभेपुढे मांडतांना सांगितले कि श्री. अनगळ यांनी ज्या प्रमाणे कोर्टाच्या मॅटर मध्ये ॲड अनगळ यांनी जे केले आहे. म्हणून ज्या व्यक्तीना सदस्यांना कोर्टाच्या कामाचा अभ्यास व अनभव असेल अशा व्यक्ती नेमाव्यात म्हणजे आपणास कोणतेच अडथळे येणार नाहीत. असे त्यांनी सभेसमोर मत व्यक्त केले. तसेच त्यांनी सांगितले कि ॲड. अनगळ व माने यांच्यावर कोर्ट केसेसचा खूप ताण आहे. त्यासाठी त्यांना एक आसिस्टंट देण्यात यावा. श्री. माने त्यांचा Evidance देतील तसेच संस्थेचा विश्वस्त महत्वाचा भाग आहे त्यासाठी २ व्यक्ती नेमाव्यात. त्याप्रमाणे सभेस पुढील नावे देण्यात आली ती अशी श्री. विवेक देशपांडे, प्रसाद ठकार, श्री. दिपक कुलकर्णी अशी नावे सभेने दिली व ती कार्यकारी मंडळाने एकमताने मंजूर केली.

मंडळ सदस्य श्री. विवेक देशपांडे यांनी सांगितले कि मंडळाची आवश्यक असेल त्यावेळी मी  कोर्टात जाईन

मध्यवर्ती मंडळाचा विकास व प्रचार होण्यासाठी आपण सर्वांनी एकमेंकांशी संर्पक ठेवावा त्यामुळे आपला जनसंर्पक वाढेल व कामाला गती मिळेल.

आयत्या वेळचे विषय :-

१. मंडळाचे मुख पत्र असलेले समाचार मासिक याचे उत्पन्न वाढविणे. त्यासाठी जाहिरातीचे दर छापणे प्रत्येकांने आपल्या विभागातून एखादी जाहिरात समाचार अंकासाठी देण्याचा प्रयत्न करावा.

२. नवीन जाहिराती समाचार अंकात मिळवाव्यात.

३. उद्योगजकांची सूची तयार करावी त्यासाठी त्यांचे फोन इमेल जमविणे तसेच संलग्न संस्थांच्या कार्यक्रमाला पाहुणे मिळतील असा प्रयत्न करावा. प्रत्येक उदयोगजकांची यशोगाथा समाचार मासिकात प्रसिध्द करावी

४. ॲड अनगळ व श्री. नरहरी कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला आहे. श्री. विलास जोशी यांनी सांगितले .

५. मंडळाशी संलग्न असलेल्या संस्थांच्या कार्यक्रमाला मध्यवर्ती मंडळाच्या कार्यकारी मंडळातील सदस्य पदाधिकारी उपस्थित राहावे म्हणजे त्या संस्थेला एक जोम येतो व कार्य वाढले जाते.

६. भाडेकरूंचया बिल्डींगमध्ये मध्यवर्ती मंडळाच्या नावाचा बोर्ड लावावा असे श्री. प्रसाद ठकार कार्यवाह यांनी आपले मत मांडले.

७. मंडळाच्या धर्मादाय आयुक्ता मधील चेंज रिपोर्ट मंजूर करण्यासाठी वकीलाची नेमणूक करावी असे श्री. प्रभाकर कुलकर्णी कार्याध्यक्ष यांनी मांडले असतस सभेने ते मंजूर केले व ॲड अतुल थोरात यांची धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयात चेंज रिपोर्ट सादर केला आहे त्यावर वकील म्हणून त्यांची सभेने नियुक्ती केली सभेने एकमताने वरील ठराव मंजूर केला.

८. मंडळाच्या आवारात सुरक्षारक्षक नेमावा असे श्री. विवेक देशपांडे यांनी आपले विचार व्यक्त केले.

९. मंडळाचे सदस्य श्री. ह.र. महाशब्दे यांनी सर्व कार्यकारी मंडळास विनंती केली कि आपण प्रत्येकाने रु. ५०००.०० समाचार जाहिरातीसाठी द्यावे जेणे करुन समाचार मासिकाचे उत्पन्न वाढेल.

सभेचे सर्व विषय संपले म्हणून अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या कार्यकारी मंडळ व कार्यकारी परिषद सभा रविवार दिनांक ११.११.२०१८ रोजी सकाळी १२.५५ मध्यवर्ती मंडळाच्या सभागृहात मा श्री.विलास विनायक जोशी (अध्यक्ष) मा. श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली सभेस कार्यकारी मंडळ व कार्यकारी परिषदेमधील सर्व सदस्य उपस्थित होते.

कार्यकारी परिषदेची सभा कार्यकारी परिष्देचे कार्यवाह यांनी बोलवायची असते परंतु कार्यवाह येऊ शक्ले नाही म्हणून ही सभा कार्यकार मंडळ व कार्यकारी परिषद यांची सयुक्त सभा घ्यावी व मंडळाच्या कामाचा आढावा सांगावा असे ठरले त्यानुसार हि सभा बोलविली असे मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले.

सभेस उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत मंडळाचे कार्यवाह श्री. प्रसाद ठकार यांनी केले

मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी सांगितले कि आजच्या सभेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. माधव अनगळ यांची उपस्थिती आपण सर्वांना लाभली आहे.

कार्यकारी मंडळाची सभा आताच संपली त्या सभेचा घोषवारा या ठिकाणी कार्यवाह श्री. प्रसाद ठकार आपणास सांगतिल असे श्री. विलास जोशी यांनी सभेस सांगितले

कार्यकारी परिषदेच्या सभेत आर्थिक विषय व बजेट याचा विचार या ठिकाणी मांडला जाईल तसेच कार्यकारी मंडळ व कार्यकारी परिषद यावर लक्ष ठेवावे. कार्यकारी परिषदे मध्ये ४० सभासद आहेत परंतु बरेच सभासद उपस्थित नाहीत.

कार्यकारी मंडळाची सभा कोल्हापूर येथे झाली होती त्याची माहिती व तेथील निर्णय आपणास कळावे.

कार्यकारी परिषदे मधील सर्व सभासद अनुभवी आहेत व ते आप आपल्या संस्थेत काम करतात त्यामुळे त्यांचे मार्गदर्शन मोलाचे आहे.

१. कार्यकारी मंडळाच्या सभेत मध्यवर्ती मंडळाच्या कार्यालयाची दुरुस्ती करणे व त्यासाठी येणा-या खर्चास मंजूरी देणे.

२. मंडळाच्या दोन सभागृहाच्या व्यवस्थापनाचा करार मंजूर करणे

दिनांक १२.८.२०१८ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करणे त्यासाठी सयुक्त सभेमध्ये इतिवृत्ताचे वाचन श्री. प्रसाद ठकार यांनी सभेस वाचून दाखविले त्यास सभेने सर्वानुमते मंजूरी दिली

सूचक :- श्री. लक्ष्मीकांत दाणी अनुमोदक श्री. अभय कुलकर्णी

श्री. प्रभाकर कुलकर्णी कार्याध्यक्ष यांनी सयुक्त सभेत सांगितले कि मंडळाच्या कामाची माहिती आम्ही वेळोवेळी देत असतो आपण सर्वजण मंडळाच्या संपर्कात असणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण आपले मोबाईल नंबर ईमेल मंडळाकडे देण्यात यावे जेणेकरुन आपल्याशी संर्पक करता येईल.

संस्था वाढीसाठी व सभासद वाढीसाठी आपल्याकडून काही सूचना असल्यास सभेस सांगावे किंवा त्याबदल आपली माहिती द्यावी म्हणजे आपणास त्यावर विचार करुन बदल करता येतील.

मंळाच्या कामाची माहिती देताना श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सांगितले ती पुढील प्रमाणे.

१. धर्मादाय आयुक्त कार्यालयात नुकत्याच झालेल्या निवडणुकीचा चेंज रिपोर्ट देण्यात आला.

२. कार्यालयातील नूतनीकरण करण्यात आले

३. आलेल्या जादा खर्चास सभेची मंजूरी घेण्यात आली

४. मंडळाच्या सभागृहाचा व्यवस्थापनाचा करार मंजूर करण्यात आला

५. मंडळाचे मुख पत्र असलेले समाचार अंकाचे स्वरुप बदलण्या बाबत सूचना करण्यात आल्या

६. मंडळाकडे १२० नवीन सभासद झाले आहेत.

७. कराड शाखेचे श्री. राम आफळे यांनी ४९ सभासद केले आहेत

८. चेंज रिपोर्ट केस लढविण्यासाठी वकील नेमावा असे ठरले आहे.

९. आर्थिक विवेचन केले आहे. बजेट केले आहे.

मंडळाच्या कामात आपणास काम करण्याची इच्छा असल्यास तसे आपण सांगावे म्हणजे त्यावर विचार करता येईल असे श्री. विलास जोशी अध्यक्ष यांनी सभेस सांगितले.

मंडळाचे गेले अनेक वर्ष ऑडीटचे काम करणारे श्री. माऊसकर यांच्या अकस्मित निधनाने त्यांच्या जागी श्री. संदिप वाघ यांची सभेने नियुक्त केले.

श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी मंडळाच्या ऑडीटर अदल माहिती देताना सांगितले कि मंडळाचे ऑडीटर श्री. माऊसकर यांच्या अकस्मित निधनामुळे आपणस नवीन ऑडीटर नेमावा लागला त्यासाठी श्री. संदीप वाघ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाडेकरु कोर्टमध्ये नवीन कार्यकारीणील ३१ सभासदांची आवश्यकता लागेल का असे वाटत होते परंतु ॲड माधव अनगळ यांनी सांगितले कि १ क्विा २ सभासद उपस्थित राहीले तरी चालू शकते.

दोन्ही सभेचे इतिवृत्त वाचन करण्यात आले आहे कोणाला या बाबत सूचना किंवा उपसूचना करावयाच्या आहेत का असे विचारले

कोणत्याही सभासदाकडून सूचना न आल्यामुळे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले

सूचक श्री. श्रीकांत कानाडे अनूमोदक :- मकरंद सुखात्मे

कार्यकारी मंडळ कार्यकारी परिषद सयुक्त सभा होईल त्यावर सर्व विषय चर्चा होतील असे श्री. विलास जोशी अध्यक्ष यांनी सांगितले.

कार्यकारी परिषद सदस्य श्री. अरविंद हस्तेकर यांनी सांगितले कि ही फार मोठी जबाबदारी आहे कार्यकारी मंडळ व कार्यकारी परिषद सर्वांनी मिळून प्रयत्न करावा. सर्व संलग्न संस्थांचे एकजूट करणे. त्यासाठी संघटक समिती सादर करावी. संलग्न संस्थांचा संबंध कमी आहे. संलग्न संस्था याना येणा-या अडचणी काय आहेत त्या त्यांनी मध्यवर्ती मंडळास कळविल्यास त्यातून आपणास मार्ग काढता येईल

मध्यवर्ती मंडळाच्या पदाधिका-यांनी वर्षातून एकदा तरी संलग्न संस्थेस भेट देऊन त्यांच्या कार्याची त्यामध्ये येणा-या अउचणीची माहिती घ्यावी व आपले विचार विचार मध्यवर्ती मंडळाकडे प्रगट करावेत एक संघटन समिती नेमावी मध्यवर्तीची संकल्पना हि समिती सर्व संस्थाना कळवितील

श्री. हस्तेकर यांनी औरंगाबाद संस्थेबदल माहिती दिली औरंगाबाद संस्थेसाठी श्री. श्रीराम गोवरुकर त्यांनी जागा घेतली आहे परंतु त्या जागेवी स्टे आला आहे कोर्ट कचेरी चालू आहे. सध्या औरंगाबाद संस्था बंद आहे. मध्यवर्ती मंडळ नेहमीच सहकार्य देईल असे श्री. हस्तेकर यांनी औरंगाबाद संस्था पदाधिकारी यांना सांगितले.

संघटन समिती सर्व सलग्न संस्थांना मदत करेल.

गिरगाव शाखा हि संस्था मध्यवर्ती मंडळाशी काहीच संबध ठेवत नाही. संघटन समितीने गिरगाव शाखेशी संर्पक साधावा व चर्चा करावी चूक झाल्यास चूक कबूल करावी व पुढे जावे चूक नाही काही कारणाने ते झाले गैर सूज दूर करावा व संस्था व सभासद मध्यवर्ती मंडळाशी जोडून घ्यावेत.

वधू वर नाशिक व कोथरुड एकत्र येऊन एकच मुख्य सेंटर उभे करावे श्री. खेडलेकर व नरेंद्र कुलकर्णी यांना संर्पक करुन त्यांचा पाठिंबा मिळाला त्यानुसार दिवाळी अंकात १५० नावे प्रसिध्द झाली.

देशस्थ ऋग्वेदी अेक सूची तयार करावी यासाठी संघटन समितीने जबाबदारी घेऊन सूची तयार करावी असे ठरले.

श्री. प्रभाकर कुलकर्णी कार्याध्यक्ष यांनी सयुक्त सभेत सलग्न संस्थां बाबत मत व्यक्त करताना सांगितले कि आमचे संबंध सर्व शाखेशी चांगले आहेत. गिरगाव शाखेचे म्हणणे चुकीचे आहे. गिरगाव शाखेच्या पदाधिका-यांना मध्यवर्ती मंडळाच्या कामाची माहिती नसेल अलेक संस्था संलग्न होण्यास पत्रव्यवहार करीत आहेत. कराड संस्था स्थापन केली तसेच सांगली येथील संस्था सुध्दा सुरु करायची आहे असे श्री. कुलकर्णी यांनी सांगितले. आपल्या सर्व सलग्न संस्था कशा मोठया होतील याची जबाबदारी मध्यवर्ती मंडळ स्वीकारेल तसेच या सर्व कामसाठी एक समिती नेमावी त्यासाठी मध्यवर्ती मंडळ खर्च करेल. असे त्यांनी सभेस आपले मत व्यक्त केले.

मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी श्री. अरविंद हस्तेकर यांनी संलग्न संस्थेबदल ज्या गोष्टी सांगितल्या त्या अतिश्य चांगल्या आहेत. मी व श्री. प्रभाकर कुलकर्णी नाशिक, बडोदे अशा अनेक संस्थांच्या कार्यक्रमास उपस्थित होतो डॉ. महाशब्दे अकोले यांच्या संस्थेस आम्ही भेट दिली. मध्यवर्ती मंडळाने त्या संस्थेला समाजातल हुशार विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली. तसेच ज्या सलग्न संस्थांना संबंध जोडायचे आहे. त्यांच्याशी आम्ही संर्पक करीत आहोत. कराड शाखेशी सुध्दा आमचा संर्पक आहे आपण १५० सभासद करावे त्याप्रमाणे श्री. राम आफळे यांनी ५० सभासद अर्ज दिले आहेत हया सर्व कामाचा आढावा घेण्यासाठी समिती नेमणे गरजेचे आहे.

मध्यवर्ती मंडळाशी संलग्न होण्यासाठी वाडी येथून पत्र आले आहे वाडीचे पूजारी देशस्थ ऋग्वेदी आहेत व त्यांनी त्यांची संस्था सलग्न करण्यासाठी मंडळास पत्र दिले आहे. असे श्री. विलास जोशी यांनी सांगितले. तसेच गिरगाव शाखेला मध्यवर्ती मंडळाला बदल काही गैरसमज झाल्याअसल्यास संघटन समिती भेटेलच पण मी सुध्दा शाखेला भेट देईन संस्थेच्या कामात अडथळा आण-या सभासदांना ठेवता येणार नाही. तसेच संस्थेच्या हिता करीता काही कठोर निर्णय घ्यावे लागले तरी चालेल त्यासाठी कठोरच राहावे लागेल.

ॲड. माधव अनगळ यांनी सांगितले कि मागील वार्षिक सभेत असे सांगितले आहे कि संस्थेच्या हिताच्या आड कोणी येत असेल तर त्यांचे सभासदत्व रद्द करावे असे त्यानी आपले मत सभेस सांगितले.

विलास जोशी अध्यक्ष मध्यवर्ती मंडळ यांनी सांगितले कि ब्राह्मण संघटन वाढवावे असे त्यांनी सभेस उत्तर दिले.

संघटन समिती नेमण्यात आली त्यांची नावे पुढील प्रमाणे

१. श्री. अरविंद हस्तेकर २. श्री. विलास कुलकर्णी ३. श्री. प्रभाकर संत ४. श्री. प्रदीप कुलकर्णी श्री. हरीभाऊ जतकर ५. श्री. विनोद देशमुख ६. श्री. मकरंद सुखात्मे

समितीचा संर्पक प्रमुख म्हणून श्री. प्रभाकर कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली

कार्यकारी परिषद सदस्य श्री. लक्ष्मीकांत दाणी यांनी सयुक्त सभेत आपले विचार व्यक्त करताना सांगितले कि संस्थेच्या दृष्टीने विचार केला तर मंडळाचे सभासदत्व वाढविणे प्रत्येकाने ५० सभासद करावे त्यामुळे संस्था वाढेल उपक्रम वाढतील नवीन सभासद जोडले जातील. सर्व संलग्न संस्थांची विवाह मंडळे एकत्र करुन ऐ मुख्य सेंटर डभे करावे जेणेकरुन समाजाला विवाह मंडळाची समस्या होणार नाही प्रत्येकाशी त्या निमित्ताने संर्पक वाढेल तसेच संस्थेचे कामकाज सुघ्दा वाढेल संस्थेच्या कार्याची माहिती प्रत्येक सभासदास मिळेल.

मध्यवर्ती मंडळाची संलग्न शाखा गिरगाव काहीकारणाने दुरावली आहे त्या संस्थेच्या पदाधिकारी सदस्य यांच्यांशी बोलणीकरुन  त्यातून मार्ग काढावा येईल ते पहावे.

मध्यवर्ती मंडळाने सर्व संलग्न संस्थांनच्या कामाची माहिती व मध्यवर्ती मंडळाच्या कामाची माहिती सर्वाना मिळावी व मंडळाचा विकास मोठया प्रमाणत व्हावा यादुष्टीने मंडळाने एक समिती स्थापन केली आहे. त्या समितीने प्रत्येक जिल्हयातील संलग्न संस्थेच्या कार्यालयात जाऊन भेट देणे त्यांच्या कार्याची माहिती घेणे मध्यवर्ती मंडळाकडून त्यांची अपेक्षा व मध्यवर्ती मंडळास त्यांचे सहकार्य काय या संबंधात माहिती गोळा करणे

कार्यकारी मंडळ सदस्य श्री मकरंद सुखात्मे नाशिक यांनी आपले विचार सभेपुढे व्यक्त केले  कार्यकारी मंडळाने कार्यकारी परिषदेची पहिली सभा बोलविली आहे. सभेमध्ये कार्यकारी मंडळाच्या सभेचे एक एक मुद्दे घेऊन त्याचे स्पष्टीकरण परिषदेच्या सदस्यांस सांगणे. तसेच सभेचे नियोजन करताना विषय पत्रके वरील विषयानुसार विषय घेऊन नंतरच नवीन विषय मांडावा.कार्यकारी मंडळाच्या सभेत एखादया विषयावर निर्णय झाल्यास त्यावर कार्यकारी परिषद कसा निर्णय घेईल.

विवाह मंडळे अनेक संस्था चालवत आहेत त्या सर्व संस्था प्रमुखांची एक सभा मध्यवर्ती मंडळाने आयोजित करावी व त्यांना विवाह विषय आपली भूमिका काय आहे याचे मार्गदर्शन करावे. त्यामुळे विवाह विषयी काही तक्रार राहणार नाही सर्व संस्था एक छाताखाली काम करतील त्यामुळे मध्यवर्ती मंडळाचे सदस्य वाढतील तसेच प्रत्येक संस्थेचे सुध्दा सभासद संख्या वाढेल. हे सर्व करत असताना समाजाच्या तरुण वर्गाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही तर हया सर्वा कामात प्रत्येक संस्थेने आपल्याकडील तरुण वर्गास प्रोस्हीत करुन त्यांना मंडळाच्या कामात सहभागी करुन त्यांना जबाबदारी दिली पाहिजे त्यामुळे मोठयाप्रमाणात तरुण वर्ग पुढे येईल.

संलग्न संस्थेचे विषय काय आहेत व त्यावर काय करावे याचा पदाधिका-यांनी कार्यकारी मंडळात विचार करुन संपावावे व त्याची जाहिरातबाजी करु नये.

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ सर्व संलग्न संस्थांशी निगडीत असल्यामुळे हया संस्थेचा एक लोगो तयार करावा व तो सर्व संलग्न संस्थेकडे असावा मध्यवर्ती मंडळाशी ज्या संलग्न संस्था जोडल्या आहेत त्यांच्या लेटरहेड वरती मध्यवर्ती मंडळाचा लोगो असणे महत्वाचे आहे.

संलग्न संस्था व मध्यवर्ती मंडळ एकत्र येऊन जिल्हावाईज  चांगल्या प्रकारे कार्यक्रम करावेत जेणेकरुन प्रत्येक जिल्हा मध्यवर्ती मंडळाशी जोडला जाईल

बडोदे संस्थेचे अध्यक्ष श्री. एकबोटे यांनी बडोदे शाखेबद्दल माहिती देताना सांगितले कि आमच्या संस्थेचे ३०० ते ४०० सभासद आहेत. मध्यवर्ती मंडळाचे कार्य पाहून मी आपणास आमच्या संस्थेचे जास्ती जास्त सभासद मध्यवर्ती मंडळाचे सदस्य होतील असे त्यांनी सांगितले.

मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांनी बडोदा शाखेच्या कार्याची पाहाणी केली आहे या शाखेचे कार्य खूप मोठे आहे त्याबदल बडोदा शाखेचे त्यांनी मंडळातर्फे अभिनंदन केले.

दे.ऋब्रा.संघ ठाणे प्रतिवर्षी त्यांची दिनदर्शिका प्रसिध्द करते त्यामध्ये प्रत्येक संस्थेने सहभागी आपल्या संस्थेची प्रसिध्दी करु शकता त्यासाठी आपण आपल्या संस्थेची जाहिरात द्यावी असे श्री. विलास जोशी यांनी आपले मत व्यक्त केले.

श्री. विलास जोशी यांनी सांगितले कि या दिनदर्शिकेमध्ये उदयोजक व इतर माहिती प्रसिध्द होत असते तेव्हा प्रत्येक संघाने आपली जाहिरात हया मध्ये द्यावी.

कार्यकारी परिस्त्रद सदस्य श्री. शशिकांत चंद्रचूड सभासद वाढवावे त्यासाठी सभासद किती वाढवावे त्याची सभासछव फि किती त्यामध्ये प्रकार आहेत का असे विचारले

श्री. प्रभाकर कुलकर्णी कार्याध्यक्ष यांनी सभासदत्वा बदल माहिती देताना सांगितले कि पूर्वी अ व ब असे दोन प्रकार होते आता आपण सर्व सभासदांना अ वर्गात आणले आहेत व वर्गणी रु ६०० करण्यात आली आहे. हयामध्ये देणगीदार. हितचिंतक असे सुध्दा आपणास सभासद करता येतात.

मंडळाच्या यादीत बरेच सभासद हयात आहे किंवा नाही याचा तपशील घेण्यात यावा त्यासाठी प्रत्येक संलग्न संस्थेने आपल्याकडील मध्यवर्ती मंडळाच्या सभासदाची माहिती घेऊन मंडळास कळवावी म्हणजे मंडळाच्या यादीत त्याची नोंद घेतली जाईल.

श्री. विलास जोशी  दे.ऋब्रा. संघ नांदेड यांनी युवकांना एक व्यवसायीक उदयोजक मेळावा आयोजित करावा असे सांगितले.

श्री. प्रसाद ठकार कार्यवाह मध्यवर्ती मंडळ यांनी सन २०१९ मध्ये एक उदयोजक मेळावा आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला.

मंडळाचे कार्याध्यक्ष यांनी आलेल्या सभासदांना मंडळाने आज पर्यत अनेक विदयार्थांना मदत केली आहे आज ते विदयार्थी उदयोजक झाले आहेत अशा सभासदांची यशोगाथा मंडळाचे मुखपत्र असलेल्या समाचार अंकात प्रसिध्दी देण्यात येईल असे सांगितले श्री. प्रसाद ठकार यांनी असे लेख प्रत्येक महिन्यास मंडळ प्रसिध्द करेल असे सांगितले.

मंडळाची संलग्न संस्था असलेली नांदेड शाखा येथील विदयार्थी हुशार आहेत त्यांना एक रोजगार मेळावा उपल्बध करुन देण्यात यावा तसेच संस्थेने त्याची प्रसिध्दी समाचार अंकांत करावी तसेच हुशार मुलांसाठी किंवा मंडळ सदस्य मुलांसाठी संस्थेने सरकारमान्य उपक्रम राबावावे उदा MST किंवा टेक्नीकल कोर्स संस्थेने करता येतील का ते पहावे असे श्री. विलास जोशी अध्यक्ष यांनी आपले मत सभेस व्यक्त केले.

श्री. राम आफळे कराड यांनी कराड शाखे संबंधी माहिती दिली कराड शाखा १९८२ पासून मध्यवर्ती मंडळाशी सलग्न आहे कराड शाखेचे १९८५ – ८८ मध्ये ५५ सभासद होते. श्री. आफळे यांनी सांगितले कि दरम्यानच्या काळात कराड शाखेचे १५० सभासद आम्ही मध्यवर्ती मंडळात करणार आहे त्यावेळी आपणास कराड शाखेला भेट दयावी लागेल असे सांगितले. तसेच त्यांनी २७ फेब्रुवारी २०१९ रोजी कराड शाखेत दासनवमी कार्यक्रम मोठया प्रमाणत होणार आहे आपण सर्वजण या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे निमंत्रण त्यांनी सभेस दिले. कराड शहर व कराड ग्रामीण व त्यामधील उपगावे आम्ही शोधली आहेत तसेच जानेवारी नंतर कराड शाखा २०० सभासद मध्यवर्ती मंढळाचे करेल असे श्री. रामचंद्र आफळे यांनी सांगितले.

तसेच त्यांनी नरसोबाची वाडी या संस्थेबदल संस्थेला माहिती दिली नरसोबाची वाडी यांचे २००० दोन हजार सभासद आहे. संस्था रजिस्टर आहे हि संस्था मध्यवर्ती मंडळात सहमावून घेता येईल का वरील संस्थेचे १५० सभासद मध्यवर्ती मंडळाचे सभासद होतील असे आफळे यांनी आपले विचार सभेस सांगितले. श्री. आफळे यांना अनेक पुरस्कार लाभले आहेत.

श्री. रामचंद्र आफळे यांच्या कार्याचा आढावा पाहून मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सर्वांच्या वतीने जाहिर अभिनंदन केले.

श्री. एकबोटे बडोदेशाखा यांनी सभेस आलेल्या सर्व सदस्यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. गेली ५० वर्षापासून मी बडोदे शाखेशी मी निगडीत आहे बडोदा शाखेनी कितीतरी डॉक्टर विदयार्थ्यांचा सत्कार केला आहे. कोजागीरी पौर्णिमा कार्यक्रम एकपात्री कार्यक्रम व-हाड निघाल लंडनला असे अनेक कार्यक्रम संस्थेने राबविले आहे अशी माहिती सभेस दिली.

कार्यकारी परिषद सदस्य श्री. लक्ष्मीकांत दाणी यांनी बी.बी.एन गलोबल ब्राह्मण उदयोजक संस्था आम्ही ५ लोक एकत्र येऊन काम करीत आहे हा आमचा पहिला प्रयत्न आहे ५ उदयोजकांची असोशियशन आहे आपण सर्वजण या ठिकाणी सभासद होऊ शकता.मध्यवर्ती मंडळाच्या वतीने उदयोजकांसाठी प्रयत्न होतील असा आमचा प्रयत्न राहील.

श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी सभेस सांगितले कि मध्यववर्ती मंडळाचे हे रौप्य महोत्सवी वर्ष बेळगाव मध्ये अधिवेशन घेऊन साजरे करावे असे सभेस सांगितले सर्व सदस्यांनी या गोष्टीस पाठिंबा देऊन

रोप्य महोत्सवी वर्ष बेळगाव येथे साजरे करावे असे ठरले. अधिवेशन बेळगाव येथे होणार असेल तर त्याची सूचना दिनांक वेळ सर्व संलग्न संस्थांना कळवावे म्हणजे त्याचे आयोजन करता येईल.

कार्यवाह श्री. राजेंद्र खेडलेकर नाशिक यांनी सयुक्त सभे करीता कार्यकारी मंडळ पदाधिकारी उपस्थित राहिले या सभेने अनेक उपक्रम करण्याचे ठरले आहे ते आम्ही लवकरच लवकर पूर्ण करु पुढच्या सभेपर्यंत सर्व संलग्न संस्थांना पुढील उपक्रम पाठविण्याची व्यवस्था आम्ही करु.

संस्थेच्या Loggo उदघाटन सोहळा मंडळाचे माजी अध्यक्ष ॲड माधव अनगळ साहेब यांच्या हस्ते आपण करु

श्री. घळसासी पूणे यांनी वधू वर मेळावा घेण्यात येईल त्याची माहिती सर्व संलग्न संस्थांना पाठविण्यात यावी.

श्री. विलास जोशी अध्यक्ष मध्यवर्ती मंडळ यांनी सभेची सुरुवात खूप छाप झाली उत्तम चर्चा झाली सर्वांना चांगले मागदश

# !! श्रीराम जयराम जय जय राम !!

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ आणि देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ, डोंबिवली

**संयुक्तरित्या सादर करत आहे.**

**अध्यात्मिक वातावरणात रमण्याचा एक भक्तीभावाने भारलेला दिवस**

**रविवार,३फेब्रवारी २०१९**

## श्रीदासबोध लघुपारायण सोहळा

| वेळ | कार्यक्रम |
|---|---|
| ०८.०० ते ९.०० | अल्पोपहार आणि चहापान |
| ०९.०० ते ०९.१५ | उद्घाटन :- श्री. विलास जोशी (अध्यक्ष) |
| ०९.१५ ते ०९.३० | प्रात :स्मरण |

| | |
|---|---|
| ०९.३० ते १०.३० | मनाचे श्लोक पठण, श्री.दासबोध लघुपारायण ४ थे दशक |
| १०.३० ते ११.२५ | प्रकट चिंतनः वाचलेल्या चौथ्या दशकावर प्रत्येकी ५ मिनिटे चिंतन आढावा : श्रीमती उमा कळमकर |
| ११.२५ ते १२.४५ | प्रवचन दासबोध परिचय श्रीमती अलका मुतालिक |
| १२.४५ ते ०१.०० | ऋणनिर्देश : श्री. प्रभाकर कुलकर्णी (कार्याध्यक्ष) |
| ०१.०० ते ०१.१५ | आरती |
| ०१.०० ते ०२.१५ | महाप्रसाद |

कार्यक्रम सूत्रसंचलन : श्री. श्रीकांत कानडे

कार्यस्थळ :- लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०० ०१६

टिप :- दासबोध लधुपारायणात सहभागी होण्यास नोंदणी आवश्यक समर्थभक्तांनी अशाप्रकाराची नोंदणी दिनांक ०१-०२-२०१९ रोजी संध्याकाळी ७ वाजेपर्यंत करणे आवश्यक

नोंदणी / चौकशी : कार्यालयीन वेळेत : २४३० २२७३ २४३० ७५७३

## सर्व समर्थ रामदासस्वामी भक्तांस सस्नेह निमंत्रण

**!!** जय जय रघवीर समर्थ **!!**

आपला
श्री. प्रभाकर पां. कुलकर्णी
(कार्याध्यक्ष)

# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**संपादक**

**समाचार ,** **06/09/2018**

**<u>खालील वृत्त आपल्या समाचार मध्ये प्रसिद्ध करावे</u>**

**देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ कोथरूड कर्वेनगर परिसर पुणे**

**विषय: - देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघा च्या सन २०१८ ते २०२१ या कालावधीसाठी ५ आगस्त २०१८ रोजी झालेल्या कार्यकारी मंडलाच्या निवडणूकी मध्ये खालील सभासद बीनविरोध निवडणून आले आहेत .**

| | |
|---|---|
| Dr अरुण हुपरीकर | अध्यक्ष |
| दत्तात्रय देशपांडे | उपाध्यक्ष |
| श्रीराम कुलकर्णी | कार्याध्यक्ष |
| सतीश कुलकर्णी | सचिव |
| अजिंक्य केसकर | सहसचिव |
| सौ साधना ओढेकर | सहसचिव |
| श्रीराम बेडकिहाळ | कोषाध्यक्ष |
| Dr अरविंद कुलकर्णी | सदस्य |
| सौ स्वाती प्रभुणे | सदस्य |
| सौ अनुराधा देशपांडे | सदस्य |
| श्रीमती चारुशीला बेलसरे | सदस्य |
| अविनाश सलगरकर | सदस्य |
| प्रा नरहरी अपामार्जने | सदस्य |

**ह्या निवडणुकीसाठी श्री अरविंद देशपांडे व  श्री चंद्रकांत देशपांडे**

**यांनी निवडणूक अधिकारी  म्हणून  काम पहिले .**

**श्रीराम कुलकर्णी**

# रौप्य्य महोत्सव कडे  वाटचाल  सन २०२१

१२.०९.२०१८

प्रति,
मा.  मुकूंदराव  कुलकर्णी
नाशिक

महोदय,

माननीय मुकूंदराव

मी आपल्याशी बोलताना अशी इच्छा प्रकट केली होती की ज्या सभासदांनी वा त्यांच्या नातेवाईकांनी संस्थेने दिलेल्या शैक्षणिक शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन आपल्या क्षैत्रामध्ये वा नोकरीधंदद्यामध्ये विशेष कामगीरी केली अशा लाभार्थींची यशोगाथा आपल्या समाचार मासिकात प्रसिध्द केल्यास अनेक विद्यार्थ्यांना त्याच्यापासून स्फूर्ती घेता येईल व संस्था करत असलेल्या कार्याची त्यांना माहिती मिळेल.

या अनुषगांने मी आपल्याला केलेल्या आवाहनाला आपण योग्य तो प्रतिसाद देऊन त्याच्या सोबत रु.२१०००/- (अेक्वीस हजार फक्त) संस्थेच्या ''परदेशी शिक्षण घेऊ इच्छिणा-या विद्यार्थी शिष्यवृत्ती निधीला'' देणगी रुपात देवून संस्थेला उपकृत केले आहे त्याबद्दल मी व्यक्तीशः व मध्यवर्ती मंडळ मनापासून आभारी आहोत.

आपण भारतातले यशस्वी उद्योजक आहात, ज्यांनी स्वक्तृत्वावर व स्वबलावर **SM Auto Stamping Pvt Ltd,** या उद्योग समुहाची स्थापना करुन तो गेली २५ वर्षाच्यावर यशस्वीपणे चालवला असून ज्याची वार्षिक उलाढाल रु. १५० कोटीच्या वर नेली आहे. व भविष्यात आपण तो एक सहस्त्र कोटीच्यावरती घेऊन जाल हा आमचा सार्थ विश्वास आहे.आपल्या भावी यशाबद्दल व उत्कर्षाबद्दल आमच्या शुभेच्छा.

आपल्या अध्यक्षतेखाली **देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ,** नाशिक ही संस्था यशस्वीपणे चालू आहे व आपल्या मार्गदर्शनाखाली नवनवीन उपक्रम राबवित आहे. आपल्या या कार्यास आमच्या हार्दिक शुभेच्छा व अभिनंदन.

नाशिक संस्थेच्या नुकत्याच पार पाडलेल्या विद्यार्थी गुणगौरव समारंभास मला व आमचे अध्यक्ष श्री. विलास जोशी यांना बोलावून आमचा सत्कार केलात याबद्दल आम्ही ऋणी आहोत.

याच सभेत आपण मला **बी.बी.एन ग्लोबलचे** सल्लागारपद दिलेत त्याबद्दल धन्यवाद व **बी.बी.एन ग्लोबलच्या** कार्याला शुभेच्छा.

आपण ब्राह्मण विद्यार्थ्यांसाठी नाशिकमध्ये भव्य वसतीगृह बांधत आहात या आपल्या कार्याला मध्यवर्ती मंडळाकडून लाख लाख शुभेच्छा.

भविष्यात मध्यवर्ती मंडळाकडून विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मदतीचे जे जे उपक्रम राबविले जातील त्याच्यासाठी आपले मार्गदर्शन सदैव असावे ही प्रार्थना.

सोबत आपण दिलेल्या देणगीची पावती क्र. ४३८ दिनांक ०६.०९.२०१८ या पत्रासोबत जोडत आहोत त्याची पोच द्यावी,ही विनंती.

कळावे.

धन्यवाद!

लोभ आहेच तो वृध्दिंगत व्हावा ही आग्रहाची विनंती

**आपला**
**अ.दे.ऋ.ब्रा.म.मंडळ**

**श्री. प्रभाकर पां. कुलकर्णी**
**(कार्याध्यक्ष)**

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाची सभा रविवार दिनांक १२.०८.२०१८ रोजी सकाळी १२. ०० वाजता □देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ□ब्राह्मण सभा करवीर मंगलधाम□महालक्ष्मी मंदिर □दक्षिण दरवाजा कोल्हापूर येथे श्री. विलास विनायक जोशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

**सभेत खालील ठराव करण्यात आला**

**विषय क्रमांक ३.**

मंडळाने लघुवाद न्यायालयात केलेल्या दाव्यांमध्ये संस्थेची बाजु मांडण्याकरीता संस्थे तर्फे ॲडव्होकेट श्री. आनंद नायक यांची नेमणूक केली होतीव ते आजपर्यंत काम पाहत होते. त्यांची फेरनियुक्ती करणे आवश्यक वाटत असल्याने यासर्व दाव्यांकरीता त्यांची संस्थेचे कायदेशीर सल्लागार म्हणून सभेत एकमताने नियुक्ती करण्यात आली. सभेने या नियुक्तीस मंजूरी दिली.

**विषय क्रमांक ४.**

भाडेकरूंच्या विरोधात विवीध कोर्टात प्रलंबित असलेल्या दाव्यांमध्ये संस्थेतर्फे माजी अध्यक्ष ॲडव्होकेट श्री. माधव अनगळ यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्र प्रमुख विश्वस्त म्हणून सादर केले. परंतू त्यांच्या शारिरीक दुर्बलतेमुळे बाकीच्या २० दाव्यांमध्ये त्यांची साक्ष होऊ शकली नाही. राहिलेल्या दाव्यांमध्ये संस्थेच्या कारभाराचा दिर्घ अनुभव असलेल्या व मंडळाचे व्यवस्थापक असलेल्या श्री. विकास दिनानाथ माने यांना पुर्वीच्या विश्वस्त मंडळाने संस्थेतर्फे या दाव्यांमध्ये संस्थेची बाजु मांडण्याचा अधिकार दिला होता व तशी त्यांची नेमणूक केली होती. तरी या सभेस विनंती की श्री. विकास दिनानाथ माने यांना संस्थेतर्फे सर्व प्रलंबित दाव्यांमध्ये संस्थेतर्फे साक्ष देणे व ईतर न्यायालयीन कामे करण्यासाठी योग्य ठराव करण्यात यावा व संस्थेचे कार्यवाह श्री. प्रसाद जर्नादन ठकार किंवा श्री. दिपक गोपाल कुलकर्णी ,श्री.विवेक कृष्णा देशपांडे (विश्वस्त) यांना सर्व दाव्यांमध्ये संस्थेतर्फे साक्ष देण्यासठी तसेच न्यायालयाला आवश्यक असलेली कागदपत्रे व ईतर पुर्तता करण्याचा अधिकार देण्यात यावा. असे मांडले असता, संस्थेचे माजी प्रमुख विश्वस्त ॲडव्होकेट श्री. माधव अनगळ यांनाही प्रलंबित असलेल्या दाव्यांमध्ये संस्थेतर्फे साक्ष देण्यासठी तसेच आवश्यक ईतर न्यायालयीन पुर्तता करण्याचा अधिकार देण्यात यावा असे मांडले.

ही सर्व बाजु कार्यकारी मंडळाने बघुन सभेत एकमताने मंजुरी दिली.

सुचक : श्री. सदानंद घोटिकर .................... अनुमोदक : श्री विवेक देशपांडे.

श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी (कार्याध्यक्ष)

श्री. प्रसाद ठकार (कार्यवाह)

# सत्यप्रत

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दिनांक १२.०८.२०१८ रोजी सकाळी १२.०० वाजता, ब्राह्मण सभा करवीर मंगलधाम, महालक्ष्मी मंदिर, दक्षिण दरवाजा, कोल्हापूर येथे श्री. विलास विनायक जोशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

**ठराव क्रमांक ३**

मंडळाने लघुवाद न्यायालयात केलेल्या दाव्यांमध्ये संस्थेची बाजु मांडण्याकरीता संस्थेतर्फे ॲडव्होकेट श्री. आनंद नायक यांची नेमणूक केली होती, ते आजपर्यंत काम पाहत होते. त्यांची फेरनियुक्ती करणे आवश्यक वाटत असल्याने या सर्व दाव्यांकरीता त्यांची वकील म्हणून फेरनियुक्ती करण्यात आली. खालील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला

**''अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाने (या नंतर मंडळ म्हणून संबोधावे) लघुवाद न्यायलय (Small Causes court) या मध्ये भाडेकरूंच्या विरुध्द प्रलंबित असलेल्या तसेच भविष्यात भाडेकरुच्या विरुध्द दावे दाखल करण्यात येणा-या सर्व दाव्यांमध्ये व मंडळातर्फे न्यायालयीन कारवाई मध्ये मंडळाची बाजू मांडण्यासाठी वकील म्हणून ॲड. आनंद नायक यांची फेरनेमणूक करण्यात येत आहे.''**

**सुचक :- श्री. सदानंद घोटीकर** **अनुमोदक :- श्री. राजेंद्र खेडलेकर**

**श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी**
**(कार्याध्यक्ष)**

**श्री. प्रसाद जनार्दन ठकार**
**(कार्यवाह)**

## सत्यप्रत

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दिनांक १२.०८.२०१८ रोजी सकाळी १२.०० वाजता, ब्राह्मण सभा करवीर मंगलधाम, महालक्ष्मी मंदिर, दक्षिण दरवाजा, कोल्हापूर येथे श्री. विलास विनायक जोशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. त्यामध्ये खालील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक ४**

‘‘अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळाने (हयापुढे मंडळ म्हणून संबोधावे) भाडेकरुंच्या विरुध्द प्रलंबित असलेल्या सर्व दाव्यांमध्ये मंडळातर्फे साक्ष देण्याकरीता व मंडळाची बाजू मांडण्यासाठी, तसेच न्यायालयास आवश्यक असलेली कागदपत्रांची पूर्तता शपथपत्र (Affidavit) दाखल करणे कोणताही अनुषंगाने अर्ज करणे व इतर न्यायालयीन कामकाजाची पूर्तता करण्याकरीता खालील सदस्यांना अधिकार देण्याचे सभेने एकमताने ठरविले आहे.

खालीलपैकी कोणा एकासही हे अधिकार देण्यात आले आहेत, या शिवाय वरील ठरावामधील व त्यापैकी कोणा एकासही दाव्यामध्ये वकील नेमण्यासाठी वकील पत्रावर मंडळातर्फे सही करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

वरील दाव्यात हुकूमनामा झाल्यानंतर हुकमनाम्याच्या बजावणीसाठी जी जी कारवाई करणे आवश्यक आहे, ती सर्व कारवाई करण्याबाबत त्यांना अधिकार देण्यात येत आहे.

१) ॲड. श्री. माधव दत्तात्रय अनगळ (माजी अध्यक्ष)
२) श्री. विकास दिनानाथ माने (व्यवस्थापक)
३) श्री. प्रसाद जनार्दन ठकार (कार्यवाह)
४) श्री. दिपक गोपाळ कुलकर्णी
५) श्री. विवेक कृष्णा देशपांडे ’’

**सुचक :- श्री. सदानंद घोटीकर अनुमोदक :- श्री. राजेंद्र खेडलेकर**

**श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी**
**(कार्याध्यक्ष)**

**श्री. प्रसाद जनार्दन ठकार**
**(कार्यवाह)**

## सत्यप्रत

दिनांक :- १५.०७.२०१८ रोजी झालेल्या लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास रोड, माहिम, मुंबई.४०००१६ येथे श्रीयुम ॲड. माधव दत्तात्रय अनगळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर झालेला ठराव खालील प्रमाणे

**ठराव क्रमांक ८**

प्रमुख निवडणुक अधिकारी श्री. राजेश मुधोळकर यांनी दिनांक २७. ०५.२०१८ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणुकीचा निकाल अध्यक्षांकडे सादर केला व या निवडणुकीच्या अहवालाच्या आधारे कार्यकारी मंडळात निवडणुन आलेल्या सदस्यांची व अध्यक्षांची नावे जाहिर करण्यात आली ती खालील प्रमाणे.

श्री. विलास विनायक जोशी , अध्यक्ष

<u>कार्यकारी मंडळ सदस्यांची नावे</u>

१. श्री. प्रभाकर पांडुरंग कुलकर्णी □मुंबई पश्चिम उपनगर
२. श्री. सदानंद बद्रीनाथ घोटीकर □मुंबई पश्चिम पनगर
३. सौ. अश्विनी हेमकांत नारविलकर □मुंबई पश्चिम उपनगर
४. सौ. पुष्पा प्रकाश कुलकर्णी □दक्षिण मुंबई
५. श्री. वासुदेव पद्माकर चिटणीस □दक्षिण मुंबई
६. श्री.हरी शंकरराव महाशब्दे □विदर्भ
७. श्री. दत्तात्रेय खंडेराव कुलकर्णी □पुणे उपनगर
८. श्री. राजेंद्र दिनकर खेडलेकर □ नाशिक
९. श्री. प्रसाद जनार्दन ठकार □ठाणे
१०. श्री. श्रीकांत गोपाळ पाटसकर □डोंबिवली
११.श्री. मधुकर रामराव कुलकर्णी □मराठवाडा
१२. श्री. महेंद्र मोहनिराज गंधे □अहमदनगर
१३. श्री. विनोद केशवराव देशमुख □मराठवाडा
१४. सौ. मनाली सुहास कुलकर्णी □बेळगाव
१५. सौ. मुक्ता मुकुंद हुल्याळकर □ दक्षिण मुंबई
१६. श्री. विलास शंकर कुलकर्णी □मध्य मुंबई उपनगर
१७. श्री. प्रभाकर अनंत संत □कल्याण
१८. श्री.संजय मधुसूदन कुलकर्णी □सोलापूर
१९. श्री. अनिकेत अशोक अष्टेकर □कोल्हापूर
२०. श्री. सतीश माधवराव पाटील □सोलापूर
२१ श्री. अश्विनिकुमार प.उपाध्ये □पुणे शहर
२२. श्री. रत्नाकर राजाराम धायगुडे □पुणे शहर
२३. श्री. अनिल श्रीधर पानसे □पुणे शहर
२४. श्री. प्रदीप नारायण कुलकर्णी □बेळगाव
२५. श्री. दिगंबर एस.अष्टेकर □बेळगाव
२६. श्रीमती. भारती रत्नाकर जोशी □कोल्हापूर
२७. निरंजन जोशी □सातवडेकर□□कोल्हापूर
२८. सौ. सुषमा बळवंत इनामदार □पुणे शहर
२९. सुधाकर मार्तंड कुलकर्णी □पुणे शहर

खालील दोन सभासद जरी निवडून आले आहेत. तरी सुध्दा त्यांचे वर्तन मंडळाच्या हिताच्या विरोधात असल्याने त्यांचे प्राथमिक सदस्य वार्षिक सभेमध्ये सर्वामुते पास झालेल्या ठरावा नुसार रद्द करण्यात आले आहे. मंडळाच्या वार्षिक सभेत मंडळाच्या हिताविरुध्द तसेच मंडळाचे आर्थिक नुकसान व्हावे असे वर्तन करणा-या सभासदांस जरी ते

निवडणुकीत निवडून आले असतील तरी त्यांचे प्राथमिक सभासदत्व रद्द करण्यात यावे असे सभासदांनी सुचविले व त्यास बहुमताने इतर सभासदांनी पाठींबा देऊन ठराव मंजूर करण्यात आला. त्यामुळे या दोन सभासदांना विश्वस्त मंडळातून काढून टाकण्यात आले आहे.

१. श्री. मिलिंद वि. सरनोबत दादर विभाग
२० लक्ष्मी नारायण बाग बाळ गोविंददास रोड माहिम मुंबई ४०००१६

२. श्री. सुरेश जेजुरीकर दादर विभाग **दक्षिण मुंबई**
१६ लक्ष्मी नारायण बाग बाळ गोविंददास रोड माहिम मुंबई ४०००१६

तसेच त्यांच्या जागी उपस्थित सभासदांपैकी खालील दोन सभासदांची विश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यात आली

**1.** श्री. विनोद वि. मांडके दादर विभाग **दक्षिण मुंबई**
ए ४३ इंद्रयणी कॉम्प्लेक्स जे.के. सावंत मार्ग दादर प ४०० ०२८.
मो.नं. ९८९२७६०८७८

**2.** श्री विवेक कृष्णा देशपांडे दादर विभाग **दक्षिण मुंबई**
३०१क्र३०२ समर्थ रघुकुल गोखले रोड साऊथ दादर प ४०००२८.
मो.नं. ९८२०७०७३६०

सभेने हा अहवाल मंजूर केला व नवीन कार्यकारी मंडळ व निवडून आलेल्या कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची व अध्यक्षांची नेमणूक १५ जुलै २०१८ ते १४ जुलै २०२१ पर्यंत राहिल या ठरावास सर्वानुमते मंजुरी दिली.

सूचक श्री. प्रभाकर अनंत संत अनुमोदक श्री. राजेंद्र खेडलेकर

श्री. माधव दत्तात्रय अनगळ
(अध्यक्ष)

दिनांक :- ६ मार्च २०१९

प्रति,
मा. श्री. सुधाकर हरी कुलकर्णी
ब-१, शांतादूर्गा गृह संस्था मर्यादीत,
४१-५, एरंडवणे, कर्वे मार्ग,
पुणे- ४११०३८

विषय :- पत्ता दुरुस्ती व समाचार बाबत,

महोदय,

आपले दिनांक २३ ,११ २०१८ चे पत्र श्रीयुत राजेद्रकर यांच्या सभासदत्व अर्ज व चेक सहीत आज दिनांक ६,३,२०१९ रोजी मिळाले.

आपण विनंती केल्याप्रमाणे वरील पत्याची नोंद आम्ही आमच्या दप्तरी केली असून यापुढे समाचारचा अंक नियमितपणे वरील पत्यावर पाठविण्यात येईल.

आपण पूर्वी संस्थेचे ३०० च्यावर तहयात सभासद नोंदविले आहेत हे वाचून आनंद झाला.

या पत्रासोबत आपल्या इच्छेनुसार १० सभासदत्व अर्ज व गेल्या ४ महिन्याच्ये समाचार अंक पाठवित आहोत त्याची पोच द्यावी. तसेच श्री. राजद्रेकर यांचा सभासद वर्गणीचा रु. २५० चा धनादेश जोडत आहोत. कारण हा धनादेश आता बाद झाला असून सभासदत्वाची वर्गणी रु.६००.०० आहे. तरी कृपया त्यांचा रु.६००.०० चा धनादेश पठवावा ही विनंती. सभासदत्वाचा अर्ज व फोटो सोबत पाठवित आहोत.

आपल्यासारख्यांच्या समाजकार्यामुळे व प्रेमामुळे संस्थेने गेल्या ६ महिन्यात ५०० च्यावर नवीन सभासदांची नोंद केली आहे हे सांगण्यास आनंद वाटतो. आपणही या कार्यात उत्साहाने भाग घेऊन जास्ती जास्त सभासद नोंदणी कराल असा आम्हाला विश्वास आहे.

कळावे , लोभ आहेच तो वृध्दिगत व्हावा ही विनंती.

''जय जय रघवीर समर्थ''

आपला
अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

श्री. प्रभाकर पां. कुलकर्णी
(कार्याध्यक्ष)